वर्ष: 6 अंक: 20

16-30 एप्रिल, 2026 (नि:शुल्क)

# न्यू इंडिया समाचार







# नक्षलमुक्त नवा भारत

**31 मार्च 2026** नक्षलमुक्त भारताचे स्वप्न झाले साकार; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारची प्रबळ इच्छाशक्ती आणि विकासाचा दृष्टिकोन यामुळे देशात शांतता आणि विकासाचे वातावरण झाले भक्कम...



ई-कॉपीसाठी क्यू आर कोड स्कॅन करा



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विनंती

# तंदुरुस्तीकडे नक्की लक्ष द्या, साखर आणि तेलाचा वापर कमी करा

*'मन की बात' कार्यक्रमासाठी दर महिन्याला देशाच्या विविध भागांतून मोठ्या प्रमाणात संदेश येतात. यावरून समजते की, दुर्गम भागात राहणारे लोक किती आवडीने हा कार्यक्रम ऐकतात. लोकांच्या सूचनांवरून असे वाटते की, हा केवळ एक कार्यक्रम नसून एक 'सामायिक संवाद' बनला आहे. लोकांचे विचार आणि अनुभव या कार्यक्रमाला सतत अधिक चांगले करण्याची प्रेरणा देतात. 29 मार्च रोजी प्रसारित झालेल्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तंदुरुस्ती , साखर आणि तेलाचा कमी वापर यासह अनेक महत्त्वाच्या विषयांवर भाष्य केले. त्यातील प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे...*

- **आखाती देशांचे आभार :** सध्या आपल्या शेजारी भीषण युद्ध सुरू आहे. आपल्या लाखो कुटुंबांचे नातेवाईक या देशांमध्ये राहतात. मी आखाती देशांचा अत्यंत आभारी आहे, कारण ते, तेथे राहणाऱ्या एक कोटींहून अधिक भारतीयांना सर्व प्रकारची मदत करत आहेत.
- **अफवांपासून सावध राहा:** मी सर्व देशवासियांना आवाहन करतो की त्यांनी सजग-सावध राहावे आणि अफवांना बळी पडू नये. सरकारकडून तुम्हाला जी निरंतर माहिती दिली जात आहे, त्यावरच विश्वास ठेवा आणि त्यानुसार पावले उचला.
- **देशवासियांचे सामर्थ्य:** दरवेळेप्रमाणे या वेळीही मला पूर्ण विश्वास आहे की, ज्याप्रमाणे आपण 140 कोटी देशवासियांच्या बळावर जुन्या संकटांवर मात केली होती, तसेच या वेळीही आपण सर्व मिळून या कठीण परिस्थितीतून यशस्वीपणे बाहेर पडू.
- **जलसंधारण अभियान:** गेल्या 11 वर्षांत 'जल संधारण अभियाना'ने लोकांना खूप जागरूक केले आहे. या अभियानांतर्गत देशभरात सुमारे 50 लाख कृत्रिम जलसंधारण सुविधा उभारण्यात आल्या आहेत.
- **अमृत सरोवर:** अमृत सरोवर अभियान या मोहिमेत सुमारे 70 हजार अमृत सरोवरे तयार करण्यात आली आहेत. पावसाळा सुरू होण्यापूर्वी या सरोवरांची साफसफाई देखील सुरू झाली आहे.
- **संस्कृती आणि वारसा:** 'ज्ञान भारतम सर्वे' या सर्वेक्षणाचा संबंध आपल्या महान संस्कृतीशी आणि समृद्ध वारशाशी आहे. देशभरातील हस्तलिखितांची माहिती गोळा करणे हा याचा उद्देश आहे. या सर्वेक्षणाशी जोडले जाण्यासाठी 'ज्ञान भारतम' ऍप हे एक माध्यम आहे.
- **मेरा युवा भारत:** राष्ट्रनिर्मितीच्या जबाबदारीत 'मेरा युवा भारत' म्हणजेच माय भारत संघटना मोठी भूमिका बजावत आहे. ही संघटना देशातील तरुणाईला विविध सकारात्मक उपक्रमांशी जोडत आहे.
- **जो खेळेल, तो बहरेल:** मी नेहमी सांगत असतो, 'जो खेलेगा, वो खिलेगा' (जो खेळेल, तो बहरेल). पूर्वी फारसे लोकप्रिय नसलेले खेळही आपल्या देशातील तरुणाई आता आवडीने खेळत आहे, हे पाहून आनंद होतो.
- **आजारांपासून दूर राहा:** सर्वांनी आपल्या तंदुरुस्तीवर नक्कीच लक्ष द्यावे. आहारात साखरेचे प्रमाण कमी करा. आपल्याला खाद्यतेलाच्या सेवनात 10 टक्क्यांनी कपात करायची आहे. या लहानशा प्रयत्नांमुळे तुम्ही लठ्ठपणा आणि जीवनशैलीशी संबंधित आजारांपासून दूर राहाल.
- **सागरी योद्धे:** आपले मच्छिमार बांधव केवळ समुद्रातील योद्धे नाहीत, तर ते 'आत्मनिर्भर भारता'चा एक भक्कम पाया आहेत. तंत्रज्ञानाच्या माध्यमातूनही मच्छिमारांना पूर्ण मदत केली जात आहे. आज मत्स्यव्यवसाय आणि सागरी शैवाल क्षेत्रात नवनवीन प्रयोग होत आहेत. मच्छिमार बांधव आता स्वावलंबी होत आहेत.
- **कोट्यवधी झाडे:** लोकसहभागाचे स्वरूप 'एक पेड माँ के नाम' अभियान, या एक झाड-आईच्या नावे मोहिमेतून स्पष्टपणे जाणवते. या मोहिमे अंतर्गत देशभरात कोट्यवधी झाडे लावण्यात आली आहेत.
- **सोलर पॅनेल:** आता घरांच्या छतावर मोठ्या संख्येने सोलर पॅनेल लावलेले दिसतात. काही वर्षांपूर्वीपर्यंत हे चित्र एखाद-दुसऱ्या घराबाबतच दिसायचे. मात्र आज 'पीएम सूर्य घर मोफत वीज योजने'चा प्रभाव देशाच्या कानाकोपऱ्यात दिसू लागला आहे.

'मन की बात' पूर्ण ऐकण्यासाठी
क्यू आर कोड स्कॅन करा.

न्यू इंडिया
# समाचार
वर्ष: 6, अंक: 20 । 16-30 एप्रिल, 2026

मुख्य संपादक
**धीरेंद्र ओझा**
प्रधान महासंचालक, पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

मुख्य सल्लागार संपादक
**संतोष कुमार**

वरिष्ठ सहाय्यक सल्लागार संपादक
**पवन कुमार**

सहाय्यक सल्लागार संपादक
**अखिलेश कुमार**
**चंदन कुमार चौधरी**

भाषा संपादन
**सुमित कुमार (इंग्रजी)**
**रजनीश मिश्रा (इंग्रजी)**
**नदीम अहमद (उर्दू)**

वरिष्ठ रचनाकार
**फूलचंद तिवारी**

रचनाकार
**अभय गुप्ता**
**सत्यम सिंह**



**13 भाषांमध्ये उपलब्ध 'न्यू इंडिया समाचार' वाचण्यासाठी येथे क्लिक करा :**
https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

**'न्यू इंडिया समाचार'चे जुने अंक वाचण्यासाठी येथे क्लिक करा:**
https://newindiasamachar.pib.gov.in/archive.aspx

नियमित अद्ययावत माहितीसाठी पहात रहा:
@NISPIBIndia

## आतील पानांवर...




### मुखपृष्ठ कथा

गेल्या 12 वर्षांत राष्ट्रीय सुरक्षेच्या क्षेत्रात भारताने नक्षलवाद आणि माओवादी हिंसाचाराविरुद्ध निर्णायक टप्पा पार केला आहे. कायद्याचा विजय झाला आहे. जे भाग एकेकाळी लाल पट्टा ('रेड कॉरिडॉर') म्हणून ओळखले जात होते, ते आता विकास आणि हरित विकासाची (ग्रीन ग्रोथ) केंद्रे बनली आहेत. दशकांपासून भेडसावत असलेल्या या समस्येचे कालबद्ध पद्धतीने उच्चाटन करून, 31 मार्च 2026 रोजी 'नक्षलमुक्त भारत' हा संकल्प, ऐतिहासिक यशात परिवर्तित झाला आहे... | 12-24

### नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळ




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उत्तर प्रदेशातील जेवर येथील नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन | 30-31

### जागतिक संकटावर पंतप्रधान मोदी

**जनहित सर्वोपरी**



संसदेच्या दोन्ही सभागृहांना संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले— आव्हानांचे संधीत रूपांतर करण्याची क्षमता 'नवा भारत' बाळगतो | 37-39

**वृत्त सारांश** | 4-5

**व्यक्तिविशेष : दादासाहेब फाळके**
भारतीय चित्रपटसृष्टीत आत्मनिर्भरता आणणारे द्रष्टे महापुरुष | 6

**'लोकसेवक' विकसित भारताचे शिल्पकार**
21 एप्रिल रोजी 18 वा नागरी सेवा दिन | 7-11

**राष्ट्र धोरण हाच नव्या भारताच्या राजकारणाचा आधार**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'टीव्ही 9 समिट 2026' ला केले संबोधित | 25-27

**सुधारित 'उडान' आणि 'भारत औद्योगिक विकास' योजनेला मंजुरी**
केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीतील महत्त्वपूर्ण निर्णय | 28-29

**संधी निर्माण करण्याचे महत्त्वाचे साधन: शिक्षण**
अक्षय पात्र कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते भोजन वाटप | 32-33

**सक्षम ग्रामस्थ,सक्षम पंचायत शाश्वत विकासाचा भक्कम आधार**
पंचायती राज दिन आणि 'स्वामित्व' योजनेच्या 6 वर्षांवर विशेष लेख | 34-36

**पश्चिम आशिया संकटाचा 'टीम इंडिया' एकजुटीने करेल सामना**
पंतप्रधानांनी युद्धजन्य परिस्थितीवर मुख्यमंत्र्यांसोबत घेतली बैठक | 40-41

**क्रीडा क्रांतीचा मजबूत कृती आराखडा**
'खेलो इंडिया' या महत्त्वाकांक्षी योजनेचे एक दशक | 42-45

**जागतिक वारशात सामावलेले देशाचे सार**
जागतिक वारसा दिनानिमित्त विशेष मजकूर | 46-47

**संपूर्ण मानवजातीला भारताच्या ए आय-सेमीकंडक्टरचा मिळेल लाभ**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा गुजरात दौरा; 20 हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विकासकामांची भेट | 48-50

**प्रकाशक: कांचन प्रसाद, महासंचालक, सीबीसी (केंद्रीय संचार ब्यूरो). पत्रव्यवहार आणि ईमेल पत्ता:** खोली क्र. 1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली - 110003. **ईमेल-** response-nis@pib.gov.in आर.एन.आय क्र DELHIN/2020/78812

# संपादकांच्या लेखणीतून..

# भारतातून लाल दहशतवादाचा नायनाट

## आदिवासी क्षेत्रांमध्ये आता होईल विनाअडथळा विकास

सप्रेम नमस्कार.

देशाला लाल दहशतवादाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी भारत सरकारने हाती घेतलेल्या मोहीमेला आज मोठे यश मिळाले आहे. बारा राज्यांत पसरलेल्या लाल पट्ट्यामध्ये (रेड कॉरिडॉर) अनेक वर्षांपासून हिंसेच्या जोरावर एक समांतर व्यवस्था, विकासात अडथळे आणत होती आणि या भागातील तरुणाईची दिशाभूल करत होती. आज केंद्र सरकारची स्पष्ट रणनीती आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे या क्षेत्रांत एका नवीन युगाची पहाट होत आहे. हे युग विकसित आणि आत्मनिर्भर भारताच्या आकांक्षेशी जोडलेले आहे.

नक्षलवादाचा मुकाबला करण्यासाठी संवाद, सुरक्षा आणि समन्वय अशी त्रिस्तरीय रणनीती अवलंबली गेली; याचा परिणाम म्हणून वर्ष 2024 ते मार्च 2026 पर्यंत 706 नक्षलवादी मारले गेले, 2,218 जणांना अटक झाली आणि 4,839 नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. तसेच, सर्वोच्च स्तरावरील सर्व 'केंद्रीय समिती' आणि 'पॉलिट ब्युरो' चे सदस्यही आता नामशेष झाले आहेत. एकीकडे कठोर कारवाईमुळे हिंसेवर नियंत्रण मिळवण्यात आले, तर दुसरीकडे रस्ते, दूरसंचार, शिक्षण, कौशल्य विकास आणि आर्थिक समावेशकता यांसारख्या उपक्रमांमुळे विकासाला नवी गती मिळाली आहे. जे भाग एकेकाळी भीती आणि असुरक्षिततेचे प्रतीक होते, तिथे आज स्थैर्य, विश्वास आणि नवीन संधींची द्वारे उघडली आहेत. छत्तीसगडमधील बस्तर हे याचे उत्तम उदाहरण म्हणून समोर आले असून, तिथे आता प्रत्येक गावापर्यंत शाळा, खेळ आणि सांस्कृतिक उपक्रम पोहोचवण्याची मोहीम सुरू आहे. 'बस्तर ऑलिम्पिक' आणि 'बस्तर पंडुम' यांसारखे उपक्रम सामाजिक पुनर्निर्मिती आणि आत्मविश्वासाचे प्रतीक बनले आहेत. हा बदल केवळ एका क्षेत्रापुरता मर्यादित नसून, एकेकाळी लाल नक्षलवादाने प्रभावित असलेल्या सर्व भागांत स्पष्टपणे दिसत आहे. हा बदल 'विकसित भारत 2047' च्या दिशेने एक भक्कम पाया रचत आहे, जिथे प्रत्येक क्षेत्र आणि प्रत्येक नागरिकाला समान संधी असेल. नक्षलमुक्त भारताचे साकार झालेले हे स्वप्नच आमच्या या अंकाची मुखपृष्ठ कथा आहे.

या व्यतिरिक्त, 'व्यक्तीविशेष' मालिकेत दादासाहेब फाळके, केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय, जागतिक वारसा दिन, 'फ्लॅगशिप' श्रेणीमध्ये 'खेलो इंडिया' योजनेचे दशक, 21 एप्रिल रोजीचा 18 वा नागरी सेवा दिन, 'अक्षय पात्र' च्या 5 अब्जाव्या भोजन वितरण कार्यक्रमात राष्ट्रपतींची उपस्थिती, पश्चिम आशियातील युद्धाच्या स्थितीवर संसदेतील संबोधन, यांसह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या, पंधरवड्यातील विविध कार्यक्रमांचा यात समावेश करण्यात आला आहे.

तसेच, मासिकाच्या मुखपृष्ठाच्या आतील बाजूवर 'मन की बात' आणि मलपृष्ठाच्या बाहेरील बाजूवर 22 एप्रिल रोजी साजऱ्या होणाऱ्या 'जागतिक पृथ्वी दिना'वर विशेष मजकूर समाविष्ट आहे. तुम्ही तुमच्या सूचना आम्हाला पाठवत राहा.

(धीरेंद्र ओझा)

हिंदी, इंग्रजी आणि इतर 11 भाषांमध्ये उपलब्ध असलेले हे पाक्षिक वाचण्यासाठी किंवा डाउनलोड करण्यासाठी खालील लिंकवर क्लिक करा:

https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

# आपले मनोगत...




## सरकारी योजना आणि उपक्रमांशी संबंधित मजकूर अत्यंत महत्त्वाचा

मी 'न्यू इंडिया समाचार' पाक्षिकाचा नियमित वाचक आहे. मला या पाक्षिकात प्रकाशित होणारी विविध सरकारी योजना आणि उपक्रमांशी संबंधित माहिती अत्यंत तथ्यपूर्ण आणि महत्त्वाची वाटते. हे पाक्षिक विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असून त्यातील लेख सोप्या भाषेत असतात.

**m.prashus91@gmail.com**

## विकासकामे आणि योजनांबाबत, नागरिकांना मिळतेय माहिती

'न्यू इंडिया समाचार' हे पाक्षिक,उत्तम आणि उपयुक्त माहिती देणारे आहे. आमच्या शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकांच्या वतीने मी या पाक्षिकाचे कौतुक करतो. यामुळे देशात होत असलेली विकासकामे आणि योजनांची माहिती नागरिकांना मिळत आहे. एखादी व्यक्ती जरी पहिल्यांदाच एखाद्या कठीण विषयाला सामोरी जात असेल, तरीही तो विषय येथे सहज समजून घेता येतो.

**bharath417c@gmail.com**

## 'सागरी भारत संकल्प 2030' चा मुख्य स्तंभ सागरमाला कार्यक्रम

'न्यू इंडिया समाचार' पाक्षिकात मी 'सागरमाला' कार्यक्रमावरील लेख वाचला. भारताचा 95 % व्यापार सागरी मार्गाने होतो. सागरमाला कार्यक्रमाने 11 वर्षांत 280 प्रकल्प पूर्ण करून बंदरे आणि संपर्क-दळणवळण व्यवस्थेला नवीन ताकद दिली आहे. 'सागरी भारत संकल्प 2030' आणि 'अमृतकाळ संकल्प 2047' ही ताकद अधिक बळकट करतील.

**संजीव सोना**

## प्रत्येक अंकातून काहीतरी नवीन शिकायला मिळते

'न्यू इंडिया समाचार' पाक्षिकात मला विशेष रस आहे. या पाक्षिकाच्या माध्यमातून मी देश-परदेशात घडणाऱ्या सर्व घडामोडींशी परिचित राहतो. प्रत्येक अंकातून काहीतरी नवीन शिकायला मिळते. यामध्ये संपूर्ण देशातील सरकारी धोरणे आणि विकासात्मक उपक्रमांची माहिती वाचायला मिळते.

**shaheedkharachiagp@gmail.com**

## हे पाक्षिक, आकडेवारी आणि तथ्यपूर्ण माहिती प्रदान करते

सर्वप्रथम, मी तुमचे आणि तुमच्या संपूर्ण चमूचे 'न्यू इंडिया समाचार' पाक्षिकाला मिळत असलेल्या यशाबद्दल अभिनंदन करतो. या पाक्षिकातील आकडेवारी आणि तथ्ये अगदी अचूक माहिती देतात. पाक्षिकातील 'व्यक्तीविशेष' हा भाग मला सर्वात जास्त आवडतो. सामान्य नागरिक आणि केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) परीक्षार्थींना या विलक्षण आणि माहितीपूर्ण पाक्षिकाच्या वाचनामुळे मोठा लाभ होऊ शकतो.

**achintasuri1996@gmail.com**

पत्रव्यवहार आणि ईमेलसाठी पत्ता: खोली क्रमांक-1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली-110003

ईमेल- response-nis@pib.gov.in

वृत्त विशेष



# ...जेणेकरून उन्हाळ्यात होऊ नये वीजटंचाई

देशात पुरेशी वीज उपलब्ध आहे. फेब्रुवारी 2026 पर्यंत देशात वीज निर्मितीची एकूण क्षमता 524 गिगावॉट झाली आहे. तसेच एप्रिल 2014 पासून क्षमता नव्याने 299.87 गिगावॉट एवढ्या मोठ्या प्रमाणात वाढवली गेल्यामुळे देशातील विजेची टंचाई मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. यामुळे भारत आता विजेची कमतरता असलेला देश राहिला नसून पुरेशी वीज उपलब्ध असलेला देश बनला आहे. मध्य पूर्वेचे संकट असूनही, एप्रिल ते जून 2026 या उन्हाळ्याच्या कालावधीत विजेची मागणी पूर्ण करण्यासाठी पर्यायी स्रोतांमधून वीज निर्मितीचे पुरेसे नियोजन करण्यात आले आहे. नवीन ऊर्जा प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत आणि जे प्रकल्प सध्या बांधकामाधीन आहेत (औष्णिक आणि जल), त्यांचे काम जलद गतीने सुरू आहे, त्यामुळे ते ठरलेल्या वेळेत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. वीज निर्मिती करणाऱ्या कंपन्यांना, दररोज त्यांच्या पूर्ण क्षमतेने वीज उपलब्ध करून देणे आणि उत्पादनात कोणतीही घट न येऊ देता ते कायम ठेवणे, असे आदेश दिले आहेत.



# सलग दुसऱ्या वर्षी एक अब्ज टन कोळसा

## उत्पादनाचा टप्पा गाठला

कोळसा क्षेत्रातील सातत्यपूर्ण आणि समन्वयाने केलेल्या प्रयत्नांमुळे देशाने सलग दुसऱ्या वर्षी 20 मार्च रोजी 1 अब्ज टन कोळसा उत्पादनाचा ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. ही महत्त्वाची कामगिरी म्हणजे, ऊर्जा क्षेत्रातील भारताच्या वाढत्या स्वावलंबनाचे आणि प्रमुख उद्योगांना अखंड इंधन पुरवठा सुनिश्चित करण्याच्या दिशेने टाकलेले एक भक्कम पाऊल आहे. कोळसा उत्पादनातील निरंतर वाढीमुळे देशाची वाढती ऊर्जेची मागणी प्रभावीपणे पूर्ण करणे शक्य झाले आहे. तसेच वीज क्षेत्रातील कोळसा आधारित औष्णिक विद्युत प्रकल्पांमध्ये विक्रमी कोळसा साठा राखण्यासही यामुळे मदत झाली आहे. अचूक नियोजन, कार्यक्षम अंमलबजावणी आणि कोळसा मूल्य साखळीतील मजबूत समन्वयामुळे हे यश शक्य झाले आहे.



# गुजरातच्या कच्छमध्ये जन्माला आले माळढोक पक्षाचे पिल्लू



वन्यजीव संवर्धनाच्या क्षेत्रात देशाला मोठे यश मिळाले आहे. गुजरातच्या कच्छमध्ये माळढोक( ग्रेट इंडियन बस्टर्ड-जीआयबी) या अत्यंत दुर्मिळ पक्ष्याचे पिल्लू सुमारे 10 वर्षांनंतर जन्माला आले आहे. हे यश, 'जंपस्टार्ट अप्रोच' नामक एका नवीन संवर्धन उपायामुळे शक्य झाले आहे; कारण गुजरातच्या कच्छमधील गवताळ प्रदेशात केवळ तीन मादी माळढोक उरल्या असून तिथे एकही नर उरलेला नाही. या उपक्रमासाठी राजस्थानमधील प्रजनन केंद्रातून एक अंडे, 770 किमी अंतराचा प्रवास करून गुजरातच्या घरट्यापर्यंत पोहोचवण्यात आले. देशातील जीआयबी 'जंपस्टार्ट अप्रोच' चा हा पहिलाच आंतरराज्यीय उपक्रम आहे, जो गुजरातमध्ये यशस्वीपणे पूर्ण झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2011 मध्ये गुजरातसह माळढोक पक्ष्यांच्या नैसर्गिक अधिवासात त्यांच्या संवर्धनासाठी 'प्रोजेक्ट जीआयबी' ची संकल्पना मांडली होती. अधिकृतपणे 2016 मध्ये याची सुरुवात करण्यात आली होती.

# रेल्वेचे नक्की झालेले तिकीट रद्द करणे नियमांत बदल

भारतीय रेल्वेने नक्की झालेले तिकीट रद्द करण्याच्या नियमांत अनेक बदल केले आहेत. गाडी सुटण्यापूर्वी 48, 12 आणि 4 तास आधी तिकीट रद्द करण्याची जुनी कालमर्यादा बदलून आता 72, 24 आणि 8 तास अशी करण्यात आली आहे. आरक्षणाचा तक्ता तयार करण्याच्या प्रक्रियेशी सुसंगत असा हा बदल करण्यात आला आहे; आता प्रवासाच्या 9 ते 18 तास आधी तक्ता तयार केला जातो. रेल्वेच्या या नवीन नियमाचा थेट फायदा, प्रतीक्षा यादीतील प्रवाशांना होईल. जर एखाद्या व्यक्तीने नक्की झालेले तिकीट 24-72 तास आधी रद्द केले, तर 25 % भाडे कापले जाईल. 8-24 तासांच्या दरम्यान रद्द केल्यास 50 % कपात होईल, तर 8 तासांपेक्षा कमी वेळ शिल्लक असताना तिकीट रद्द केल्यास कोणताही परतावा मिळणार नाही.

रेल्वेच्या नवीन तरतुदीनुसार, आता प्रवासी, रेल्वेगाडी सुटण्याच्या 30 मिनिटे आधीपर्यंत आपले तिकीट उच्च श्रेणीत (हायर क्लास) बदलू शकतील. पूर्वी हा बदल केवळ तक्ता तयार होण्यापूर्वीच शक्य होता. रेल्वे, माहिती आणि प्रसारण तसेच इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, तिकीट फक्त खरोखर प्रवास करणाऱ्या प्रवाशांनाच मिळावे आणि बनावट आरक्षण किंवा गैरवापर टळावा, हा या बदलांमागील मुख्य उद्देश आहे. यासाठी सुमारे 3 कोटी संशयास्पद खाती बंद करण्यात आली आहेत. आता प्रवाशांना ज्या स्थानकावरून तिकीट घेतले आहे त्याच ठिकाणी जाण्याची गरज नाही; देशातील कोणत्याही रेल्वे स्थानकावरून ते आपले काउंटर तिकीट (प्रत्यक्ष तिकीट खिडकीवर घेतलेले तिकीट) रद्द करू शकतात.



## आदिवासींनी बनवलेल्या उत्पादनांना ई-कॉमर्सवर प्रोत्साहन



आदिवासी कारागिरांना सक्षम करण्यासाठी आणि स्वदेशी उत्पादनांना चालना देण्यासाठी टपाल विभागाने आदिवासी कार्य मंत्रालयांतर्गत असलेल्या 'ट्रायबल को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग डेव्हलपमेंट फेडरेशन ऑफ इंडिया' (ट्रायफेड) या भारतीय आदिवासी सहकारी विपणन विकास महासंघा सोबत करार केला आहे. या करारानुसार ट्रायफेडच्या ऑनलाइन मंचावरून येणाऱ्या सर्व मागण्यांसाठी टपाल विभाग संपूर्ण प्रक्रिया हाताळेल—म्हणजे मागणी उचलणे, पॅकिंग, वाहतूक आणि ग्राहकापर्यंत पोहोचवणे, ही सर्व कामे 'एंड टू एंड' केली जातील. यामुळे आदिवासी कारागीर आणि उद्योजकांना अधिक सुलभपणे बाजारपेठ उपलब्ध होईल. ही भागीदारी आदिवासींचा उदरनिर्वाह आणि डिजिटल अर्थव्यवस्थेला चालना देईल, तसेच आदिवासी समुदायाच्या उत्पन्नातही वाढ होईल.

## 50 दशलक्ष टन लोहखनिज उत्पादन घेऊन रचला इतिहास

भारतातील सर्वात मोठी लोहखनिज उत्पादक आणि नवरत्न सीपीएसई 'एनएमडीसी लिमिटेड'ने एका आर्थिक वर्षात 50 दशलक्ष टन लोहखनिजाचे उत्पादन करणारी देशातील पहिली खाण कंपनी बनून इतिहास रचला आहे. 2025 नंतर उत्पादनात सुमारे दोन तृतीयांश वाढ झाली असून, हे उत्पादन 30 दशलक्ष टनांवरून 50 दशलक्ष टनांपर्यंत पोहोचले आहे. आजच्या एकूण क्षमतेपैकी जवळपास 20 % वाढ फक्त मागील चार वर्षांतच झाली आहे. भारत, 2030 पर्यंत पोलाद निर्मिती क्षमता 300 दशलक्ष टनांपर्यंत वाढवण्याच्या आपल्या ध्येयाकडे वेगाने वाटचाल करत आहे. ■





# दादासाहेब फाळके...

## भारतीय चित्रपट सृष्टीला स्वावलंबित्व मिळवून देणारे दूरदर्शी व्यक्तिमत्व

*भारतीय चित्रपट सृष्टीत 'स्वावलंबित्व' आणि 'मेक इन इंडिया' या संकल्पनांना प्रोत्साहन देणारे दादासाहेब फाळके हे एक असे दूरदर्शी व्यक्तिमत्व होते ज्यांना भारतीय चित्रपट सृष्टीचे जनक मानले जाते. लहानपणापासूनच कलेसाठी समर्पित असलेल्या फाळके यांनी आपल्या चित्रपटांमध्ये सातत्याने स्थानिक कलाकारांना संधी दिली आणि देशात उपलब्ध असलेल्या साहित्य तसेच तंत्रज्ञानाला प्रोत्साहन दिले. त्यांची देशभक्ती, भारतीय चित्रपटसृष्टीबद्दलची ओढ, दूरदृष्टी आणि वारसा जगभरातील कथाकार आणि चित्रपट निर्मात्यांना आजही प्रेरणा देत आहे...*

**जन्म**
30 एप्रिल 1870

**मृत्यू**
16 फेब्रुवारी 1944

स्वतः जवळ धन किंवा विमा कवच नसलेल्या एका व्यक्तीने आपल्या पत्नीचे दागिने विकून चित्रपट निर्मितीसाठी लागणारे सर्व साहित्य विकत घेतले. या व्यक्तीने केवळ चित्रपटच बनवले नाहीत तर येणाऱ्या पिढ्यांसाठी मार्ग ही प्रशस्त केला. ही व्यक्ती दुसरे कोणी नसून दादासाहेब फाळके होते ज्यांनी भारतातील लोकांना चित्रपट सृष्टीच्या अनुभवातील सौंदर्याचा परिचय करून दिला. या उद्योगाला जगातील सर्वात मोठा मनोरंजन व्यवसाय बनवण्याचा मार्ग त्यांनी मोकळा करून दिला. पटकथा लेखन, चित्रपट निर्मिती आणि दिग्दर्शन यांसारख्या विविध क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदानामुळे दादासाहेब फाळके यांना भारतीय चित्रपट सृष्टीचा जनक मानले जाते. राजा हरिश्चंद्र या पहिल्या भारतीय चित्रपटाद्वारे त्यांनी भारतीय चित्रपट सृष्टीच्या जादुई दुनियेचा पाया रचला.

महाराष्ट्रातील नाशिक जवळच्या त्र्यंबकेश्वर येथे 30 एप्रिल 1870 रोजी जन्मलेल्या दादासाहेबांचे संपूर्ण नाव धुंडिराज गोविंद फाळके होते. 'द लाईफ ऑफ ख्राईस्ट' हा चित्रपट पाहिल्यानंतर त्यांना चित्रपट बनविण्याची प्रेरणा मिळाली. यानंतर 1912 मध्ये फाळके त्यांनी चित्रपट कंपनीची स्थापना केली. मुंबईच्या कोरोनेशन थिएटर मध्ये 3 मे 1913 रोजी त्यांनी आपला पहिला मूकपट 'राजा हरिश्चंद्र' प्रदर्शित केला आणि या चित्रपटाने भारतातील चित्रपट उद्योगाची जोरदार सुरुवात झाली. त्या काळात त्यांनी चित्रपटांमध्ये अनेक नवीन प्रयोग केले आणि त्यानंतर 1917 साली महाराष्ट्रातील नाशिक येथे हिंदुस्तान फिल्म कंपनीची स्थापना केली. आपल्या 19 वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी 95 चित्रपट आणि 27 लघुपटांसह अनेक चित्रपटांची निर्मिती केली. राजा हरिश्चंद्र व्यतिरिक्त मोहीनी भस्मासूर, सत्यवान सावित्री, लंका दहन, श्री कृष्ण जन्म आणि कालिया मर्दन हे दादासाहेब फाळके यांचे प्रसिद्ध चित्रपट आहेत. मोहिनी भस्मासूर हा त्यांचा पहिला चित्रपट होता ज्यात महिला कलाकारांनी अभिनय केला होता तर 1917 मध्ये बनलेल्या लंका दहन या चित्रपटात एका अभिनेत्याची दुहेरी भूमिका पहायला मिळाली. सेतू बंधन हा 1932 मध्ये बनलेला चित्रपट त्यांचा अंतिम मूकपट ठरला तर गंगावतरण या एकमेव बोलपटाची त्यांनी निर्मिती केली. भारतीय चित्रपट सृष्टीच्या इतिहासात दादासाहेब फाळके यांचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे. 16 फेब्रुवारी 1944 रोजी त्यांचे निधन झाले.

भारतीय चित्रपट सृष्टीतील उत्कृष्ट योगदान आणि कामगिरीसाठी दिला जाणारा दादासाहेब फाळके पुरस्कार हा सर्वोच्च चित्रपट पुरस्कार आहे.दादासाहेंबाच्या जन्मशताब्दी वर्षा निमित्त 1969 मध्ये याची सुरूवात करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 1 मे 2025 रोजी वेव्हज समिट मध्ये भारताच्या समृद्ध चित्रपट इतिहासावर प्रकाश टाकताना दादासाहेब फाळके यांचे स्मरण केले. भारताचा पहिला चित्रपट राजा हरिश्चंद्र हा 3 मे 1913 रोजी प्रदर्शित झाला होता ज्याचे दिग्दर्शन अग्रगण्य चित्रपट निर्माते दादासाहेब फाळके यांनी केले होते असे ते म्हणाले. ■

21 एप्रिल 2026 : 18 वा नागरी सेवा दिवस

# लोक सेवक विकसित भारताचे शिल्पकार

*शासकीय योजना लोकांपर्यंत कितपत पोहचतात आणि त्याचा तळागाळापर्यंत प्रत्यक्ष काय परिणाम होतो यावरून शासनाची गुणवत्ता ठरते. नागरी सेवा या कामाचा कणा आहे... आणि म्हणूनच सरदार वल्लभभाई पटेल यांनी नागरी सेवकांना राष्ट्राचा पोलादी सांगाडा असे म्हटले होते. लोकसेवा, धोरण निर्मिती आणि त्याची अंमलबजावणी यात नागरी सेवकांच्या भूमिकेचे स्मरण करण्यासाठी दरवर्षी 21 एप्रिल रोजी नागरी सेवा दिवस साजरा केला जातो. यावर्षी देश 18 वा नागरी सेवा दिवस साजरा करीत आहे...*





सुशासन सुनिश्चित करणे असो अथवा योजना आणि धोरणांची अंमलबजावणी करणे असो, सनदी अधिकाऱ्यांनी संपूर्ण निष्ठेने आणि समर्पित वृत्तीने राष्ट्राची सेवा केली आहे. विशेषतः देश विकसित भारत घडवण्याच्या निर्धाराने पुढे वाटचाल करीत असताना नागरी सेवकांच्या जबाबदाऱ्या अधिकच महत्त्वपूर्ण ठरतात. नागरी सेवकांच्या याच जबाबदाऱ्या आणि विकसित भारताच्या मार्गावरील त्यांच्या भूमिकेचा संदर्भ देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिक देवो भवः हा मंत्र दिला आहे. 21 एप्रिल 1947 रोजी प्रशासकीय सेवा अधिकाऱ्यांच्या पहिल्या तुकडीला संबोधित करताना सरदार पटेल यांनी नागरी सेवकांचा उल्लेख राष्ट्राचा पोलादी सांगाडा असा केला होता. 'लोह पुरुष' सरदार पटेल यांनी त्या अधिकाऱ्यांना सल्ला दिला की देशातल्या नागरिकांची सेवा करणे हे आता त्यांचे सर्वोच्च कर्तव्य आहे. स्वतंत्र भारताच्या शासन प्रणालीसाठी त्यांनी नवीन मानदंड स्थापित केले होते. जो राष्ट्राची सेवा करणे हे आपले सर्वोच्च कर्तव्य मानतो, जो लोकशाही पद्धतीने प्रशासन चालवतो आणि जो प्रामाणिकपणा, शिस्त आणि समर्पित वृत्तीने कर्तव्य बजावित आहे असा सनदी अधिकारी असणे आवश्यक आहे असे ते म्हणाले.आज जेव्हा देश विकसित भारत घडविण्याच्या दृष्टीने पुढील वाटचाल करीत आहेत तेव्हा सरदार वल्लभाई पटेल यांचे हे शब्द अधिकच व्यावहारिक ठरताना दिसत आहेत. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात की एक काळ असा होता जेव्हा नोकरशहांची भूमिका एका नियंत्रकाप्रमाणे होती जी औद्योगिकीकरण आणि उद्योजकतेच्या गतीवर नियंत्रण ठेवीत असे. देश आता या विचारसरणीच्या ही पुढे गेला आहे. आपण आज असे वातावरण निर्माण करीत आहोत जे नागरिकांमध्ये उद्योगाला प्रोत्साहन देते आणि त्यांना प्रत्येक अडथळ्यावर मात करण्यास मदत करते. यासाठी नागरी सेवा सक्षम केली पाहिजे. केवळ नियमावलीची रक्षक ही आपली भूमिका न ठेवता विकासाची संयोजक म्हणून तिने आपल्या भूमिकेचा विस्तार केला पाहिजे.

## नवीन भारताचे शिल्पकार

एक काळ होता जेव्हा नागरी सेवेत प्रवेश करणारे कर्मचारी नागरी सेवक म्हणून प्रगती करण्याची स्वप्ने पाहत असत. पण आता काळ बदलला आहे. पंतप्रधान मोदी म्हणतात की त्यांनी हे स्वप्न भारताच्या 1.4 अब्ज नागरिकांच्या डोळ्यात पाहिले आहे आणि म्हणूनच ते आता म्हणत आहेत की तुम्ही केवळ नागरी सेवक नाही तर तुम्ही नव्या भारताचे शिल्पकार आहात. एक शिल्पकार म्हणून ती जबाबदारी पार पाडण्यासाठी स्वतःला सक्षम करा. प्रत्येक सामान्य माणसाची स्वप्ने आपलीच आहेत असे समजून जगा. विकसित भारतासाठी हेच आपले ध्येय असले पाहिजे.

## सरकारने नोकरशाहीला बंधनातून मुक्त केले

सरकारने गेल्या काही वर्षांत नोकरशाहीला बंधनातून मुक्त केले आहे. राजशिष्टाचार आणि पदानुक्रम हीच ती बांधणे होती. तुम्हाला ज्ञात आहेच की पंतप्रधान मोदी यांनी स्वतः नोकरशाहीवर देखरेख ठेवण्याची प्रथा सुरू केली. सचिवांपासून ते सहाय्यक सचिवांपर्यंत ते सर्वांना नियमितपणे भेट देत असतात. प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांचीही ते भेट घेत असतात. प्रत्येकाचा आंतर विभागीय सहभाग वाढविण्यासाठी आणि त्यांच्याकडून कल्पना मिळविण्यासाठी केंद्र सरकारमध्ये चिंतन शिबिरालाही त्यांनी प्रोत्साहन दिले आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे आणखी एक महत्त्वपूर्ण बदल घडून आला. याआधी अधिकाऱ्यांना राज्यांमध्ये अनेक वर्षे घालवल्यानंतर प्रतिनियुक्ती वर केंद्र सरकारमध्ये काम करायला मिळत असे. जर या अधिकाऱ्यांकडे केंद्र सरकारात काम करण्याचा अनुभव नसेल तर ते केंद्र सरकारच्या योजनांची तळागाळापर्यंत प्रत्यक्ष अंमलबजावणी कशी करतील असा प्रश्न कोणाला पडला नाही. यामुळेच त्यांनी सहाय्यक सचिव कार्यक्रमा अंतर्गत ही समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला. आता तरुण आय ए एस अधिकाऱ्यांना त्यांच्या करिअरच्या अगदी सुरुवातीलाच केंद्र सरकारमध्ये काम करण्याची संधी उपलब्ध होत आहे.

## नागरी सेवकांनी तंत्रज्ञानाच्या क्रांतीसाठी तयार असले पाहिजे

नागरी सेवकांनी अशी कौशल्य आत्मसात केली पाहिजेत जी केवळ त्यांना तंत्रज्ञान समजून घेण्यातच मदत करण्यात नव्हे तर स्मार्ट आणि समावेशक शासन प्रणाली राबवण्यासाठीही सक्षम करतील. तंत्रज्ञानाच्या युगातील शासनाचा अर्थ केवळ प्रणाली व्यवस्थापन करणे एवढेच नाही तर शक्यतांमध्ये अनेक पटींनी वाढव करणे हे देखील आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि क्वॉन्टम भौतिक शास्त्रातील वेगवान प्रगती समजून घेण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांनी तंत्रज्ञानाच्या क्रांतीसाठी सज्ज असणे आवश्यक आहे.



## सुशासनामुळे आत्मविश्वास निर्माण झाला

- आपल्या कागदपत्रांची सत्यता पडताळण्यासाठी याआधी आपल्याला राजपत्रित अधिकाऱ्याकडे जावे लागत असे. मात्र, सध्याच्या केंद्र सरकारने आपल्या कागदपत्रांची सत्यता स्वतःच पडताळण्याचा अधिकार आपल्या ला प्रदान केला आहे.
- 1 जानेवारी 2016 पासून शासकीय नोकऱ्यांमधील गट क आणि गट ब प्रवर्गातील सर्व बिगर राजपत्रित पदांच्या भर्ती प्रक्रियेसाठी मुलाखती रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.
- तक्रार निवारणासाठी पूर्वी सरासरी 62 दिवस लागत होते पण आता अवघे 13 दिवस लागतात. बऱ्याच तक्रारींचे निवारण 5 ते 6 दिवसांच्या आत होत आहे.

## राष्ट्रीय नागरी सेवा दिवस साजरा करण्याचा उद्देश

- नागरी सेवा अधिकाऱ्यांच्या कार्याला आणि प्रयत्नांना प्रेरणा देणे व त्यांचे कौतुक करणे.
- केंद्र सरकार या उपक्रमांद्वारे नागरी सेवा अंतर्गत विविध विभागांच्या कार्याचे मूल्यांकन करते.
- केंद्र सरकार सर्वात चांगले काम करणाऱ्या व्यक्ती आणि गटांना पुरस्कार प्रदान करते.
- या दिवशी केंद्र आणि राज्य सरकारांच्या अधिकाऱ्यांना भारताचे पंतप्रधान यांच्या हस्ते लोककल्याणाच्या क्षेत्रातील त्यांच्या उत्कृष्ट सेवेबद्दल सन्मानित केले जाते.




## नागरी सेवकांमधील सुधारणांबाबत नव्याने विचार करण्याची वेळ

नागरी सेवांमधील सुधारणांचा नव्याने विचार करण्याची ही वेळ आहे. आपल्याला सुधारणांचा वेग वाढवला पाहिजे आणि त्यांची व्याप्तीही वाढवली पाहिजे. पायाभूत सुविधा असो किंवा नवीकरणीय उर्जेचे उद्दिष्ट असो, अंतर्गत सुरक्षा असो वा भ्रष्टाचार निर्मूलनाचे उद्दिष्ट असो, सामाजिक कल्याण योजना असोत अथवा ऑलिंपिक खेळांशी संबंधित उद्दिष्टे, देशाला प्रत्येक क्षेत्रात नवीन सुधारणा लागू कराव्या लागतील. पंतप्रधान मोदी यांना विश्वास आहे की आपण आतापर्यंत जे साध्य केले आहे त्यापेक्षा खूप जास्त साध्य करायला हवे. या सर्वांच्या दरम्यान आपण एक गोष्ट नेहमीच लक्षात ठेवली पाहिजे की जग कितीही तंत्रज्ञान आधारित झाले तरी आपण मानवी सद्सदविवेक बुद्धीचे महत्त्व कधीही विसरता कामा नये. संवेदनशील व्हा, गरिबांचा आवाज ऐका, गरिबांच्या समस्या समजून घ्या आणि त्या सोडवण्याला आपले प्राधान्य द्या. ज्याप्रमाणे अतिथी देवो भवः असते त्याचप्रमाणे आपणही नागरिक देवो भवः या मंत्राचे पालन केले पाहिजे. केवळ भारताचे सनदी अधिकारी म्हणूनच नव्हे तर एका विकसित भारताचे शिल्पकार म्हणून नवीन जबाबदारीसाठी तुम्ही स्वतःला तयार केले पाहिजे.

## सरकारने भूमिकेवर आधारित दृष्टिकोनावर बहुमूल्य भर दिला आहे

- नागरी सेवांमध्ये क्षमता आणि सामर्थ्य वाढविण्यासाठी नवीन संरचना उदयास आली आहे.
- शिक्षण पद्धतीचे लोकशाहीकरण झाले आहे.
- प्रत्येक अधिकाऱ्यासाठी त्याची क्षमता आणि अपेक्षांनुसार जबाबदारी निश्चित केली जात आहे.





*आता नागरी सेवा क्षेत्राने समकालीन आव्हानांच्या दृष्टिकोनातून स्वतःला सज्ज करणे आवश्यक आहे, तरच ते आताच्या काळात लागू राहील. आपल्याला प्रत्येक कसोटीसाठी तयार राहावं लागेल आणि ती कसोटी पूर्ण करावी लागेल. स्वतःला आव्हान देत राहणे हेच यशाचे सूत्र आहे.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

### सुशासन हीच गुरुकिल्ली

गेल्या काही वर्षांपासून किंबहुना गेल्या दशकापासून पंतप्रधान मोदी देशाच्या नागरी सेवेत दाखल झालेल्या तरुणांना सांगत आले आहेत की तुम्हालाही ज्ञात आहेच की आयुष्य जगण्याचे दोन मार्ग आहेत. पहिला म्हणजे 'काम पूर्णत्वास नेणे' आणि दुसरा म्हणजे 'जे होईल ते होऊ देणे'. पहिला मार्ग सक्रिय दृष्टिकोन दर्शवतो तर दुसरा निष्क्रिय दृष्टिकोन प्रतिबिंबित करतो. पहिल्या दृष्टिकोनानुसार जगणारी व्यक्ती मानते की बदल शक्य आहे. दुसऱ्या दृष्टिकोनावर विश्वास ठेवणारी व्यक्ती म्हणते, ठीक आहे, असू दे, सर्व काही असेच चालू असते. पूर्वीही हे चालू होते, भविष्यातही चालू राहील, ते आपोआप होईल, सर्व काही ठीक होईल. 'काम पूर्ण करण्यावर विश्वास ठेवणारे प्रसंगाला सामोरे जाऊन जबाबदारी स्विकारतात. जेव्हा त्यांना संघात काम करण्याची संधी मिळते तेव्हा ते प्रत्येक कामात प्रेरक शक्ती म्हणून उभे ठाकतात. लोकांच्या जीवनात बदल घडवण्याची ही तीव्र इच्छा तुम्हाला एक असा वारसा मागे ठेवण्यास मदत करेल जो कायम स्मरणात राहील. तुम्ही हेही लक्षात ठेवले पाहिजे की एक अधिकारी म्हणून तुमचे यश तुम्ही स्वतःसाठी काय साध्य करता यावर मोजले जाणार नाही तर तुमचे यश यावर मोजले जाईल की तुमच्या कामाने, तुमच्या कारकीर्दीने इतरांच्या जीवनात काय परिवर्तन घडून आले. ज्यांचे आयुष्य घडवण्याची जबाबदारी तुमच्यावर होती, ते तुमच्याबद्दल काय विचार करतात? म्हणून तुम्ही हे नेहमी

पंतप्रधान मोदी यांचा शासन मंत्र

# नागरिक देवो भव:

*21व्या शतकाच्या या युगात झपाट्याने बदलणाऱ्या प्रणालींमध्ये भारत वेगाने प्रगती करीत आहे. नवीन प्रणाली सामावून घेण्यासाठी भारतातील नागरी सेवा सातत्याने अद्ययावत करण्यात येत आहे. याच संदर्भात 2 ते 8 एप्रिल दरम्यान कर्मयोगी साधना सप्ताह आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिक देवो भव: या शासनाच्या मूलभूत तत्वाचा उल्लेख करत लोकसेवकांना संबोधित केले आणि सांगितले की सर्वसामान्य माणसासाठी स्थानिक कार्यालयच सरकारचा चेहरा आहे...*


## पंतप्रधान मोदींचा लोकसेवकांना मंत्र

- आपला दृष्टिकोन असा असला पाहिजे की देशातील नागरिकांचे राहणीमान आणि जीवनमान दिवसेंदिवस सुधारले पाहिजे.
- दररोज काहीतरी नवीन शिकण्याची गरज आहे. तुम्हाला स्वत:ला कर्मयोगीच्या वृत्तीने घडवायला हवे.
- प्रशासकीय सेवांमधील सुधारणा आणि बदल म्हणजे लोकसेवकांच्या वर्तनातील बदल होय.
- इतरांची रेखा कमी करण्याऐवजी स्वत:ची दीर्घ रेखा आखणे हेच यशाचे एक महत्त्वाचे तत्व आहे. जुन्या व्यवस्थेत अधिकारावर जास्त भर होता पण आज कर्तव्याच्या जाणिवेवर अधिक भर दिला जात आहे.
- पदाचे नव्हे तर कामाचे महत्त्व वाढू द्या. प्रत्येक निर्णय घेण्यापूर्वी कर्तव्य काय सांगते याचा विचार करा म्हणजे निर्णयाचा प्रभाव अधिक पटींनी वाढेल.
- तुमच्या प्रयत्नांकडे एका व्यापक दृष्टिकोनातून पहा. 2047 पर्यंत विकसित भारत हेच उद्दिष्ट आहे. तुम्ही करत असलेल्या कामाचा देशाच्या विकासाच्या प्रवासावर काय परिणाम होईल याचा विचार करा.
- आपले वैयक्तिक परिवर्तन संस्थात्मक परिवर्तन कसे बनू शकते.
- हे करण्यासाठी प्रचंड उर्जेची गरज असते, ही ऊर्जा किंवा सेवेच्या भावनेतून मिळू शकते.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यू आर कोड स्कॅन करा

## उत्तम प्रशासनासाठी तंत्रज्ञान

- जेव्हा आपण शिकण्याबद्दल बोलतो तेव्हा आजच्या परिमितीत तंत्रज्ञानाचे महत्त्व लक्षणीय रित्या वाढते.
- गेल्या 11 वर्षांपासून शासकीय आणि प्रशासकीय कामांमध्ये सुशासन आणि कार्यपूर्तीपासून ते अर्थव्यवस्थेपर्यंत तंत्रज्ञान क्रांतीचे सामर्थ्य दिसून येत आहे.
- ए आय च्या आगमनाने या बदलाला आता आणखी गती मिळणार आहे. त्यामुळे तंत्रज्ञान समजून घेणे आणि त्याचा प्रभावीपणे वापर करणे हे लोकसेवेचे एक अत्यावश्यक अंग बनले आहे.
- ज्या प्रशासनाला आणि लोकसेवकाला तंत्रज्ञान आणि डेटाची समजत असेल तेच आता अधिक चांगले प्रशासन आणि उत्तम लोकसेवा ठरेल.
- हाच तुमच्या निर्णय घेण्याचा आधार आहे. त्यामुळे ए आयच्या क्षेत्रात क्षमता बांधणी आणि सातत्यपूर्ण शिक्षणाचा प्रसार केला जात आहे.



लक्षात ठेवले पाहिजे की सुशासन हीच गुरुकिल्ली आहे.

### नागरी सेवा दिवस हा संकल्पनांचा दिवस आहे

नागरी सेवा दिवस ही केवळ एक वार्षिक परंपरा नसून तो संकल्प करण्याचा दिवस आहे. घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी वेळेत होईल हे सुनिश्चित करण्याचा उत्साह आणि ऊर्जेने भरून घेण्याची हा दिवस म्हणजे एक संधी आहे. पंतप्रधान मोदी यांचा विश्वास आहे की जर आपण ही संधी सोबत घेऊन नवीन ऊर्जा. नवीन प्रेरणा, नवीन शक्ती, नवीन ताकद, नवीन संकल्प घेऊन नव्याने पुढे गेलो तर आपण ज्या यशाची आकांक्षा बाळगतो ते आपण स्वत: घेऊ शकतो. स्वत:साठी, आपल्या सहकाऱ्यांसाठी आणि व्यवस्थेसाठीही क्षमता बांधणी हा आपला निरंतर प्रयत्न असायला हवा असे ते म्हणाले. ▪



# लाल कॉरिडॉर पासून हरित विकास क्षेत्रापर्यंत नक्षल मुक्त भारताची नवीन कहाणी



*भारताने नक्षलवाद आणि माओवादी हिंसाचाराविरोधात निर्णायक टप्पा पार केला आहे. गेल्या 12 वर्षांमध्ये राष्ट्रीय सुरक्षेच्या क्षेत्रात हे एक मोठे आणि महत्त्वपूर्ण यश मानले जाते. नक्षलवादाच्या विळख्यातून मुक्त होऊन देशाने सुटकेचा निःश्वास टाकला आहे. बॉम्ब आणि बंदुकांच्या जागी संविधान आणि कायद्याच्या शक्तीचा विजय झाला आहे. एके काळी 'रेड कॉरिडॉर' म्हणून ओळखले जाणारे प्रदेश आता विकास आणि 'हरित विकासा'ची केंद्रे बनले आहेत. भीती आणि अंधारावर मात करून विकासाचा उदय झाला आहे. अनेक दशके जुन्या या समस्येचा कालबद्ध पद्धतीने बीमोड करून, 31 मार्च 2026 पर्यंत 'नक्षलमुक्त भारताचा' संकल्प एका ऐतिहासिक यशात साकार झाला आणि देशासाठी बनला अभिमानाचा क्षण...*

**जिथे कधी काळी गोळ्यांचे आवाज ऐकू यायचे, तिथे आता विकासाची गीते आहेत.**
**जिथे भीतीदायक रात्र असायची, तिथे आता आशेचे किरण आहेत.**
**जिथे जंगलात भयाण शांतता होती, तिथे आज आनंदी जीवन आहे.**
**भारत आज आपल्या साहस आणि निर्धाराद्वारे नवा इतिहास रचत आहे.**

**30 मार्च 2026 रोजी संसदेत दुमदुमलेल्या या ओळी, भारतातील नक्षलवादाचा अंत आणि नक्षलग्रस्त भागांमधील बदलाची काव्यात्मक अभिव्यक्ती आहेत.जिथे एके काळी बंदुका होत्या, तिथे आता रोजगार आहे; जिथे भीती आणि अंधार होता, तिथे आता विकासाचा उदय होत आहे. हे विकास, सुरक्षितता आणि आकांक्षांनी भरलेल्या एका नव्या युगाचे वर्णन आहे, जिथे हिंसेची जागा प्रगतीने घेतली आहे. जेव्हा धोरण, हेतू आणि नेतृत्व एकत्र काम करतात, तेव्हा अशक्य गोष्टही शक्य होते याचे हे द्योतक आहे.**



बऱ्याचदा, अशा काही तारखा, असे काही क्षण असतात, जे इतिहासाच्या पानांवर सुवर्णाक्षरांनी कायमचे कोरले जातात. अशीच एक तारीख आहे 31 मार्च 2026 ची. आतापर्यंत, 31 मार्च हा आर्थिक वर्ष समाप्तीचा शेवटचा दिवस,तर जगभरात आयफेल टॉवरचे उद्घाटन आणि अमेरिकेत कृष्णवर्णीय लोकांनी पहिल्यांदा मतदान केल्यामुळे ओळखला जातो. मात्र आता, ही तारीख नक्षलमुक्त भारताचा उद्घोष आणि सामाजिक-आर्थिक विकासाचे प्रतीक म्हणूनही स्मरणात राहील. भारत नक्षलमुक्त होण्याच्या नियोजित तारखेच्या, म्हणजेच 31 मार्चच्या बरोबर एक दिवस आधी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरातून या संकल्पाच्या सिध्दीची घोषणा केली. त्याचबरोबर, लाल दहशतीमुळे जो भाग विकासापासून वंचित राहिला , तो भाग आता विकासाच्या नव्या प्रवासाच्या प्रारंभाचा साक्षीदार बनेल.

अनेक दशके जुनी नक्षल समस्या ही एक हिंसक विचारसरणी होती, जिने आदिवासी भागांमधील विकासात

अडथळा आणला होता. हिंसाचाराला प्रोत्साहन दिले होते. केंद्र सरकारच्या कठोर आणि स्पष्ट धोरणामुळे या समस्येचा अंत झाला. अनेक दशकांपासून चालत आलेली समस्या दूर केल्यामुळे,31मार्च 2026 ही इतिहासाची अशी तारीख बनली आहे जी पुढील अनेक शतके स्मरणात राहील. केंद्र सरकारने एक बहुआयामी धोरण राबवत एक मजबूत सुरक्षा मोहीम, जलद विकास आणि सहानुभूतीपूर्ण समर्पणाच्या धोरणावर काम केले. सरकारच्या या प्रयत्नांनी नक्षलवादी संरचना आणि प्रशिक्षित नक्षलींचा बीमोड करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

खरं तर, जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची सूत्रे हाती घेतली, तेव्हा जम्मू आणि काश्मीर, ईशान्य भारत आणि डाव्या विचारसरणीच्या अतिरेक्यांचा प्रभाव असलेला कॉरिडॉर या तीन प्रमुख संवेदनशील भागांमुळे देशाच्या अंतर्गत सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला होता. गेल्या 4-5 दशकांमध्ये या तीन ठिकाणी फोफावत गेलेल्या अशांततेमुळे हजारो लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे आणि मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे. देशाच्या अर्थसंकल्पाचा मोठा हिस्सा गरिबांचा विकास करण्याऐवजी, हि अशांत क्षेत्रे सांभाळण्यावर खर्च होत होता. सुरक्षा दलांचीही जीवितहानी होत होती, परंतु 2014 नंतर, एका स्पष्ट दीर्घकालीन धोरणाच्या आधारे या तीन संवेदनशील ठिकाणांवर लक्ष केंद्रित करण्यात आले.

## नक्षलवादाची सुरुवात आणि रेड कॉरिडॉर

नक्षलवादाची सुरुवात 1967 मध्ये पश्चिम बंगालमधील नक्षलबाडी चळवळीने झाली. ती 'रेड कॉरिडॉर'मध्ये पसरली, ज्यामुळे छत्तीसगड, झारखंड, ओडिशा, महाराष्ट्र, केरळ, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश-आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांच्या काही भागांवर परिणाम झाला. 1971 मध्ये स्वतंत्र भारताच्या इतिहासात सर्वाधिक 3,620 हिंसक घटना घडल्या. त्यानंतर 80 च्या दशकात पीपल्स वॉर ग्रुपने या राज्यांमध्ये आपला विस्तार केला. या दशकानंतर, डाव्या विचारसरणीचे गट एकमेकांत विलीन होऊ लागले आणि 2004 मध्ये प्रमुख सीपीआय (माओवादी) गटाची स्थापना झाली.नक्षलवादी हिंसाचाराने अत्यंत गंभीर वळण घेतले. पशुपती ते तिरुपती कॉरिडॉर 'रेड कॉरिडॉर' म्हणून ओळखला जात होता. देशाच्या एकूण भूभागापैकी 17 टक्के भूभाग रेड कॉरिडॉरने व्यापलेला होता आणि या समस्येचा परिणाम 12 कोटी लोकांवर झाला, ज्यांना अनेक वर्षे गरिबीत नाईलाजाने काढावी लागली. त्यावेळच्या लोकसंख्येच्या 10 टक्के लोकसंख्या नक्षलवादाचा दंश सहन करत आपले जीवन जगत होती. त्या तुलनेत, इतर दोन अशांत प्रदेशांमध्ये—काश्मीरचा 1 टक्के भूभाग



*हे खरे आहे की माओवादी हिंसाचारामुळे मध्य आणि पूर्व भारतातील अनेक जिल्ह्यांच्या प्रगतीला खीळ बसली होती. म्हणूनच 2015 मध्ये आमच्या सरकारने माओवादी हिंसाचार समूळ नष्ट करण्यासाठी एक व्यापक राष्ट्रीय धोरण आणि कृती योजना तयार केली. हिंसाचाराप्रति शून्य सहिष्णुतेबरोबरच आम्ही या भागांमधील गरीब लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी पायाभूत सुविधा आणि सामाजिक सक्षमीकरणाला प्रोत्साहन देण्यावरही लक्ष केंद्रित केले आहे.*

**– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



# रेड कॉरिडॉर ते नक्षलमुक्त भारत पर्यंत (2014-2026)

*केंद्र सरकारचे सुरक्षा-केंद्रित धोरण, पायाभूत सुविधा, नक्षलवादाच्या वित्ती य नेटवर्कवर प्रहार आणि आत्मसमर्पण रणनीतीचे सकारात्मक परिणाम दिसून आले. वामपंथी उग्रवादी (एलडब्ल्यूई ), जो नक्षलवाद म्हणून ओळखला जातो ,ते भारतासमोरील सर्वात गंभीर अंतर्गत सुरक्षा आव्हानांपैकी एक होते. केंद्र सरकार आणि प्रभावित राज्य सरकारांच्या मदतीने या आव्हानांवर मात करण्यात आली असून, देशाला नक्षलमुक्त घोषित करण्यात आले आहे. नक्षलवादापासून मुक्ती मिळवण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न...*

## राष्ट्रीय धोरण आणि कृती आराखडा -2015

- नक्षलवादाची समस्या मुळापासून नष्ट करण्यासाठी, 2015 मध्ये एलडब्ल्यूईचा सामना करण्यासाठी राष्ट्रीय धोरण आणि कृती आराखडा मंजूर करण्यात आला. यामध्ये सुरक्षा संबंधी उपाय, विकासकामे आणि स्थानिक समुदायांचे हक्क व अधिकार सुनिश्चित करणे यासह अनेक धोरणांवर काम करण्यात आले.
- एलडब्ल्यूई प्रभावित राज्यांमध्ये केंद्र सरकारकडून केंद्रीय सशस्त्र पोलीस दलांची तैनाती, भारतीय राखीव बटालियनची स्थापना, हेलिकॉप्टर साहाय्य, पोलीस प्रशिक्षण आणि आधुनिकीकरण, आवश्यक निधी, शस्त्रे व उपकरणे उपलब्ध करून देणे तसेच गुप्त माहितीची देवाणघेवाण आणि तटबंदीयुक्त पोलीस ठाण्यांचे बांधकाम.

**3681.73 कोटी रुपये**

राज्यांच्या क्षमता बांधणीसाठी,वर्ष 2014-15 पासून सुरक्षा संबंधित खर्च (एसआरई) योजनेअंतर्गत नक्षलवादी प्रभावित राज्यांना आत्मसमर्पण करणाऱ्या नक्षलवाद्यांचे पुनर्वसन, नक्षलवादी हिंसाचारात शहीद झालेल्या सुरक्षा दल जवानांच्या/नागरिकांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान इत्यादींसाठी जारी करण्यात आले.

दहशतवादाने प्रभावित झाला होता तर ईशान्य भारताचा 3.3 टक्के भूभाग अशांततेने ग्रस्त होता. 2014 पासून, पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने संवाद, सुरक्षा आणि समन्वय या तिन्ही पैलूंवर काम सुरू झाले. या दिशेने, 2014-2026 हा कालावधी देशाच्या अंतर्गत सुरक्षेच्या इतिहासात सुवर्णकाळ म्हणून नोंदवला जाईल. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी अनेक प्रसंगी नमूद केले आहे की, "आम्ही 31 मार्च , 2026 पर्यंत संपूर्ण भारताला नक्षलवादी हिंसाचारापासून मुक्त करण्यात निश्चितपणे यशस्वी होऊ." याच दिशेने , ईशान्य भारतात 10 हजारांहून अधिक युवक शस्त्रे खाली ठेवून मुख्य प्रवाहात सामील झाले आहेत आणि 12 हून अधिक शांतता करारांच्या माध्यमातून ईशान्य भारतात शांतता प्रस्थापित करण्याचे खूप मोठे काम झाले आहे. जम्मू आणि काश्मीर तसेच लडाखमध्ये देखील कलम 370 रद्द केल्यानंतर विकासाच्या नव्या पर्वाला सुरुवात झाली आहे.

> *2014 नंतर, आमच्या सरकारने नक्षलवाद -माओवादी दहशतीविरोधात मोठी कारवाई सुरु केली. आम्ही शहरांमध्ये बसलेल्या शहरी नक्षलवाद्यांच्या समर्थकांना, म्हणजेच शहरी नक्षलवाद्यांना लक्ष्य केले, वैचारिक लढाई देखील जिंकली आणि त्यांच्या बालेकिल्ल्यांमध्ये जाऊन त्यांचा सामना केला. याचे परिणाम आज देशासमोर आहेत.*
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**




# हिंसाचारात झाली सातत्याने घट


- राष्ट्रीय धोरण आणि कृती आराखडा 2015'लागू केल्यामुळे हिंसाचार कमी झाला. देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी गंभीर आव्हान ठरलेल्या डाव्या विचारसरणीच्या अतिरेकीवादाला नियंत्रणात आणण्यात आले.

- एलडब्ल्यूईमुळे प्रभावित जिल्ह्यांची संख्या 2014 मधील 126 वरून कमी होऊन डिसेंबर 2025 मध्ये केवळ 11 इतकी राहिली. यावरही प्रहार करण्यात आला. आता कोणताही जिल्हा अतिप्रभावित नाही.


### एलडब्ल्यूईमुळे अतिप्रभावित जिल्हे




### एलडब्ल्यूईद्वारे करण्यात आलेल्या हिंसक घटना




### सुरक्षा दलांमधील मृत्युदरात घट




### नक्षलवादी ठार

| वर्ष | संख्या |
|---|---|
| 2025 | 364 |

- 1,022 जणांना अटक करण्यात आली तर 2,337 जणांनी आत्मसमर्पण केले.

### डाव्या विचारसरणीच्या अतिरेकीवादाशी संबंधित हिंसाचाराची नोंद करणारी पोलीस ठाणी

| वर्ष | पोलीस ठाणे |
|---|---|
| 2010 | 465 |
| 2025 | 119 |
| 2026 | 60 |

**24** नक्षलवाद्यांनी 23 मे 2025 रोजी आत्मसमर्पण केले.

**258** नक्षलवाद्यांनी छत्तीसगड आणि महाराष्ट्रात ऑक्टोबर 2025 मध्ये आत्मसमर्पण केले.

**7,409** डाव्या विचारसरणीच्या अतिरेक्यांना वर्ष 2019 ते 15 जानेवारी 2026 दरम्यान अटक करण्यात आली, तर 5,880 जणांनी आत्मसमर्पण केले.

## नक्षलमुक्तीची तारीख निश्चित झाल्यावर...

**706**
नक्षलवादी मार्च 2024, 2025, 2026 पर्यंत झालेल्या चकमकींमध्ये मारले गेले.

**2,218**
~~नक्सली गिरफ्तार हुए।~~

**4,839**
~~नक्सलियों ने आत्मसमर्पण किया।~~

## लाल दहशतवादापासून मुक्त भारत

राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबतीत गेल्या 12 वर्षांमधील भारताचे सर्वात मोठे यश म्हणजे नक्षलवादी-माओवादी दहशतवादाचे कंबरडे मोडणे हे आहे. 2014 पूर्वी आपल्या देशातील परिस्थिती अशी होती की, देशभरात नक्षलवादी-माओवादी गटांचे वर्चस्व होते.नक्षलवादी भागांमध्ये देशाचे संविधान चालत नव्हते. तेथे पोलीस आणि प्रशासन काम करू शकत नव्हते. सरकार आणि प्रशासन त्यांच्यासमोर हतबल दिसत होते.2014 पूर्वी देशातील सुमारे सव्वाशे जिल्हे माओवादी हिंसाचाराच्या विळख्यात होते, परंतु गेल्या 12 वर्षांच्या मेहनतीचे फळ आहे की, आता देश माओवादी दहशतीपासून पूर्णपणे मुक्त



## पुनर्वसन आणि प्रोत्साहनांचाही परिणाम दिसून आला

- पुनर्वसन पॅकेजमध्ये, इतर गोष्टींबरोबरच, उच्च पदावरील एलडब्ल्यूई संवर्गातील व्यक्तींसाठी 5 लाख रुपये आणि इतर एलडब्ल्यूई संवर्गातील व्यक्तींसाठी 2.5 लाख रुपयांच्या तात्काळ अनुदानाची तरतूद करण्यात आली होती.

**50,000**
रुपयांची प्रोत्साहन रक्कम आत्मसमर्पण केल्यावर आणि सामूहिक आत्मसमर्पण केल्यावर रक्कम दुप्पट होते.



- आत्मसमर्पण करणाऱ्याला मोबाईल फोन दिला जातो.

- शस्त्रे जमा केल्यावर नुकसान भरपाई मिळते.
- पुनर्वसन केंद्रात कौशल्य प्रशिक्षण आणि टूलकिटचे वितरण केले जाते.

**10,000**
रुपये दरमहा 36 महिन्यांपर्यंत सहाय्य दिले जाते. प्रत्येकाला पीएम आवासची भेट मिळते.

- नक्षलमुक्त पंचायत होताच, गावाच्या विकासासाठी 1 कोटी रुपये दिले जातात.
- त्यांच्या मुलांसाठी 12वी पर्यंत मोफत शिक्षणाची व्यवस्था , महिलांसाठी 2 लाख रुपयांपर्यंत आणि पुरुषांसाठी 5 लाख रुपयांपर्यंत कर्जाची व्यवस्था

*स्वातंत्र्यापासून या देशातील जनतेची इच्छा असलेली अनेक मोठी कामे नरेंद्र मोदी जींच्या 12 वर्षांच्या कार्यकाळात पूर्ण झाली आणि आता त्यांच्याच राजवटीत नक्षलमुक्त भारताची निर्मितीही होत आहे. ही 12 वर्षे देशासाठी एक प्रकारे खूप शुभ ठरली आहेत.*

**-अमित शाह, केंद्रीय गृहमंत्री**

होऊन मोकळ्या हवेचा श्वास घेत आहे. कोट्यवधी लोक अनेक पिढ्यांनंतर प्रथमच भीती आणि दहशतीच्या छायेतून बाहेर पडून विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील झाले आहेत. ज्या भागांमध्ये माओवादी आणि नक्षलवादी रस्ते बांधू देत नव्हते, शाळा उघडू देत नव्हते, रुग्णालये बांधू देत नव्हते, आणि आधीच बांधलेल्या शाळा व रुग्णालयेही बॉम्बने उडवून देत होते. डॉक्टरांना गोळ्या घालून ठार मारायचे, मोबाईल टॉवर उभारण्यास अडथळा आणायचे, सुरक्षा दलांच्या छावण्यांवर हल्ला करून कैद्यांना सोडवायचे, शस्त्रे लुटायचे, पायाभूत सुविधांच्या कामांसाठी कंत्राटदारांकडून कमिशन उकळायचे, ट्रक आणि मालगाड्यांच्या डब्यांना आग लावायचे, आता तिथे महामार्ग बांधले जात आहेत आणि नवीन उद्योग उभारले जात आहेत. देशाचे यश हे त्याच्या सुरक्षा दलांच्या चिकाटी, त्याग आणि शौर्यामुळे प्राप्त झाले आहे. म्हणूनच, 2025 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण देशाला आश्वस्त केले की, जोपर्यंत देश नक्षलवाद आणि माओवादाच्या दहशतीतून पूर्णपणे मुक्त होत नाही, तोपर्यंत ते थांबणार नाहीत किंवा विश्रांती घेणार नाहीत.

### संवाद→सुरक्षा→समन्वय

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, भारताचा नक्षलवादाविरुद्धचा लढा सुरक्षा, विकास आणि सामाजिक न्याय या त्रिकोणावर आधारित आहे. देशाने केंद्र आणि राज्य सरकारांमधील सातत्यपूर्ण सक्रिय सहकार्याद्वारे 31 मार्च 2026 पर्यंत नक्षलमुक्त होण्याचे लक्ष्य गाठले आहे. हे सरकारच्या निर्णायक धोरणाचे आणि शांतता व विकासाप्रती असलेल्या त्याच्या अढळ वचनबद्धतेचे एका दशकाचे द्योतक आहे. सरकारने नक्षलवादाविरोधात एक एकीकृत , बहुआयामी आणि कठोर रणनीती अवलंबली आहे, जी पूर्वीच्या सरकारांच्या विखंडित दृष्टिकोनाच्या तुलनेत यशस्वी ठरली आहे. संवाद, सुरक्षा आणि समन्वयाच्या स्पष्ट तत्त्वांचे पालन करत सरकारने



## तीन तारीख ... बदलली दिशा

*विकासासाठी केंद्र सरकारने 'संपूर्ण सरकार' तर सुरक्षा अधिक कडक करण्यासाठी 'संपूर्ण एजन्सी' दृष्टिकोनाद्वारे बदलली दिशा, ज्यात तीन तारखांनी लिहिली निर्णायक पटकथा...*

- संपूर्ण एजन्सी दृष्टिकोनाने एनआयए, ईडी, गुप्तचर विभाग इत्यादींनी नक्षलवाद्यांचे जाळे, त्यांना होणारा निधी पुरवठा आणि मदत व्यवस्थेवर चहुबाजुंनी प्रहार केला.
- संपूर्ण सरकार दृष्टिकोनामुळे प्रभावित भागांमध्ये विकासकामे आधीच सुरू झाली होती.
- **20 ऑगस्ट 2019,** केंद्रीय गृह मंत्रालयात एक बैठक झाली आणि यात पोलीस समन्वय, पोलीस आधुनिकीकरण, सेवानिवृत्त नक्षलवाद्यांना पोलीस दलात आणणे आणि गुप्तचर यंत्रणांशी समन्वय या सर्व बाबींवर एक आराखडा तयार करण्यात आला.
- **24 ऑगस्ट 2024,** छत्तीसगडमधील निवडणुकांनंतर सत्तांतर झाले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तिथे पोहचले आणि केंद्र व राज्य सरकारांदरम्यान संयुक्त रणनीती तयार करण्यात आली. याच दिवशी घोषणा करण्यात आली-31 मार्च 2026 पर्यंत भारत नक्षलमुक्त होईल.
- **31 मार्च 2026,** नक्षलमुक्त भारताच्या संकल्प सिद्धीच्या तारखेच्या एक दिवस आधी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी लोकसभेत ही घोषणा केली.

केंद्रीय गृहमंत्र्यांचे संपूर्ण भाषण पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

मार्च 2026 पर्यंत प्रत्येक नक्षलग्रस्त भाग पूर्णपणे नक्षलमुक्त केला आहे.

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांच्या म्हणण्यानुसार, जिथे पूर्वी काम विकेंद्रित पद्धतीने होत होते, घटनांच्या आधारे कारवाई व्हायची आणि कोणतेही कायमस्वरूपी धोरण नव्हते. एक प्रकारे, सरकारच्या प्रतिसादाचे चाक नक्षलवाद्यांच्या हातात मात्र, 2014 पासून सरकारची विविध अभियान आणि कार्यक्रमांचे संचालन



## पोलीस दलाचे आधुनिकीकरण

- राज्यांच्या पोलीस दलांना 'पोलीस दलाचे आधुनिकीकरण' योजनेअंतर्गत सहाय्य प्रदान करण्यात आले.
- या योजनेअंतर्गत केंद्र सरकारने राज्य सरकारांना शस्त्रे, माहिती तंत्रज्ञान उपकरणे, दळणवळण, प्रशिक्षण, गतिशीलता, पोलीस निवास आणि इतर पायाभूत सुविधांसाठी सहाय्य प्रदान केले.
- या योजनेच्या 'विशेष पायाभूत सुविधा योजना (**SIS**)' या उप-योजनेअंतर्गत, एसडब्ल्यूई प्रभावित राज्यांमध्ये विशेष दल, राज्याच्या गुप्तचर शाखा, जिल्हा पोलीस आणि भक्कम पोलीस ठाणी तयार करण्यात आली.

**1,224.59** कोटी रुपयांचे अर्थसहाय्य वर्ष 2014-15पासून आतापर्यंत या योजनेच्या माध्यमातून केंद्रीय संस्थांना देण्यात आले.

**596** अभेद्य पोलीस ठाणी गेल्या 11 वर्षांमध्ये बांधण्यात आली.

**350** पोलीस ठाणी नक्षलवादी घटनांची नोंद करत होते, आता ही संख्या 60 पर्यंत कमी झाली आहे.

**406** नवीन छावण्या केंद्रीय सशस्त्र दलांच्या 2020 पासून बांधण्यात आल्या आहेत.

**68** नाईट लँडिंग हेलिपॅड बांधण्यात आले.

**400** बुलेटप्रूफ आणि स्फोटप्रूफ गाड्या जवानांना पुरवण्यात आल्या.

**5** रुग्णालये जवानांसाठी बांधण्यात आली आणि दळणवळण प्रणाली सुधारण्यात आली.





# वित्तपुरवठा रोखण्यासाठी उचलली पावले

*एलडब्ल्यूईला मिळणारा निधी रोखण्यावर केंद्र सरकारने विशेष लक्ष दिले. विशेषतः, भारतीय कम्युनिस्ट पक्ष (माओवादी) आणि त्यांना निधी पुरवणारे यांच्यातील संबंध उघडकीस आणण्यासाठी सातत्याने कारवाई करण्यात आली. एलडब्ल्यूईला निधी आणि इतर संसाधने मिळण्यापासून रोखण्यासाठी राज्य पोलीस, केंद्रीय यंत्रणांच्या मदतीने समन्वित आणि प्रभावी कारवाई करण्यात आली. एलडब्ल्यूईचे वित्तीय नेटवर्क तोडण्यासाठी सरकारकडून उचलण्यात आलेली पावले...*

- दहशतवादाला होणाऱ्या निधीपुरवठ्याला आळा घालण्यासाठी, 2011 पासून गृह मंत्रालयात "दहशतवाद निधीपुरवठा विरोधी कक्ष (**CFT**)"नावाचा एक विशेष विभाग तयार करण्यात आला होता. हा विभाग वेगवेगळ्या गुप्तचर आणि सक्तवसुली संस्थांशी समन्वय राखत दहशतवादाच्या वित्तीय व्यवस्थेवर कारवाई करतो.
- राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए ) देखील दहशतवादाला निधीपुरवठा आणि बनावट भारतीय चलनी नोटा (**FICCNs**) यांचा तपास आणि खटला चालवण्यासाठी दहशतवादाला निधीपुरवठा आणि बनावट चलनी नोटा कक्ष (**TFFCC**) स्थापन केला आहे.
- देशात एआयसीएनच्या प्रसाराला आळा घालण्यासाठी, केंद्र आणि राज्यांच्या विविध सुरक्षा संस्थांमध्ये गोपनीय माहिती सामायिक करण्यासाठी एक एआयसीएन समन्वय केंद्र (एफसीओआरडी ) देखील तयार करण्यात आले.
- संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचा ठराव आणि बेकायदेशीर कारवाया (प्रतिबंध) कायद्यांतर्गत, दहशतवादी संघटना आणि त्यांच्या सदस्यांविरोधात अनेक प्रकारचे निर्बंध लावण्यात आले. यामध्ये निधी/मालमत्ता गोठवणे आणि जप्त करणे यांचा समावेश होता. यामुळे दहशतवादी संघटनांना होणाऱ्या निधीच्या पुरवठ्याला आळा बसला.
- गृह मंत्रालयात 2016 मध्ये, एलडब्ल्यूईच्या कॅडरना मिळणाऱ्या निधीच्या प्रवाहावर देखरेख ठेवण्यासाठी दोन बहु-शाखीय गट स्थापन करण्यात आले, एक केंद्रीय स्तरावर आणि दुसरा राज्य स्तरावर.

**40** कोटी रुपयांहून

अधिक संपत्ती केंद्र सरकारने एनआयए मध्ये एक समर्पित विभाग तयार करून जप्त केली. नक्षलवाद्यांच्या वित्तपुरवठ्यावर प्रभावीपणे अंकुश ठेवण्यात आला. राज्यांनीही 40 कोटी रुपयांहून अधिक संपत्ती जप्त केली

**12** कोटी रुपये



सक्तवसुली संचालनालयाने जप्त केले. या कारवाईमुळे शहरी नक्षलवाद्यांना गंभीर नैतिक आणि मानसिक धक्का बसला आणि त्यांच्या माहिती युद्ध नेटवर्कवरील नियंत्रण आणखी घट्ट झाले.

भारत सरकारच्या गृह मंत्रालयाकडे आहे. हा एक मोठा धोरणात्मक बदल आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणतात, "आमच्या सरकारचे धोरण आहे की ज्यांना शस्त्रे खाली ठेवून आत्मसमर्पण करायचे आहे, त्यांच्यासाठी लाल गालिचा अंथरला आहे आणि त्यांचे स्वागत आहे, मात्र जर त्यांना शस्त्रे घेऊन निर्दोष आदिवासींना मारायचे असेल, तर सरकारचा धर्म निष्पाप आदिवासींना वाचवणे आणि सशस्त्र नक्षलवाद्यांचा सामना करणे हा आहे." केंद्र आणि राज्य सरकारांमधील समन्वय सुधारला, राज्यांची क्षमता आणि पोलीस व्यवस्थेत सुधारणा करण्यात आल्या आहेत. केंद्रीय सशस्त्र दल आणि राज्य पोलीस यांच्यातील समन्वय वाढवण्यात आला. पहिल्यांदाच


प्रतीकात्मक फोटो

# विकास केंद्रित उपक्रम

*विकासाच्या आघाडीवर, सरकारच्या मुख्य योजनांव्यतिरिक्त, नक्षलग्रस्त भागांसाठी विशेष उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. यामध्ये रस्ते जाळ्याचा विस्तार, दूरसंचार जोडणीत सुधारणा, शिक्षण, कौशल्य विकास आणि आर्थिक समावेशन यांचा समावेश आहे. यापैकी प्रमुख आहेत...*

रस्त्यांचे जाळे मजबूत करण्यासाठी रस्ते आवश्यकता योजना (आर आर पी) आणि नक्षलग्रस्त भागांसाठी रस्ते जोडणी प्रकल्प (आरसीपीएलडब्ल्यूईए) या दोन विशेष योजना राबविण्यात आल्या.

**17,589** किमी रस्त्यांच्या बांधकामासाठी मंजुरी, ज्यापैकी 12 हजार किमी रस्ते पूर्ण झाले आहेत.

**9,233** टॉवर्स नक्षलग्रस्त भागांमधील दूरसंचार संपर्क सुधारण्यासाठी उभारण्यात आले.

**6,025** टपाल कार्यालये आर्थिक समावेशनासाठी टपाल कार्यालयांनी नक्षलग्रस्त विकसित जिल्ह्यांमध्ये बँकिंग सेवांसह उघडली.

- कौशल्य विकासासाठी 46 औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि 49 कौशल्य विकास केंद्रे उघडण्यात आली.
- आदिवासी भागांमध्ये दर्जेदार शिक्षणासाठी 259 एकलव्य मॉडेल निवासी शाळा सुरू करण्यात आल्या.

### डाव्या विचारसरणीच्या अतिरेकी कारवायांनी प्रभावित जिल्ह्यांमध्ये उघडल्या

**1,804** बँक शाखा

**1,321** एटीएम

**37,850** बँकिंग करस्पॉन्डंट



- विशेष केंद्रीय सहाय्यता योजनेअंतर्गत, सर्वाधिक डाव्या विचारसरणीच्या अतिरेक्यांचा प्रभाव असलेल्या जिल्ह्यांमधील सार्वजनिक पायाभूत सुविधांमधील कमतरता दूर करण्यासाठी 2017 मध्ये योजना सुरू झाल्यापासून आतापर्यंत 3,953.67 कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2 ऑक्टोबर 2024 रोजी झारखंडमधून 'धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान' सुरू केले. या अभियानाचा उद्देश 15,000 हून अधिक गावांना मूलभूत सुविधा पुरवणे हा आहे. यासोबतच विकासाला गती देण्यासाठी आणि लोकांना उत्तम सेवा देण्यासाठी सरकार या भागांमध्ये रस्ते जोडणी, मोबाईल जोडणी आणि आर्थिक जोडणी या तीन 'सी'ना सातत्याने मजबूत करत आहे.

भारत सरकारने कोणताही गोंधळ न ठेवता एक स्पष्ट धोरण स्वीकारले. राज्य पोलीस आणि केंद्रीय सुरक्षा दलांना यातून वगळण्यात आले. याशिवाय गुप्तचर माहिती, माहितीची देवाणघेवाण आणि परिचालन समन्वयासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकारांमध्ये एक व्यावहारिक दुवा प्रस्थापित करण्यात आला. अवैध शस्त्रपुरवठ्याला आळा घालण्यात आला. 2019-26 या काळात नक्षलवाद्यांची शस्त्र पुरवठा साखळी विस्कळीत करण्यात यश मिळवले. राष्ट्रीय तपास संस्था आणि अंमलबजावणी संचालनालयाने नक्षलवाद्यांना निधी पुरवणाऱ्यांवर कारवाई केली. याशिवाय, शहरी नक्षलवादी समर्थन, कायदेशीर मदत आणि माध्यमांद्वारे विशिष्ट वृत्त तयार करण्याविरोधात कठोर उपाययोजना करण्यात आल्या. केंद्रीय समितीच्या दस्यांवर लक्ष्यित कारवाई करण्यात आली. ऑपरेशन ऑक्टोपस आणि ऑपरेशन




**240** खाटांचे सुपर-स्पेशालिटी रुग्णालय जगदलपूरमध्ये बांधण्यात आले. या भागात पूर्वी प्राथमिक आणि सामुदायिक आरोग्य केंद्रेही नव्हती.

**2,212** कोटी रुपयांचे काम नागरी कार्यक्रमांतर्गत आरोग्य शिबिरे आणि औषधांसाठी झाले.

- आदिवासी युवकांसाठी आदान-प्रदान कार्यक्रम आयोजित करण्यात आले.
- राज्यांसाठी एक विशेष सुरक्षा खर्च उपक्रम सुरू करण्यात आला.

**3,000** कोटी रुपये 10 वर्षांत देण्यात आले.

**5,000** कोटी रुपये विशेष इंफ्रास्ट्रक्चर योजनेसाठी देण्यात आले.

**2,000** कोटी रुपये अधिक विस्तारित विशेष इंफ्रास्ट्रक्चर योजनेसाठी देण्यात आले.

**4,000** कोटी रुपये केंद्रीय निधीद्वारे क्रिटिकल पब्लिक इंफ्रास्ट्रक्चरसाठी देण्यात आले.

## बस्तरच्या विकासाला नवीन आयाम

- बस्तरमधून नक्षलवाद जवळजवळ संपुष्टात आला आहे.
- यासाठी बस्तरमधील प्रत्येक गावात शाळा बांधण्याची मोहीम सुरू करण्यात आली.
- प्रत्येक गावात शिधावाटपाचे दुकान उघडण्याची मोहीम सुरू करण्यात आली.
- सर्व तालुका पंचायतींमध्ये सीएचसी / पीएचसी बांधण्यात आली.
- आधार कार्ड आणि रेशन कार्ड तयार झाली. 5 किलो मोफत शिधा आणि गॅसशेगड्यांची सुविधा उपलब्ध झाली.
- बस्तर ऑलिम्पिक्स आणि बस्तर पंडुमच्या माध्यमातून खेळांना प्रोत्साहन देण्यात आले.

**1.20** लाख कलाकारांनी बस्तर पंडुम मध्ये सहभाग नोंदवला.

**5.50** लाख आदिवासींनी खेळांमध्ये भाग घेतला.



डबल बुल यांसारख्या लक्ष्यित मोहिमा राबवण्यात आल्या. डीआरजी, एसटीएफ, सीआरपीएफ आणि कोब्रा यांच्यासाठी संयुक्त प्रशिक्षणही सुरू करण्यात आले. या चौघांनी मिळून मोहिमा राबवल्या. यासोबतच न्यायवैद्यक तपासही सुरू करण्यात आला, लोकेशन ट्रॅकिंग सिस्टीम उपलब्ध करून देण्यात आली आणि मोबाईल फोनच्या हालचालींचा डेटा राज्य पोलिसांना उपलब्ध करून देण्यात आला. सायंटिफिक कॉल लॉग विश्लेषणासाठी सॉफ्टवेअर विकसित करण्यात आले आणि सोशल मीडिया विश्लेषणाच्या सहाय्याने त्यांच्या लपलेल्या समर्थकांना शोधण्याचे काम झाले. यामुळे नक्षलविरोधी मोहिमेला केवळ गतीच मिळाली नाही, तर परिणामही दिसून आले.




## नक्षलमुक्त भारत – एक युगप्रवर्तक तारीख

31 मार्च, 2026 ही भारताच्या इतिहासातील एक युगप्रवर्तक तारीख ठरली आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी बहुआयामी रणनीती अवलंबण्यात आली. यात सुरक्षा दलांच्या कठोर मोहिमा, व्यापक विकास उपक्रम आणि पुनर्वसन धोरणे यांचा समावेश होता. आंतर-संस्थात्मक सहकार्याने माओवादी जाळे नष्ट करण्यात आणि प्रभावित भागांमध्ये शांतता प्रस्थापित करण्यात अभूतपूर्व यश आले. अशी आव्हाने पूर्णपणे निपटून टाकण्यासाठी सरकारने एक विशिष्ट तारीख निश्चित करून ती साध्य करण्याची ही पहिलीच वेळ आहे. ऑगस्ट 2024 मध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी स्पष्टपणे सांगितले होते की 31 मार्च, 2026 पूर्वी छत्तीसगडसह संपूर्ण देशातून नक्षलवाद ही भूतकाळातील गोष्ट बनेल. त्यांनी अनेक प्रसंगी पुनरुच्चार करत देशाला आणि नागरिकांना याचा निर्वाळा दिला होता. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सुरक्षा दलांनी अनेक मोहिमा राबवल्या केल्या. 2022 मध्ये बिहारच्या बूढा पहाड प्रदेशात 'ऑपरेशन ऑक्टोपस' राबविण्यात आले. त्याच वर्षी गुमला, लोहरदगा आणि लातेहार येथे 'ऑपरेशन डबल बुल' राबविण्यात आले आणि हे तिन्ही भाग काही दिवसांतच नक्षलमुक्त झाले.

*गेल्या एक वर्षातच 2,100 हून अधिक नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे, 900 हून अधिक जणांना अटक करण्यात आली आहे आणि शस्त्रे सोडण्यास तयार नसलेल्या 300 हून अधिक कट्टर नक्षलवाद्यांना सुरक्षा दलांनी कंठस्नान घातले आहे. परिणामी, एकेकाळी भीतीच्या छायेत जगणाऱ्या भागांमध्ये आता विकासाची नवी ऊर्जा संचारली आहे.*

**–नरेंद्र मोदी, पंतप्रधान**




*काय आहे माओवादी विचारसरणी? तिचे ब्रीदवाक्य काय आहे? जेव्हा आपल्याला स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा आपण घोषणा दिली 'सत्यमेव जयते', सत्याचा नेहमीच विजय होवो, सत्याचाच विजय होतो. पण त्यांचे ब्रीदवाक्य आहे, 'सत्ता बंदुकीच्या गोळीतून निघते'. त्यातील 'सत्ता' हा शब्द विकास नव्हे, तर त्यांच्या विचारसरणीचे अस्तित्व सूचित करतो. येथे विकासाचा लवलेशही नाही. त्यांचा लोकशाहीवर विश्वास नाही.*

***–अमित शाह, केंद्रीय गृह मंत्री***

याचप्रमाणे 1-3 सप्टेंबर 2022 दरम्यान झारखंडमधील सरायकेला, पश्चिम सिंहभूम आणि खुंटी जिल्ह्यांमध्ये 'ऑपरेशन थंडरस्टॉर्म' राबविण्यात आले. जून-जुलै 2022 मध्ये मुंगेर जिल्ह्यात 'ऑपरेशन भीमबांध' राबविण्यात आले. बिहारमधील गया आणि औरंगाबाद जिल्ह्यांमध्ये 'ऑपरेशन चक्रबांध' राबविण्यात आले. मे 2025 मध्ये सुरक्षा दलांनी छत्तीसगड-तेलंगणा सीमेवरील करेंगुट्टालू टेकडीवर नक्षलवादाविरोधातील सर्वात मोठ्या कारवाईत 31 नक्षलवाद्यांना ठार करून नक्षलमुक्त भारताच्या संकल्पात ऐतिहासिक यश मिळवले. एकेकाळी जिथे लाल दहशतीचे राज्य होते, त्या करेंगुट्टालू टेकडीवर आता तिरंगा अभिमानाने फडकत आहे.

ही एक अशी मोहीम होती जी सुरक्षा दलांनी अवघ्या 21 दिवसांत पूर्ण केली. ही आतापर्यंतची सर्वात मोठी नक्षलविरोधी मोहीम ठरली, ज्यात सुरक्षा दलांचे कोणतेही नुकसान झाले नाही. एक ऐतिहासिक कामगिरी करत सुरक्षा दलांनी नारायणपूरमध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे (माओवादी) सरचिटणीस नंबला केशवराव उर्फ बसवराजू याच्यासह 27 कुख्यात नक्षलवाद्यांना कंठस्नान घातले. बसवराजू हे माओवादी चळवळीचा कणा होते. तीन दशकांनंतर माओवाद्यांचा इतका मोठा नेता मारला गेला. ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्टनंतर विविध राज्यांमध्ये 54 माओवाद्यांना अटक करण्यात आली आणि 84 जणांनी आत्मसमर्पण केले.

## लाल कॉरिडॉर विकासाच्या हिरव्या क्षेत्रात रूपांतरित होत आहे

गेले एक दशक शांतता आणि प्रगतीचा कालखंड राहिला आहे. बऱ्याच काळापासून देश विविध हिंसक घटनांचा बळी ठरत होता. मग तो दहशतवाद असो वा नक्षलवाद. काही आधी सुरू झाल्या, तर काही नंतर. तथापि आज नक्षलवाद आणि माओवाद समूळ नष्ट करून देशाच्या सुरक्षा दलांनी केवळ लोकांमध्ये सुरक्षिततेची प्रबळ भावनाच निर्माण केली नाही, तर देशाला जलद प्रगतीच्या दिशेनेही नेले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात, 'देशभरातील शेकडो जिल्हे नक्षलवादाच्या विळख्यातून मुक्त झाल्यानंतर स्वातंत्र्याचा निःश्वास टाकत आहेत. आम्हाला अभिमान आहे

## विशेष न्यायालये आणि तपास यंत्रणा

- एनआयए बळकट करण्यात आली आणि नक्षलवाद-प्रभावित राज्यांमध्ये राज्य तपास यंत्रणा (एस आय ए) स्थापन करण्यात आल्या.
- छत्तीसगडमध्ये चार नक्षलवाद विशेष न्यायालये स्थापन करण्यात आली आणि इतर राज्यांमध्येही स्वतंत्र न्यायालये स्थापन करण्यात आली.

**280** नवीन शिबिरे सुरक्षेतील त्रुटी दूर करण्यासाठी 2019 पासून स्थापन करण्यात आली, 15 नवीन संयुक्त कार्यदले तयार करण्यात आली तसेच विविध राज्यांमध्ये राज्य पोलिसांना मदत करण्यासाठी 6 सीआरपीएफ बटालियन तैनात करण्यात आल्या.





*2014 नंतर काय बदलले? केंद्रीय सशस्त्र पोलीस दल तर तेच आहे. राज्य पोलीस तेच आहेत. 2014 नंतर स्पष्ट धोरण आणि प्रबळ राजकीय इच्छाशक्ती कृतीत आणली गेली. नरेंद्र मोदींनी हे स्पष्ट केले की, या देशाच्या कोणत्याही कोपऱ्यात, मग ते काश्मीर असो, ईशान्य भारत असो किंवा डाव्या विचारसरणीच्या अतिरेकीवादाचा प्रसार असो, बेकायदेशीर कारवाया सहन केल्या जाणार नाहीत. त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल.*

**-अमित शाह, केंद्रीय गृह मंत्री**

की बॉम्ब आणि बंदुकांच्या समोर आपल्या देशाचे संविधान विजयी होत आहे. हे स्पष्ट आहे की देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी, जे कालपर्यंत होते, लाल कॉरिडॉर, ते आता हरित विकास क्षेत्रांमध्ये रूपांतरित होत आहेत.' नक्षलवादी प्रभावित राज्यांमध्ये, विशेषतः छत्तीसगडमध्ये दिसून आलेला बदल आश्चर्यकारक आणि प्रेरणादायी आहे. एके काळी नक्षलवाद आणि मागासलेपणासाठी ओळखले जाणारे हे राज्य आता समृद्धी, सुरक्षा आणि स्थिरतेचे प्रतीक बनले आहे. आज बस्तर ऑलिम्पिकची चर्चा देशाच्या कानाकोपऱ्यात होत आहे.

बीजापूरमधील चिलकापल्ली गावात सात दशकांत पहिल्यांदाच वीज पोहोचली. अबूझमाडमधील रेकावया गावात स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच शाळेचे बांधकाम सुरू झाले आहे. आज, त्या प्रभावित भागांतील गावांमध्ये विकासाची लाट पसरत आहे. लाल झेंड्याच्या जागी आता तिरंगा अभिमानाने फडकत आहे. आज बस्तरसारख्या भागांमध्ये भीतीचे नव्हे, तर उत्सवाचे वातावरण आहे.


यात काही संदेह नाही की 2014 नंतर केंद्र सरकारने भरकटलेल्या तरुणांना पुन्हा मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संवेदनशील प्रयत्न केले आहेत. त्यामुळे ऑक्टोबर 2025 मध्ये एका कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, 'गेल्या दशकात हजारो नक्षलवाद्यांनी शस्त्रे खाली ठेवली आहेत. मी तुम्हाला गेल्या 75 तासांची आकडेवारी देतो, पण ही माझ्या आयुष्यातील अत्यंत समाधानाची बाब आहेः या 75 तासांत 303 नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. जे एकेकाळी सत्तेत होते, त्यांनी आत्मसमर्पण केले आहे. हे काही सामान्य नक्षलवादी नाहीत; काहींवर 1 कोटी रुपयांचे, काहींवर 15 लाख रुपयांचे, तर काहींवर 5 लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते आणि ही सर्व बक्षिसे त्यांच्या नावावर जाहीर करण्यात आली होती. या नक्षलवाद्यांकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रेही जप्त करण्यात आली आहेत. त्या सर्वांनी बंदुका आणि बॉम्ब टाकून दिले आहेत आणि ते भारताच्या संविधानाचा स्वीकार करण्यास तयार आहेत. जेव्हा संविधानाला पूर्णपणे समर्पित सरकार असते, तेव्हा जे भरकटले आहेत तेसुद्धा परत येतात आणि त्या संविधानावर आपले लक्ष केंद्रित करतात. 'आता ते विकासाच्या मुख्य प्रवाहात आहेत. लोक हे मान्य करत आहेत की त्यांनी अनेक दशके चुकीच्या रस्त्यावर घालवली, आपले तारुण्य वाया घालवले, पण त्यांना कोणताही बदल दिसलेला नाही. आता हे भारताच्या संविधानाचे

# राष्ट्रीय धोरण
## नव्या भारताच्या राजकारणाचा पाया

*नवा भारत एका नव्या आत्मविश्वासाने पुढे वाटचाल करत आहे, आव्हानांना न घाबरता त्यांचा सामना करत आहे. म्हणूनच केवळ देशांतर्गतच नव्हे, तर आखाती देशांपासून ते ग्लोबल वेस्टपर्यंत आणि ग्लोबल साऊथपासून ते शेजारी देशांपर्यंत, भारत हा सर्वांसाठी एक विश्वासू भागीदार आहे. सध्याच्या जागतिक परिस्थितीवर आणि आव्हानांवर भाष्य करत टीव्ही९ शिखर परिषद 2026 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिले स्पष्ट संदेश ...*

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

> हा नवा भारत आहे, तो आपल्या विकासासाठी कोणतीही कसर सोडत नाही.
>
> पक्षीय हितापेक्षा राष्ट्रीय हिताला प्राधान्य देणे अत्यावश्यक आहे, कारण राष्ट्र आणि त्याच्या विकासाला राजकारणाच्या वरचे स्थान असते.
>
> राष्ट्रीय हिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याची हीच प्रेरणा भारताला विकसित आणि आत्मनिर्भर बनवेल.




## पंतप्रधानांच्या भाषणातील काही अंश

### आत्मविश्वासाने परिपूर्ण... कृतीमध्ये उतरणारे संकल्प

भारत आता आव्हाने टाळत नाही, तर त्यांचा सामना करतो. गेल्या 5-6 वर्षांकडे पाहा, कोरोना महामारीनंतर आव्हाने एकामागून एक वाढतच गेली आहेत. असे एकही वर्ष नाही, ज्याने भारताची आणि भारतीयांची परीक्षा घेतली नाही. परंतु 140 कोटी देशवासीयांच्या एकजुटीच्या प्रयत्नांनी भारत प्रत्येक संकटाचा सामना करत पुढे वाटचाल करत आहे. पूर्वीदेखील योजना आखल्या जात होत्या, पण आज त्यांचे परिणामही दिसत आहेत. पूर्वी गती मंद होती, आज भारत फास्ट ट्रॅकवर आहे. पूर्वी शक्यताही अंधारात होत्या, आज संकल्पांचे रूपांतर यशात होत आहे. त्यामुळे जगालाही हा संदेश मिळत आहे की हा एक नवा भारत आहे. तो आपल्या विकासासाठी कोणतीही कसर सोडत नाही.

### युद्धकाळातही दिसत असणारे सामर्थ्य


यावेळी युद्धाच्या परिस्थितीतही भारताची धोरणे आणि रणनीती पाहून, भारताचे सामर्थ्य पाहून जगभरातील अनेक देश चकित झाले आहेत. आपल्याकडे एक म्हण आहे: 'सत्याला इजा पोहोचवता येत नाही.' 28 फेब्रुवारीपासून जगामध्ये जी उलथापालथ होत

# जागतिक उलथापालथ....
## तरीही विकासमार्गावर भारत

या सर्व जागतिक उलथापालथीच्या काळातही भारताने आपल्या प्रगतीचा वेग कायम राखला आहे. 28 फेब्रुवारी रोजी युद्ध सुरू झाल्यापासूनच्या केवळ 23 दिवसांचा आढावा घेतला तर, देशभरात पूर्व ते पश्चिम, उत्तर ते दक्षिण हजारो कोटी रुपयांचे विकास प्रकल्पांचे काम झाले. ही सर्व पावले या गोष्टीची साक्ष देतात की विकसित भारत घडवण्यासाठी देश किती वेगाने काम करत आहे.

- दिल्ली मेट्रो रेल्वेच्या महत्त्वपूर्ण मार्गांचे लोकार्पण
- सिलचर येथे हाय-स्पीड कॉरिडॉरची पायाभरणी
- कोटा येथे नवीन विमानतळाची पायाभरणी
- मदुराई विमानतळाला आंतरराष्ट्रीय विमानतळाचा दर्जा
- औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी एका भव्य योजनेला मंजुरी


**2028** पर्यंत जल जीवन मिशन वाढवण्याचा निर्णय



- पीएम किसान सन्मान निधी अंतर्गत 18 हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात हस्तांतरित
- आपल्या एमएसएमई निर्यातदारांसाठी सुमारे 500 कोटी रुपयांचे मदत पॅकेजही जाहीर

## मूल्यांकनातून नव्या शक्यतांचा जन्म होतो

व्यवस्थापनाच्या जगात 'ज्याचे मोजमाप केले जाते, त्याचेच व्यवस्थापन होते' असे एक तत्त्व आहे. पण मला त्यात आणखी एक गोष्ट जोडायची आहे: ज्याचे मोजमाप केले जाते, त्यात सुधारणा होते आणि अंतिमतः त्याचे रूपांतर होते. कारण मूल्यांकनामुळे जागरूकता निर्माण होते. मूल्यांकनामुळे उत्तरदायित्व निश्चित होते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मूल्यांकनातून नव्या शक्यतांचा जन्म होतो. जर तुम्ही 2014 पूर्वीची 10-11 वर्षे आणि 2014 नंतरची 10-11 वर्षे यांचे मूल्यांकन केले, तर तुमच्या लक्षात येईल की, याच तत्त्वाचे पालन करून भारताने प्रत्येक क्षेत्रात कसे परिवर्तन घडवले आहे. उदाहरणार्थ,




आहे त्या कठोर, प्रतिकूल परिस्थितीतही भारत प्रगती, विकास आणि विश्वासाच्या दृढ निश्चयाने पुढे वाटचाल करत आहे. या 23 दिवसांत भारताने संबंध निर्माण करण्याची, निर्णय घेण्याची आणि संकटे हाताळण्याची आपली क्षमता दाखवून दिली आहे.

### राष्ट्रहित, शांतता आणि संवादाच्या बाजूला आहे भारत

आज जेव्हा जग इतक्या साऱ्या गटांमध्ये विभागले गेले आहे, तेव्हा भारताने अभूतपूर्व आणि अकल्पनीय संबंध निर्माण केले आहेत. आखाती देशांपासून ते ग्लोबल वेस्टपर्यंत, ग्लोबल साऊथपासून ते शेजारी देशांपर्यंत भारत सर्वांसाठी एक विश्वासू भागीदार आहे. काही लोक विचारतात, 'आपण कोणासोबत आहोत?' माझे त्यांना उत्तर आहे: आम्ही भारतासोबत आहोत, आम्ही भारताच्या हितासोबत आहोत, आम्ही शांततेसोबत आहोत आणि आम्ही संवादासोबत आहोत. भूतकाळात निर्माण झालेल्या विकासातील विषमतेचे संधींमध्ये रूपांतर करणे, हा आज आमचा प्रयत्न आहे. पूर्व भारत साधनसंपत्तीने समृद्ध आहे आणि ज्यांनी तिथे अनेक दशकांपासून सरकारे चालवली आहेत.


### राष्ट्राचे भविष्य सर्वोपरि

जेव्हा राष्ट्रधोरण हे राजकारणाचा मुख्य आधार असते, तेव्हा देशाचे भविष्य सर्वोपरि असते. परंतु जेव्हा राजकारणात वैयक्तिक स्वार्थाचे वर्चस्व असते, तेव्हा लोक राष्ट्राऐवजी स्वतःच्या भविष्यावर मध्ये विचार करतात. आपण

## पूर्व भारताचा विकास

आज आमचा प्रयत्न असा आहे की, भूतकाळामध्ये ज्या प्रकारे असंतुलित विकास झाला होता, त्याचेच रूपांतर आता संधीमध्ये केले जावे. ईशान्य भारत अमर्याद स्त्रोतांनी समृद्ध आहे. अनेक दशके ज्यांनी सत्तेचा उपभोग घेतला, त्यांनी विकासाच्या बाबतीत तुलनेने ईशान्य भारताची उपेक्षा केली. विकासाला खिळ घातली होती. आता परिस्थितीमध्ये बदल घडून येत आहे.

- आसाममध्ये कधी काळी बंदुकीच्या गोळ्यांचे आवाज ऐकायला येत होते, आज तिथेच सेमीकंडक्टरची निर्मिती केली जात आहे.
- ओडिशामध्ये सेमीकंडक्टर पासून पेट्रोकेमिकल्स पर्यंत अनेक नवनवीन क्षेत्रांचा विकास होत आहे.
- बिहारमध्ये 6-7 दशकांमध्ये गंगा नदीवर केवळ एक मोठा पूल बनवला गेला होता. त्याच बिहारमध्ये गेल्या एका दशकामध्ये पाचपेक्षा जास्त नवीन पूल बांधले गेले आहेत.
- उत्तर प्रदेशातील कट्टा म्हणजे पिस्तुलांच्या कारखान्यांचे कथावर्णन केले जात होते. आता उत्तर प्रदेशाची नवीन ओळख मोबाइल फोन निर्मितीचे केंद्र म्हणून होत आहे.
- पूर्व भारतातील एक मोठे राज्य असलेले पश्चिम बंगाल हे एकेकाळी भारताचे सांस्कृतिक, शैक्षणिक, औद्योगिक आणि व्यापाराचे केंद्र होते. याच कारणामुळे गेल्या 11 वर्षांमध्ये केंद्र सरकारने येथील विकास कामांमध्ये खूप मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली आहे.



## लोकशाहीमध्ये विरोध आणि विद्वेष यांच्यामध्ये रेषा असणे गरजेचे

ज्यावेळी राजकारणामध्ये विरोध हा विकासाच्या विरोधामध्ये बदलला जातो, त्यावेळी केल्या जाणाऱ्या टीकेमधून देशाने केलेल्या कामगिरीवर प्रश्न उपस्थित होतात. अशावेळी ही गोष्ट फक्त सरकारच्या विरोधाबाबत नसते. तर देशाच्या प्रगतीमुळे अस्वस्थ मानसिकता बनल्याचे दिसून येते. आजची स्थिती अशी आहे की, देशाने केलेल्या प्रत्येक कामगिरीवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. सरकारचा प्रत्येक प्रयत्न अयशस्वी व्हावा, अशी भावना व्यक्त केली जाते. लोकशाहीमध्ये विरोध करणे गरजेचे आहे; परंतु विरोध आणि विद्वेष यांच्यामध्ये एक रेषा असली पाहिजे. सरकारला विरोध करण्याचा अधिकार लोकशाहीने दिला आहे. परंतु देशाला बदनाम केले गेले तर मात्र इथे 'नियत' कशी आहे, यावर प्रश्नचिन्ह निर्माण होते.

- कोविडच्या काळामध्ये देशाने आपली प्रतिबंधात्मक लस तयार केली. विरोधी पक्षांनी त्याबाबतही संशय व्यक्त केला. 'मेक इन इंडिया'ची चर्चा सुरू झाली, त्यावेळी विरोधक म्हणाले, हा उपक्रम यशस्वी होणार नाही. 'बब्बर शेर' असे संबोधन वापरून या उपक्रमाची खिल्ली उडवण्यात आली.
- ज्यावेळी देशामध्ये 'डिजिटल इंडिया' अभियान सुरू झाले, त्यावेळीही विरोधकांनी त्याची टिंगल केली. परंतु आज भारताने संपूर्ण जगामध्ये सर्वात मोठा लसीकरणाचा कार्यक्रम यशस्वी केल्याचे उदाहरण सर्वांसमोर ठेवले. भारत डिजिटल पेमेंटमध्ये विश्वामध्ये अव्वल देश आहे. भारत उत्पादन आणि स्टार्टअपमध्ये नवनवीन उंची गाठून विक्रम नोंदवत आहे.



- ग्लोबल वैश्विक एआय शिखर परिषदेमध्ये संपूर्ण जगभरातून आलेले प्रतिनिधी उपस्थित होते. अशा स्थानी विरोधक कपडे फाडण्यासाठी तिथे पोहोचले. या लोकांना देशाच्या प्रतिष्ठेची किती पर्वा आहे, हे यावरूनच समजते. म्हणूनच देशहिताला कोणत्याही पक्ष-दलहितापेक्षा सर्वोपरी ठेवण्याची आज आवश्यकता आहे. कारण अखेरीस कोणत्याही राजकारणापेक्षा सर्वोच्च स्थानी राष्ट्र असते आणि राष्ट्राचा विकास असतो.

जरा स्मरण करावे, 2004 ते 2010 या काळामध्ये काय झाले होते? ज्यावेळी पेट्रोल-डिझेल आणि गॅसच्या किंमतीवर संकट आले होते, त्यावेळी एक लाख अठ्ठेचाळीस हजार कोटी रूपयांचे 'ऑईल बॉन्ड' जारी करण्यात आले होते. पंतप्रधान मनमोहन सिंह यांनी स्वतःच सांगितले होते की, आपले सरकार यामुळे आता भावी पिढीवर कर्जाचा बोझा टाकत आहेत. या बॉन्डचे री-पेमेंट 2020 च्या नंतर केले जाणार होते. गेल्या 5-6 वर्षांमध्ये 1 लाख 48 हजार कोटी रूपयांच्या ऐवजी देशाला 3 लाख कोटी रूपयांचे जास्तीचे पेमेंट देशाला करावे लागले. कारण आधीच्या रकमेवर व्याजही चढले होते.

## संयम आणि संवेदनशीलतेचा काळ

आजच्या परिस्थितीमध्ये कोणताही देश या युद्धाच्या दुष्परिणामांपासून दूर राहू शकत नाही. कारण युद्धाचे वाईट परिणाम अटळ आहेत. सध्या अनेक देशांमध्ये तर स्थिती खूपच गंभीर बनली आहे. हा काळ संयम ठेवण्याचा आणि संवेदनशीलता दाखवण्याचा आहे. आपण सर्वांनी कोरोना महासंकटाचा सामना केला. त्याचे कितीतरी सार्थक परिणामही आपण अनुभवत आहोत. आताही अशीच भावना ठेवून आपण सर्वांनी या युद्ध स्थितीमुळे निर्माण होत असलेल्या संकटांचे आव्हान पेलायचे आहे. ■

# सुधारित उडान योजना



# भारत औद्योगिक विकास योजनेला मंजूरी

*केंद्रीय मंत्रिमंडळाने सुधारित उडान योजनेला मंजूरी दिली आहे. आता या योजनेतून नवीन 100 विमानतळे, 200 हेलिपॅड आणि 441 धावपट्ट्यांची निर्मिती केली जाईल. त्यामुळे नवीन क्षेत्रांपर्यंत हवाई सेवेचा विस्तार होईल आणि लोकांना सहज, सुलभ विमान प्रवासाचा लाभ घेता येईल. भारताच्या औद्योगिक विकासाची गती वाढविण्याच्या दिशेने एक महत्वपूर्ण आणि मोठे पाऊल टाकताना भारत औद्योगिक विकास योजनेला (भव्य) मंजूरी देण्यात आली आहे. याशिवाय, इतर काही महत्वपूर्ण प्रस्तावांनाही दिली गेली मंजूरी...*

**निर्णय : भारत सरकारने अंदाजपत्रकीय सहयोगाने 28,840 कोटी रूपये एकूण खर्चाबरोबरच आर्थिक वर्ष 2026-27 ते 2035-36 पर्यंतच्या दहा वर्षांच्या कालावधीसाठी क्षेत्रीय संपर्क कार्यक्रमाअंतर्गत - सुधारित उडान योजनेच्या प्रारंभाला आणि अंमलबजावणीला दिली मंजूरी.**

**प्रभाव :**

- ज्याठिकाणी हवाई संपर्क कमी आहे, अथवा जे क्षेत्र हवाई सेवेपासून वंचित आहे, तिथे क्षेत्रीय हवाई संपर्क व्यवस्थेमध्ये सुधारणा होईल.
- दुसऱ्या आणि तिसऱ्या स्तरावरील शहरांमध्ये आर्थिक विकास आणि व्यापार तसेच पर्यटन यांना प्रोत्साहन मिळेल.
- सर्वसामान्य नागरिकांसाठी किफायतशीर दरामध्ये विमान प्रवासाची सुविधा वाढेल.
- दुर्गम आणि डोंगराळ भागांमध्ये आपत्कालीन प्रतिसाद आणि आरोग्यसेवेची उपलब्धता सुधारणे
- क्षेत्रीय विमानतळ आणि विमान सेवा चालक संस्थांच्या दृष्टीने अधिक व्यवहार्यता आणि स्थिरता निर्माण होईल.
- आत्मनिर्भर भारताअंतर्गत स्वदेशी हवाई क्षेत्रांना प्रोत्साहन मिळेल.
- विकसित भारत 2047 चे लक्ष्य गाठण्यासाठी प्रगती होईल.

**निर्णय : भारत औद्योगिक विकास योजना (भव्य) च्या माध्यमातून नवीन युगातील 'प्लग अँड प्ले' औद्योगिक विकासाला मंजूरी.**

**प्रभाव :** या अंतर्गत देशभरामध्ये 100 'प्लग अँड प्ले' औद्योगिक पार्क विकसित करण्यासाठी 33,660 कोटी रूपयांचा निधी देण्यात आला आहे.

- योजनेचा उद्देश्य, विश्वस्तरीय औद्योगिक पायाभूत सुविधा विकसित करणे, उत्पादनाच्या संधींना मुक्तव्दार करून देणे आणि भारताच्या विकासगाथेच्या प्रवासाला गती देणे आहे.
- योजनेअंतर्गत 100 ते 1000 एकरांपर्यंत औद्योगिक पार्क विकसित करण्यात येतील. प्रति एकर एक कोटी रूपयांपर्यंत आर्थिक मदत प्रदान केली जाईल.
- या औद्योगिक पार्कमध्ये आधुनिक पायाभूत सुविधा आणि श्रमिकांसाठी घरकूल योजनेचा समावेश असणार आहे.
- 'भव्य' योजनेमुळे मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होतील, अशी आशा आहे. यामुळे उत्पादन, वाहतूक आणि सेवा क्षेत्रांमध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

**निर्णय : कापूस उत्पादकांना प्रत्यक्ष मदत करण्याच्या उद्देश्याने 2023-24 च्या हंगामासाठी भारतीय कापूस महामंडळाला 1,718.56 कोटी रूपयांचा 'एमएसपी' निधी देण्यास मंजूरी.**

**प्रभाव :** हा निधी 'एमएसपी' म्हणजेच किमान समर्थन मूल्यापेक्षा बाजारभाव कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य भाव देण्यासाठी उपयोगी ठरेल.

- सीसीआयने कापूस उत्पादक 11 प्रमुख राज्यांमध्ये एक मजबूत खरेदी नेटवर्क तयार केले आहे. यामध्ये 152 जिल्ह्यांमध्ये 508 पेक्षा अधिक कापूस खरेदी केंद्रे कार्यरत आहेत. या केंद्रांचे काम विनाव्यत्यय सुरू असल्यामुळे कापसाची सुलभ खरेदी सुनिश्चित होत आहे.
- 'एमएसपी'संबंधीच्या माहितीचा प्रसार करणे, कापूस गाठींची ओळख पटवणे आणि पत्ता शोधण्यासाठी कार्यप्रणालीची अंमलबजावणी करणे आणि 'कॉट-एली' या मोबाइल ॲपचा प्रारंभ केल्यामुळे कापूस खरेदी प्रक्रिया आणि शेतकरी बांधवांपर्यंत पोहोचणे शक्य होत आहे.
- कापूस उत्पादनावर जवळपास 60 लाख शेतकरी बांधवांना उत्पन्न मिळते. कापसावर प्रक्रिया करणे, व्यापार आणि वस्त्रोद्योगासहित इतर संबंधित कामांमध्ये 4 ते 5 कोटी लोकांना रोजगार मिळण्यासाठी मदत होते.

**निर्णय : उत्तर प्रदेशातील बाराबंकी ते बहराइचपर्यंतच्या चौपदरी प्रवेश नियंत्रित राष्ट्रीय महामार्ग 927 च्या निर्माण कार्याला मंजूरी.**

- **लांबी: 101.515 किलोमीटर**
- **खर्च: 6,969.04 कोटी रूपये.**
- **निर्माण पद्धती: हायब्रिड एन्युटी मोड**

**प्रभाव :** बाराबंकी आणि बहराइच जिल्ह्यातील शहरी क्षेत्रांमध्ये रस्ता निर्माणाची मोठी समस्या आहे. टोकदार वळणे आणि होत असलेली गर्दी पाहता, या महामार्गाच्या कामामुळे विविध समस्यांवर तोडगा निघणार आहे.

- प्रवास अधिक सुरक्षित आणि वेगवान बनविण्याची गरज आहे. त्यामुळे प्रवासाला लागणार वेळ कमी होईल आणि वाहनासाठी लागणाऱ्या इंधानामध्ये बचत होईल.
- बाराबंकी-बहराइच यांच्या दरम्यान विनाव्यत्यय प्रवास आणि संपर्क झाल्यास आर्थिक, सामाजिक, आणि वाहतूक केंद्रांना आजूबाजूच्या गावांबरोबर संपर्क साधणे शक्य होईल.
- पीएम गतीशक्ती योजनेनुसार बहराइच आणि श्रावस्ती क्षेत्रांच्या संपर्क यंत्रणेमध्ये सुधारणा होईल.
- नेपाळगंज सीमेच्या माध्यमातून भारत-नेपाळ संपर्क व्यवस्था बळकट होईल. रूपईडीहा भू-बंदरापर्यंत पोहोचण्याचा मार्ग सुनिश्चित होईल.

मंत्रिमंडळाच्या निर्णयांवरील पत्रकार परिषद पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.



**निर्णय : आर्थिक वर्ष 2026-27 ते आर्थिक वर्ष 2030 -31 या कालावधीसाठी लघु जलविद्युत (एसएचपी) विकास योजनेला मंजूरी.**

**प्रभाव :** या अंतर्गत जवळपास 1,500 मेगावॅट क्षमतेच्या एसएचपी प्रकल्पांची उभारणी करण्यात येईल. त्यासाठी 2,584.60 कोटी रूपये खर्च करण्यात येईल.

- विशेष विशेषत्वाने दुर्गम, डोंगराळ भागामध्ये तसेच ईशान्येकडील राज्यांना या योजनेचा लाभ मिळू शकेल. अशा प्रकारच्या लहान विद्युत निर्मिती प्रकल्पांची उभारणी करण्यासाठी ईशान्येकडील राज्यांमध्ये अपार संभावना आहे.
- अशा वीज प्रकल्पांच्या निर्मिती काळात 51 लाख मनुष्यबळ दिवस इतक्या रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची शक्यता आहे.

**निर्णय : हवामान परिवर्तनाविषयी संयुक्त राष्ट्र आराखडा परिषदेने सूचित केल्याप्रमाणे भारताच्या राष्ट्रीय स्तरावरील निर्धारित योगदानाला 2031 ते 2035 या कालावधीसाठी मंजूरी.**

**प्रभाव :** 2005 ते 2020 या कालावधीमध्ये आपल्या उत्सर्जन तीव्रतेमध्ये 36 टक्के घट झाली आहे. आता उत्सर्जन तीव्रतेमध्ये 2035 पर्यंत 47 टक्के घट आणण्याचे लक्ष्य निश्चित केले आहे.

- देशाने निर्धारित काळाच्या मर्यादेपेक्षा पाच वर्ष आधीच - फेब्रुवारी 2026 पर्यंत एकूण विद्युत क्षमतेमध्ये गैर-जीवाश्म इंधन आधारित ऊर्जा स्त्रोतांची हिस्सेदारी 52.57 टक्के प्राप्त केली आहे.
- आता गैर-जीवाश्म इंधन आधारित ऊर्जा स्त्रोतांची हिस्सेदारी 2035 पर्यंत वाढवून ती 60 टक्के करण्याचे लक्ष्य निश्चित केले आहे.
- भारत 2005च्या स्तराच्या तुलनेमध्ये 2035 पर्यंत वन आणि वृक्ष आच्छादनाच्या माध्यमातून 3.5 ते 4.0 अब्ज टन कार्बन डायऑक्साइड समतुल्य कार्बन सिंकचे निर्माण करेल.
- भारताची ही वचनबद्धता 2047 पर्यंत विकसित भारत आणि 2070 पर्यंत केवळ शून्य कार्बन हे लक्ष्य गाठण्यासाठी अनुरूप आहे.

**निर्णय : इमिग्रेशन, व्हिसा, विदेशी नोंदणीकरण आणि ट्रॅकिंग योजना कायम ठेवण्याला मंजूरी.**

**प्रभाव :** या योजनेला 1 एप्रिल, 2026 ते 31 मार्च, 2031 पर्यंत अशी पाच वर्षांची मुदतवाढ देण्यात आली. यासाठी 1,800 कोटी रूपयांची अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात आली.

- **मुख्य उद्देश्य :** सुरक्षित आणि एकीकृत सेवा प्रणाली अंतर्गत इमिग्रेशन आणि व्हिसा सेवांचे आधुनिकीकरण आणि अद्ययावतीकरण ■




# प्रगतीची भरारी : 'विमानतळ'

*कोणत्याही देशामध्ये विमानतळ फक्त एक सामान्य सुविधा नसते तर ते राज्य आणि देशाच्या प्रगतीला नवीन भरारी देत असते. याच कारणामुळे विकसित भारतासाठी आधुनिक पायाभूत सेवांवर केंद्र सरकार खूप प्रचंड प्रमाणावर गुंतवणूक करीत आहे. याच श्रृंखलेमध्ये 28 मार्च रोजी 11,200 कोटी खर्चून विकसित करण्यात आलेल्या उत्तर प्रदेशातील जेवरस्थित नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन कार्यक्रमामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, आजपासून 'विकसित उत्तर प्रदेश, विकसित भारत अभियाना'च्या नवीन अध्यायाचा होत आहे प्रारंभ...*

उत्तर प्रदेशातील जेवरस्थित नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळाची पायाभरणी वर्ष 2021मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली होती. आणि आता या विमानतळाचे उद्घाटनही त्यांच्याच हस्ते केले गेले. विमानतळाच्या उद्घाटनाबरोबरच उत्तर प्रदेश देश हे आता देशातील सर्वाधिक आंतरराष्ट्रीय विमानतळे असणारे राज्य बनले आहे. या विमानतळाच्या उद्घाटनामुळे उत्तर प्रदेशातील एकूण विमानतळांची संख्या आता 17 झाली आहे. तर प्रदेशातील आंतरराष्ट्रीय विमानतळांची संख्या पाच झाली आहे. या विमानतळामुळे आग्रा, मथुरा, अलीगढ, गाजियाबाद, मेरठ, इटावा, बुलंदशहर आणि फरीदाबाद यांच्यासह खूप मोठ्या क्षेत्राला लाभ होईल. पश्चिमेकडील उत्तर प्रदेशातील शेतकरी बांधवांना, तसेच लघु आणि मध्यम उद्योजकांना आणि युवकांसाठी विमानतळामुळे अनेक नवीन संधी उपलब्ध होतील. या विमानतळावरून

**अलीकडेच, केंद्र सरकारने सुमारे 29,000 कोटी रुपयांना मंजुरी देऊन उडान योजनेचा विस्तार केला आहे. याअंतर्गत लहान शहरांमध्ये 100 नवीन विमानतळे आणि 200 नवीन हेलिपॅड तयार करण्यात येतील.**

संपूर्ण जगामध्ये अनेक ठिकाणी जाण्यासाठी विमाने उड्डाण घेतील. जेवर विमानतळाच्या निर्माणासाठी तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी 2003 मध्ये मंजूरी दिली होती. केंद्रामध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकार आल्यानंतर या विमानतळाची पायाभरणी करण्यात आली आणि बांधकामही सुरू झाले. आता या विमानतळावरून प्रत्यक्ष विमान उड्डाणाला प्रारंभ झाला. या विमानतळाच्या कामाचा शिलान्यास वर्ष 2021 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच केला होता.




*वर्ष 2014 च्या आधी, देशामध्ये फक्त 74 विमानतळ होते. आज 160 पेक्षा अधिक विमानतळ देशात आहेत. आता महानगरांशिवाय, देशातील लहान-लहान शहरांमध्येही हवाई संपर्क व्यवस्था पोहोचत आहे. आधी जी सरकारे होती, त्यांना वाटत होते की, विमान प्रवासाची सुविधा फक्त श्रीमंतांसाठी असली पाहिजे. परंतु आता सरकारने सामान्य भारतीयांसाठी विमान प्रवास अधिक सोपा, सहज आणि सुलभ केला आहे.*

**-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



## नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळाची वैशिष्ट्ये

- नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळ हे एक भारतातील सर्वात मोठे हरितक्षेत्र असलेल्या विमानतळ प्रकल्पांपैकी एक आहे.
- विमानतळावर 'इन्स्ट्रमेंट लँडिंग सिस्टम' (आयएलएस) आणि उन्नत 'एअरफील्ड लायटिंग'सहित आधुनिक नॅव्हिगेशन सिस्टम आहे. ही कार्यप्रणाली वर्षातील सर्व ऋतूंमध्ये चोवीस तास कार्य करण्यामध्ये कुशल आहे.
- या विमानतळावरून प्रतिवर्ष 2.5 लाख मेट्रिक टनांपेक्षाही अधिक माल वाहतूक करण्यासाठी ते सज्ज केले आहे. भविष्यात हे प्रमाण जवळपास 18 लाख मेट्रिक टनांपर्यंत वाढवणे शक्य आहे.
- विमानतळाला रस्ते, रेल्वेमार्ग, मेट्रो आणि क्षेत्रीय परिवहन प्रणाली यांना जोडण्यात आल्यामुळे एक बहुउद्देशीय परिवहन केंद्र या स्वरूपामध्ये विकसित केले आहे.

**11,200** कोटी रूपये खर्च करून हे विमानतळ विकसित करण्यात आले आहे.

**1.20 कोटी** प्रवासी प्रतिवर्षाला पहिल्या टप्प्यात या विमानतळाचा लाभ घेऊ शकतील. विमानतळ पूर्ण क्षमतेने कार्यरत झाल्यानंतर त्याची क्षमता सात कोटी प्रवासी हाताळण्याइतकी होईल.

**3,900** मीटर लांबीची या विमानतळाची धावपट्टी आहे. त्यामुळे मोठ्या आकाराच्या विमानांचे संचालनही येथून करता येणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले की, एकट्या पश्चिम उत्तर प्रदेशमध्येच अलिकडच्या काही आठवड्यात या चौथ्या मोठ्या प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले अथवा पायाभरणी केली गेली. काही दिवस आधीच नोएडामध्ये एका मोठ्या सेमीकंडक्टरच्या कारखान्याची पायाभरणी करण्यात आली. देशातील पहिली दिल्ली-मेरठ नमो भारत रेल्वेगाडीने चांगला वेग घेतला आहे. आणि मेरठ मेट्रोचाही विस्तार झाला आहे. सेमीकंडक्टर कारखान्यामुळे भारताला तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये स्वावलंबी बनणे शक्य होणार आहे. मेरठ मेट्रो आणि नमो भारत रेल्वे गाडीमुळे वेगवान आणि स्मार्ट संपर्क माध्यम लोकांना उपलब्ध झाले आहे. जेवर विमानतळ संपूर्ण उत्तर भारताला जगासोबत जोडणारे आहे.

हे क्षेत्र आता दोन प्रमुख मालवाहतूक मार्गिकांचे केंद्र बनत आहे. विशेष मालवाहतूक रेल्वे मार्गिका टाकण्याचे काम झाले आहे. यामुळे उत्तर भारताचा आता बंगाल आणि गुजरातच्या समुद्रापर्यंत संपर्क वाढवता येणार आहे. त्याचबरोबर दादरी हे महत्वपूर्ण केंद्र आहे, त्याच्या माध्यमातून दोन्ही मार्गिका एकमेकांना जोडल्या जाणार आहेत. याचा अर्थ असा झाला की, इथले शेतकरी बांधव आपले पिक, उत्पादन, अन्नधान्य आणि उद्योजक - आपली उत्पादने रस्ते आणि हवाईमार्गाच्या माध्यमाने संपूर्ण विश्वाच्या कोणत्याही कोनाकोपऱ्यामध्ये कमीतकमी वेळेत, वेगाने पोहोचवू शकतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, याच पद्धतीने बहुउद्देशीय संपर्क यंत्रणा तयार केल्यामुळे उत्तर प्रदेश संपूर्ण जगातील गुंतवणूकदारांचे एक प्रमुख आकर्षण बनणार आहे.

भारताचे कच्च्या तेलाविषयीचे असलेले परावलंबित्व कमी करण्यासाठी ऊस उत्पादक शेतकरी मोठे योगदान देवू शकतात, असे सांगून पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, ऊस उत्पादकांमुळे इथेनॉलच्या निर्मितीमध्ये वृद्धी करणे आणि पेट्रोलमध्ये इथेनॉलचे मिश्रण करणे शक्य आहे. भारताला दरवर्षी जवळपास साडे चार कोटी बॅरल-पिंप (म्हणजे जवळपास 700 कोटी लीटर) अतिरिक्त कच्चे तेल आयात करावे लागते. इथेनॉलमुळे केवळ देशालाच लाभ झाला असे नाही, तर शेतकरी बांधवांनाही खूप फायदा झाला आहे. यामुळे जवळपास 1.5 लाख कोटी रूपयांच्या परकीय चलनाची बचत झाली आहे. ■






**कार्यक्रमाची संकल्पना**

'सुपोषित आणि सुशिक्षित भारतापासून विकसित भारताकडे'

राष्ट्रपतींचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.



# संधींचे सृजन करण्यासाठी महत्वपूर्ण साधन- शिक्षण

*लहान मुले राष्ट्राचे भविष्य आहेत आणि त्यांना पौष्टिक भोजन तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे, अत्यंत आवश्यक आहे. याच कारणामुळे सरकारने मुलांना पुरेसा पोषक आहार आणि चांगल्या आरोग्यविषयक सेवा प्रदान करण्याच्या उद्देश्याने अनेक उपक्रम सुरू केले आहेत. कुपोषणाच्या समस्येवर उत्तर आणि त्यांना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या श्रृंखलेमध्ये अक्षय पात्र संघटना गेल्या 25 वर्षांपासून सातत्याने शाळांमध्ये मध्यान्ह भोजन पोहोचवते. 17 मार्च रोजी या प्रतिष्ठानच्या पाच अब्जाव्या भोजन वितरणानिमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू झाल्या सहभागी...*

उपलब्ध असलेल्या संधींची दिशा निर्धारित करण्यामध्ये शिक्षणाची भूमिका महत्वपूर्ण असते. हीच गोष्ट शिक्षणाचा मार्गही प्रशस्त करते. शिक्षण हे परिवर्तन आणि सशक्तीकरणाचे एक प्रभावी माध्यम आहे. सशक्तीकरण आणि क्षमता निर्माणाची प्रक्रिया मुलांच्या शाळेत जाण्याच्या आरंभीच्या क्षणापासूनच आकार घेण्यास सुरू होते. मुलांच्या दैनंदिन जीवनातील अनेक आव्हानांना प्रभावी सामना करण्याचे कौशल्य शाळेमुळे त्यांना शिकता येते, इतकेच नाही तर, याबरोबरच त्यांना जबाबदार, कर्तव्यनिष्ठ नागरिक बनवण्यासाठी आवश्यक कौशल्ये आणि अनुभवही प्रदान करण्याचे काम शाळा करते. राष्ट्रपती भवन सांस्कृतिक केंद्रामध्ये अक्षय पात्र प्रतिष्ठानचे पाच अब्जाव्या भोजन वितरणानिमित्त आयोजित एका कार्यक्रमामध्ये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अक्षय पात्र प्रतिष्ठानचे कौतुक केले. गेल्या 25 वर्षांपासून या संघटनेच्यावतीने शाळांमध्ये मध्यान्ह भोजन पोहोचवले जाते. याप्रसंगी त्या म्हणाल्या की, शैक्षणिक उद्देश्यांना पुढे नेण्यासाठी पाच अब्ज वेळा भोजन देणे, ही अक्षय पात्र प्रतिष्ठानची अतिशय उल्लेखनीय कामगिरी आहे.

## सर्वांची सामायिक जबाबदारी - मुलांचे उज्ज्वल भविष्य

मुलांना सुरक्षित आणि उज्ज्वल भविष्य केवळ सरकारची जबाबदारी नाही. तर ही प्रत्येक नागरिकाची सामायिक जबाबदारी



## पोषण आणि आरोग्य सेवा प्रदान करण्याच्या उद्देश्याने अनेक उपक्रम

केंद्र सरकारने गर्भवती महिला आणि बालकांना पुरेसे पोषण मिळावे आणि त्यांचे आरोग्य उत्तम रहावे, यासाठी आरोग्य सेवा प्रदान करण्याच्या उद्देश्याने अनेक महत्वपूर्ण उपक्रम सुरू केले आहेत. प्रधानमंत्री पोषण योजनेअंतर्गत असंख्य विद्यालयांमध्ये दुपारचे भोजन देण्याच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी केली जाते. यामुळे पालकांनाही आपल्या मुलांना शाळेत पाठवण्यासाठी प्रोत्साहन मिळते. या संदर्भात केलेल्या पाहणी अभ्यासामध्ये असे दिसून आले आहे की, मध्यान्ह भोजन योजनेमुळे मुलांना मोठ्या संख्येने शाळेत दाखल करण्याचे प्रमाण वाढले आहे. त्याचबरोबर मुलांच्या शाळेतील उपस्थितीचे प्रमाण खूप वाढले आहे. तसेच मुलांची शिकण्याची क्षमता वाढली असून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये उल्लेखनीय सुधारणा झाली आहे. अक्षय पात्र प्रतिष्ठान 'समग्र शिक्षण अभियान' चालविण्याच्या उद्देश्यांना पुढे नेण्यामध्ये महत्वपूर्ण भूमिका पार पाडत आहे. सरकारचे लक्ष्य वर्ष 2030 पर्यंत सर्व बालकांसाठी गुणवत्तापूर्ण आणि सर्वसमावेशक शिक्षण सुनिश्चित करणे आहे.

### अक्षय पात्र प्रतिष्ठान
### राष्ट्राच्या युवकांचे पोषण

**24** लाखांपेक्षा जास्त मुलांना दररोज गरम आणि पौष्टिक भोजन

**19** राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांपर्यंत व्याप्ती

- 23,000 पेक्षा अधिक शाळा आणि अंगणवाडी यांच्याबरोबर सहकार्य
- प्रत्येक भोजनाच्या माध्यमातून आशा, पोषण आणि शिक्षण पोहोचवणे.



### पीएम पोषण योजना

**12** कोटींपेक्षा जास्त मुलांना दररोज दिले जाते भोजन. 11 लाखांपेक्षा अधिक सरकारी शाळांमध्ये भोजनाचे वितरण

आहे. ज्यावेळी शिक्षक, आई-वडील, सामाजिक संघटना, कॉर्पोरेट जगातील मंडळी आणि समाजातील सर्व वर्ग मिळून कार्य करतात, त्यावेळी आपण येणाऱ्या पिढीसाठी एक मजबूत पाया तयार करू शकतो. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटले की, प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण, पौष्टिक भोजन, चांगले आरोग्य आणि स्वच्छ तसेच सुरक्षित वातावरण मिळाले पाहिजे, हे आपल्याला सुनिश्चित करावे लागेल. या मुलभूत तत्वांमुळे मुलांचा सर्वांगीण विकास होवू शकणार आहे.

### मुले - राष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याचे निर्माता!

लहान मुले केवळ मोफत भोजन कार्यक्रमाचे लाभार्थी नाहीत, ते राष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याचे निर्माता आहेत. राष्ट्रपती म्हणाल्या की, आज मुलांना जे पौष्टिक भोजन मिळत आहे, ते राष्ट्राने मानवी भांडवलामध्ये केलेली गुंतवणूक आहे. आरोग्यदायी, शिक्षित आणि स्फूर्तिदायक बालके भारताचे कार्यबळ आहेत. आणि 2047 पर्यंत 'विकसित भारत' बनविण्याचे लक्ष्य गाठण्यासाठी ही आजची मुलेच अत्यंत महत्वपूर्ण भूमिका बजावतील.

### राष्ट्रपतींनी आचार्य श्रील प्रभुपाद यांचे केले स्मरण

अक्षय पात्र प्रतिष्ठानच्या कार्यक्रमामध्ये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी इस्कॉनचे संस्थापक - आचार्य श्रील प्रभुपाद जी यांना विनम्रतेने श्रद्धांजली अर्पण केली. त्या म्हणाल्या की, जेथे एकही व्यक्ती उपाशीपोटी राहणार नाही, अशा समाजाची निर्मिती करण्याची कल्पना रुजवणारे श्रील प्रभुपाद यांना मी नमन करते. श्रील प्रभुपाद यांनी भारतीय संस्कृतीमधील अन्नदानाची परंपरा संपूर्ण विश्वामध्ये पोहोचवली आणि कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता मोफत भोजन वितरण करण्यासाठी प्रोत्साहन दिले. असा दूर दृष्टिकोन ठेवणाऱ्या महान विभूतींच्या कार्याची मधूर फळे अनेक भावी पिढ्यांना मिळतात. आज याच विचाराने सरकारच्या वतीने प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेच्या माध्यमातून जवळपास 80 कोटी लोकांना मोफत अन्नधान्य उपलब्ध करून दिले जात आहे. ■

# सशक्त ग्रामीण, सशक्त पंचायत सातत्यपूर्ण विकासाचा मजबूत आधार

## पंचायतीकडे आता अचूक माहिती

स्वामित्व योजनेच्या आधी, मध्य प्रदेशच्या सीहोरमधील बिलकिसगंज ग्राम पंचायत हाताने तयार केलेल्या नकाशांवर अवलंबून होती. सेवा खर्चाचा अंदाज बांधणेदेखील आव्हानात्मक होते. स्वामित्व नकाशांनंतर पंचायतीकडे आता अचूक, डेटा-आधारित माहिती आहे. स्वामित्व योजनेमुळे विविध कामांसाठी जमीन वाटप आणि विकास नियोजनात सुधारणा झाली आहे. जमिनीचा प्रभावी वापर आणि चांगले सेवा वितरण शक्य झाले आहे.

## प्रॉपर्टी कार्डमुळे जमीनविषयक वाद संपले

जम्मू-काश्मिरच्या सांबा जिल्ह्यातील स्वामित्व लाभार्थी वीरेंद्र कुमार प्रॉपर्टी कार्ड मिळाल्यामुळे आनंदात आहेत. त्यांच्या गावात अनेक पिढ्या म्हणजेच 100 वर्षांपेक्षा अधिक काळ लोक राहत आहेत. पण त्यांच्याकडे जमिनीची कागदपत्रे नव्हती. आता स्वामित्व कार्ड मिळाल्यामुळे लोक खूष आहेत. वीरेंद्र सांगतात की स्वामित्व कार्ड मिळाल्यामुळे त्यांच्या जमिनीचा प्रश्न सुटला आहे. मी या कार्डामुळे जमीन गहाण ठेवून बँकेतून कर्ज घेऊ शकतो, घराची दुरुस्ती करून घेऊ शकतो. गावात जमीनविषयक वादातून होणारी भांडणे कमी झाली आहेत.

## स्वामित्व कार्डामुळे कर्ज मिळविणे झाले सोपे

महाराष्ट्राच्या नागपूरमधील स्वामित्व लाभार्थी रोशन संभा पाटील यांनी त्यांना हे कार्ड कसे मिळाले, यामुळे त्यांना कशा प्रकारे मदत झाली आणि काय लाभ झाला, हे सांगितले. रोशन यांनी सांगितले की गावात त्यांचे एक मोठे, जुने घर होते. स्वामित्व कार्डाच्या मदतीने त्यांना 9 लाखांचे कर्ज मिळाले, ज्याचा वापर त्यांनी जुन्या घराच्या दुरुस्तीसाठी आणि शेती-सिंचनाच्या सुधारणेसाठी केला. यामुळे त्यांच्या उत्पन्नात आणि कृषी उत्पादनात वाढ झाली आहे. त्यांच्या जीवनावर स्वामित्व योजनेचा हा सकारात्मक परिणाम आहे.

## स्वामित्व कार्ड मिळाल्यामुळे वाढला आत्मविश्वास

ओदिशाच्या रायगडमधील स्वामित्व लाभार्थी गजेंद्र संगीता सांगतात की मागील 60 वर्षांपासून त्यांच्याकडे कोणतीही योग्य कागदपत्रे नव्हती. आता स्वामित्व कार्ड मिळाल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. त्या कर्ज घेऊन आपला शिवण व्यवसाय वाढवू इच्छितात.

**भारताची ग्रामीण लोकसंख्या, पंचायती आणि त्यांची अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी 6 वर्षांपूर्वी पंचायती राज दिनी 24 एप्रिल रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या स्वामित्व योजनेशी संबंधित या कथा सांगतात की ही योजना ग्रामीण भारताच्या स्वप्नांना कशा प्रकारे नवा आकार देत आहे. योजना सुरू करताना पंतप्रधान मोदी यांनी सांगितले होते की या योजनेमुळे संपत्तीविषयी असलेली गोंधळाची परिस्थिती दूर होईल, गावांमध्ये**



## स्वामित्व योजनेची मुख्य उद्दिष्टे

- संपत्तीचे चलनात रुपांतर सुलभ करणे.
- बँक कर्ज मिळविण्यात सुलभताआणणे.
- संपत्तीशी संबंधित वाद कमी करणे.
- ग्रामीण स्तरावर व्यापक योजना तयार करणे, जेणेकरून खऱ्या अर्थाने ग्रामस्वराज्य साकार करण्याच्या आणि ग्रामीण भारताला आत्मनिर्भर बनविण्याच्या दिशेने पहिले पाऊल उचलले जाईल.

## संपत्ती हक्काचे कार्ड मिळाले

**31** राज्ये व केंद्रशासित प्रदेश योजनेत सहभागी

**3.45** लाखांहून अधिक गावे सर्वेक्षणासाठी अधिसूचित

**3.29** लाख गावांमध्ये ड्रोन सर्वेक्षणाचे काम पूर्ण

**3.10** कोटी संपत्ती कार्डे 1.87 लाख गावांसाठी तयार

**2.65** कोटींहून अधिक संपत्ती कार्डे वितरित

टीप - आकडेवारी 11 मार्च, 2026 पर्यंत





*“भारताच्या सामर्थ्याची ओळख निर्माण करण्यासाठी गाव आणि गरिबांना आत्मनिर्भर बनविण्याचा निश्चय देशाने केला आहे. या संकल्पाच्या पूर्ततेसाठी स्वामित्व योजनेची भूमिका अत्यंत मोठी आहे.*

**–नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

विकास योजनांच्या अधिक चांगल्या नियोजनासाठी आणि अधिक मदत मिळविण्यासाठी तिचा उपयोग होईल. यामुळे शहरांप्रमाणेच गावांमध्येही बँकांकडून कर्ज मिळविण्याचा मार्ग अधिक सोपा होईल. हे सर्व लाभ यशोगाथांमध्ये लाभार्थी स्वतः सांगत आहेत. जमीन मालकीच्या शतकांपासूनच्या आव्हानांना विकास आणि सशक्तीकरणाच्या संधींमध्ये बदलले जात आहे. जमीन वाद सोडविले जात आहेत. ग्रामीण भारतात लोकांकडे असलेल्या साधनसंपत्तीचे आर्थिक प्रगतीसाठी एक शक्तिशाली साधन म्हणून रूपांतरित केले जात आहे. ही योजना केवळ नकाशे आणि सीमांपुरती मर्यादित नाही तर; उच्च-तंत्रज्ञानाधारित ड्रोन सर्वेक्षणापासून डिजिटल स्वामित्व कार्डापर्यंत स्वप्नांना ती नवीन उंची देत आहे. नवोन्मेषाशी जोडलेल्या या बदलाला जसजशी गावे स्वीकारत आहेत, तसतसे त्या गावांसाठी हा सरकारी पुढाकार अधिकाधिक लाभदायक ठरत आहे. ही आत्मनिर्भरता, चांगली योजना मजबूत, एकात्मिक ग्रामीण भारतासाठी परिवर्तनकारी ठरत आहे.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर धोरणात्मक, निर्देशक तत्त्वांच्या अंतर्गत संविधानाच्या 40 व्या कलमात असे म्हटले आहे की राज्य ग्राम

# पंचायती राजची सुरुवात... 24 एप्रिल रोजी असतो पंचायती राज दिन

- भारतीय पंचायती राज व्यवस्थेची मुळे देशाच्या इतिहास आणि संस्कृतीमध्ये आहेत. भारतातील सर्वात प्राचीन ग्रंथांपैकी एक असलेल्या ऋग्वेदामध्ये हजारो वर्षांपासून स्वयंशासित असलेल्या ग्रामीण समुदायांचा उल्लेख आहे.
- बलवंत राय मेहता यांच्या अध्यक्षतेखालील समिती ने 1957 मध्ये आपल्या अहवालात सांगितले की सामुदायिक कामांमध्ये लोकांचा सहभाग कायदेशीर प्रतिनिधी संस्थांद्वारे आयोजित केला जावा. तेव्हा पंचायती राजच्या स्थापनेला ऐतिहासिक यश मिळाले.
- स्वातंत्र्यानंतर पंचायती राज व्यवस्था प्रथम खऱ्या अर्थाने 2 ऑक्टोबर 1959 रोजी राजस्थानात जयपूरपासून 260 किलोमीटर अंतरावरील नागौर गावात लागू करण्यात आली.
- वर्ष 1978 मध्ये अशोक मेहता समितीने आपल्या अहवालात शिफारस केली की पंचायती राजचा संविधानात समावेश केला जावा.
- केंद्र सरकारने 22 आणि 23 डिसेंबर 1992 रोजी पंचायती आणि नगरपालिकांशी संबंधित दोन विधेयके संसदेत सादर केली. राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतर ती संविधान (73वी दुरुस्ती) अधिनियम, 1992 म्हणून 24 एप्रिल 1993 रोजी लागू करण्यात आली.
- संविधान (74वी दुरुस्ती) अधिनियम, 1992 म्हणून 1 जून 1993 रोजी लागू करण्यात आला, त्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी तरतुदी करण्यात आल्या.



**आज 2.6 लाख पंचायती लोकांच्या सामाजिक आणि राजकीय सशक्तीकरणाची हमी देत भारतीय लोकशाहीचा पाया मजबूत करत आहेत. यामध्ये 24.24 लाख निवडून आलेले प्रतिनिधी आहेत व त्यात सुमारे 49.55% महिला आहेत.**



पंचायतींना संघटित करेल आणि त्यांना शक्ती व अधिकार प्रदान करेल, ज्यांच्या माध्यमातून पंचायती स्वयंशासित घटक म्हणून कार्य करण्यास सक्षम ठरतील. सुरुवातीपासूनच स्वयंशासनाला पंचायती राजचे सार मानले गेले आहे. ही पंचायती राज व्यवस्था 1992 मध्ये करण्यात आलेल्या संविधानातील एका दुरुस्तीच्या माध्यमातून 1993 मध्ये अंमलबजावणीसह संविधानाचा भाग बनली.

जुन्या व्यवस्थेत, अनेक दशकांपर्यंत भारतातील अनेक ग्रामीण घरे आणि जमिनींची औपचारिक नोंद ठेवलेली नव्हती. कायदेशीर कागदपत्रांच्या अभावी लोकांना मालकी सिद्ध करता येत नव्हती आणि बँकेकडून कर्ज किंवा सरकारी मदत मिळविण्यासाठी आपल्या साधनसंपत्तीचा उपयोग करता येत नव्हता. नोंदींच्या अभावामुळे ग्रामीण भागांच्या आर्थिक विकासाची गती मंदावली आणि जमिनींचे वाद निर्माण झाले. या सर्व समस्या दूर करण्यासाठी 24 एप्रिल, 2020 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वामित्व योजनेची सुरुवात केली. ही योजना आज ग्रामीण भारताच्या आर्थिक प्रगतीला नवी गती देत आहे.

अर्थ मंत्रालयाच्या जनसुरक्षा पोर्टलच्या आकडेवारीनुसार फेब्रुवारी 2026 पर्यंत 10,913 संपत्ती कार्ड धारकांना सुमारे 1,680 कोटी रुपयांचे कर्ज वितरित केले आहे. पंचायती राज मंत्रालयाच्या मते संपत्ती कार्डासंदर्भात राज्यांकडून अनेक यशोगाथा प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार स्वामित्व योजनेच्या लाभार्थ्यांनी घर बांधकाम, वाहन खरेदी, व्यवसाय विस्तार आणि दुग्धव्यवसायाच्या विस्तारासाठी स्वामित्व कार्डाचा उपयोग करून बँकांकडून कर्ज घेतले आहे. ■

# जनतेचे हित सर्वात महत्त्वपूर्ण



पंतप्रधानांचे संसदेमधील भाषण पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

*पश्चिम आशियामध्ये वाढत असलेला तणाव आणि इराण-इस्रायल-अमेरिका यांच्या दरम्यान सुरू असलेल्या संघर्षामुळे जागतिक स्तरावर चिंतेचे वातावरण आहे. अशा कठीण काळात, जागतिक व्यवस्था डळमळीत होत असताना भारताने पुन्हा एकदा आपली जाण, संयम आणि दूरदृष्टीचे प्रदर्शन केले आहे. संकटाची चाहूल लागताच देशाने आपली तयारी मजबूत केली आणि त्याचबरोबर कोणत्याही प्रकारची दहशत किंवा अस्थिरता निर्माण होऊन तिचा जनजीवनावर परिणाम होऊ नये, याची काळजी घेतली. कोविड काळात भारताने हे करून दाखवले आहे, त्यामुळे सध्याच्या संकटावर केंद्र सरकारने सतत निरीक्षणासाठी आंतर-मंत्रालयीन समिती स्थापन केली आहे. ही समिती एकीकडे दररोज देशाला माहिती देते आहे व दुसरीकडे संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राला संदेश दिला आहे की भारताकडे आव्हानांचा सामना करतानाच त्यांना संधीमध्ये बदलण्याची क्षमता देखील आहे. भारत हे एक असे राष्ट्र आहे, जे प्रत्येक संकटात तावून सुलाखून पुढे येते...*

पश्चिम आशियात सुरू असलेला संघर्ष आणि त्यातून निर्माण झालेल्या आव्हानांमुळे जगाच्या मोठ्या भागात परिस्थिती चिंताजनक बनली आहे. युद्धामुळे संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर आणि लोकांच्या जीवनावर प्रतिकूल परिणाम होत आहे. भारतासमोरही या युद्धामुळे अनपेक्षित आव्हाने उभी राहिली आहेत. ही आव्हाने आर्थिक, राष्ट्रीय सुरक्षा आणि मानवतावादी स्वरूपाची आहेत. हे यामुळे की युद्धरत आणि युद्धग्रस्त देशांबरोबर भारताचे व्यापक आणि व्यापारी संबंध आहेत. ज्या प्रदेशात युद्ध सुरू आहे तो जगातील इतर देशांसोबतच्या आपल्या व्यापाराच्या महत्त्वाच्या मार्गांपैकी एक आहे. विशेषतः कच्चे तेल आणि गॅसच्या गरजांचा

## भारतीयांच्या सुरक्षेला प्राधान्य

युद्ध सुरू झाल्यापासून युद्धाच्या प्रभावाखाली असलेल्या देशांमध्ये प्रत्येक भारतीयाला आवश्यक मदत दिली जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वत: पश्चिम आशियातील बहुतेक राष्ट्रप्रमुखांशी दोन फेऱ्यांमध्ये दूरध्वनीवर चर्चा केली आहे. सर्वांनी भारतीयांच्या सुरक्षेबाबत पूर्ण आश्वासन दिले आहे. युद्धग्रस्त देशांमधील सर्व यंत्रणा तेथील भारतीयांना मदत करण्यात गुंतलेल्या आहेत. तिथे काम करणारे भारतीय असोत किंवा पर्यटनासाठी गेलेले लोक असोत, सर्वांना सर्व प्रकारची मदत दिली जात आहे. भारतात आणि इतर प्रभावित देशांमध्ये 24/7 नियंत्रण कक्ष आणि आपत्कालीन हेल्पलाइन सुरू केल्या आहेत. युद्ध सुरू झाल्यापासून आतापर्यंत 3 लाख 75 हजारांहून अधिक भारतीय सुरक्षितपणे देशात परतले आहेत. एकट्या इराणमधूनच आतापर्यंत सुमारे 1,000 भारतीय सुरक्षित परतले आहेत, यामध्ये 700 हून अधिक वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी आहेत.

एक मोठा भाग या मार्गाने भारताला पुरविला जातो. हा प्रदेश आणखी एका कारणामुळेही महत्त्वाचा आहे. ते म्हणजे सुमारे एक कोटी भारतीय आखाती देशांमध्ये राहतात आणि तिथे काम करतात. तिथल्या समुद्रात चालणाऱ्या व्यापारी जहाजांवर भारतीय कर्मचाऱ्यांची संख्या मोठी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की या विविध कारणांमुळे भारताच्या चिंता स्वाभाविकपणे अधिक आहेत. त्यामुळे आवश्यक आहे की भारताच्या संसदेतून या संकटाबाबत एकमत आणि एकजूट असलेला आवाज जगात जावा.

### सामान्य कुटुंबांना कमीत कमी त्रास होईल

भारतामध्ये मोठ्या प्रमाणात कच्चे तेल, गॅस आणि खतासारख्या अनेक आवश्यक वस्तू होर्मुज सामुद्रधुनीमार्गे येतात. युद्धानंतर होर्मुज सामुद्रधुनीमध्ये जहाजांची ये-जा आव्हानात्मक झाली आहे. तरीदेखील केंद्र सरकारचा प्रयत्न असा राहिला आहे की पेट्रोल, डिझेल आणि गॅसच्या पुरवठ्यावर फार परिणाम होऊ नये. देशातील सामान्य कुटुंबांना कमीत कमी त्रास व्हावा, यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. देश आपल्या गरजांच्या सुमारे 60% स्वयंपाकाचा गॅस (एलपीजी) आयात करतो, आणि त्याच्या पुरवठ्यातील अनिश्चिततेमुळे सरकारने एलपीजीच्या घरगुती वापराला प्राधान्य दिले आहे. त्याचबरोबर देशात एलपीजीचे उत्पादन वाढविले जात आहे. पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा संपूर्ण देशभर सुरळीत राहावा यासाठीही सतत प्रयत्न सुरू आहेत.भारत 11 वर्षांपूर्वी कच्चे तेल, एलएनजी, एलपीजी सारखे इंधन 27 देशांमधून आयात करत होता तर; आज भारताच्या पुरवठादार देशांची संख्या 41 झाली आहे. भारताकडे सध्या 53 लाख मेट्रिक टनांपेक्षा अधिक धोरणात्मक पेट्रोलियम साठा आहे आणि 65 लाख मेट्रिक टनांपेक्षा अधिक साठा निर्माण करण्याच्या व्यवस्थेवर काम सुरू आहे. तेल कंपन्यांकडे असलेले साठे यापेक्षा वेगळे आहेत. सरकार विविध देशांतील पुरवठादारांशी सतत संपर्कात आहे. प्रयत्न असा आहे की जिथून शक्य असेल तिथून तेल आणि गॅसचा पुरवठा सुरू राहावा. भारत सरकार आखाती प्रदेश व त्याच्या आसपासच्या जलमार्गांवर सतत लक्ष ठेवून आहे. सरकारचा प्रयत्न आहे की तेल, गॅस, खत आणि अशा सर्व आवश्यक वस्तूंशी संबंधित जहाजे भारतात सुरक्षितपणे पोहोचावीत.

### ऊर्जा - आधुनिक अर्थव्यवस्थेचा कणा

आजच्या काळात ऊर्जा ही आधुनिक अर्थव्यवस्थेचा कणा आहे आणि ऊर्जेची जागतिक गरज पूर्ण करणारा एक मोठा स्रोत म्हणजे पश्चिम आशिया प्रदेश आहे. सध्याच्या संकटाचे जगभरातील अर्थव्यवस्थांवर परिणाम दिसून येत आहेत, मात्र भारतावर त्याचा कमीत कमी परिणाम व्हावा यासाठी सतत प्रयत्न केले जात आहेत. सरकार अल्पकालीन, मध्यमकालीन आणि दीर्घकालीन परिणाम लक्षात घेऊन धोरणे आखत आहे. भारत सरकारने एक आंतर-मंत्रालयीन गट स्थापन केला आहे. हा गट दररोज बैठक घेतो आणि आयात-निर्यात क्षेत्रात येणाऱ्या प्रत्येक अडचणीवर विचारविनिमय करतो. देशातील शेतकऱ्यांनी अन्नधान्याचे साठे भरून ठेवले आहेत, त्यामुळे भारताकडे पुरेसे अन्नधान्य उपलब्ध आहे. सरकारने मागील काही वर्षांत आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी खतांचा पुरेसा साठा तयार केला आहे. कोरोना काळात आणि

## कोळशाचे विक्रमी उत्पादन वाढली नवीकरणीय ऊर्जा क्षमता

आगामी काळात वाढत्या उष्णतेसोबत वीजेची मागणी वाढत जाणार आहे. सध्या देशातील सर्व वीज प्रकल्पांमध्ये कोळशाचे पुरेसे साठे उपलब्ध आहेत. भारताने सलग दुसऱ्या वर्षी 100 कोटी टन कोळसा उत्पादनाचा विक्रम केला आहे. वीज निर्मितीपासून ते वीज पुरवठ्यापर्यंत सर्व प्रणालींवर सतत लक्ष ठेवले जात आहे आणि सरकारच्या तयारीमुळे नवीकरणीय ऊर्जेची मदत होत आहे. मागील दशकात देशाने नवीकरणीय ऊर्जेच्या दिशेने मोठी पावले उचलली आहेत. एकूण स्थापित वीज निर्मिती क्षमतेपैकी जवळपास अर्धा हिस्सा नवीकरणीय स्रोतांमधून येतो. एकूण नवीकरणीय ऊर्जा क्षमता आज 250 गीगावॅट या ऐतिहासिक आकड्यापेक्षा अधिक झाली आहे. मागील 11 वर्षांत देशाची सौर ऊर्जा क्षमतेत सुमारे 3 गीगावॅटची वाढ झाली असून ती 140 गीगावॅटपर्यंत पोहोचली आहे.



## पश्चिम आशियातील सर्व नेत्यांशी पंतप्रधान मोदींची चर्चा

पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षाबाबत भारताने यापूर्वीच गंभीर चिंता व्यक्त केली आहे. पंतप्रधान मोदी यांनी स्वतः पश्चिम आशियातील सर्व संबंधित नेत्यांशी चर्चा केली आहे. सर्वांना तणाव कमी करण्याचे आणि संघर्ष थांबविण्याचे आवाहन केले आहे. भारताने नागरिक, ऊर्जा आणि वाहतुकीशी संबंधित पायाभूत सुविधांवरील हल्ल्यांचा निषेध केला आहे. व्यापारी जहाजांवर हल्ले आणि होर्मुज सामुद्रधुनीसारख्या आंतरराष्ट्रीय जलमार्गांमध्ये अडथळे निर्माण करणे भारताला मान्य नाही. भारत कूटनीतीच्या माध्यमातून युद्धकाळातही भारतीय जहाजांच्या सुरक्षित आवागमनासाठी सतत प्रयत्नशील आहे.



त्याच काळातील युद्धांदरम्यान जागतिक पुरवठा साखळीत अडथळे निर्माण झाले होते. जागतिक बाजारात युरियाच्या एका पोत्याची किंमत तीन हजार रुपयांपर्यंत पोहोचली होती, परंतु भारतातील शेतकऱ्यांना तीच पोती 300 रुपयांपेक्षा कमी दरात उपलब्ध करून देण्यात आली. मागील एका दशकात देशात 6 युरिया प्रकल्प सुरू झाले आहेत. दरवर्षी 76 लाख मेट्रिक टनांपेक्षा अधिक युरिया उत्पादन क्षमता या प्रकल्पांमुळे निर्माण झाली आहे. या कालावधीत डीएपी आणि एनपीकेएससारख्या खतांचे देशांतर्गत उत्पादन देखील सुमारे 50 लाख मेट्रिक टनांनी वाढवले गेले आहे. एवढेच नव्हे तर; सरकार शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीसाठीही प्रोत्साहन देत आहे.

### प्रत्येक आव्हानाला सामोरे जायचे आहे

या युद्धामुळे जगात निर्माण झालेली कठीण परिस्थिती दीर्घकाळ तशीच राहण्याची शक्यता आहे.या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी आपल्याला सज्ज आणि एकजूट राहावे लागेल. संयम आणि धैर्याने प्रत्येक आव्हानाचा सामना करावा लागेल. परिस्थितीचा फायदा घेणारे काही लोक खोट्या अफवा पसरवण्याचा प्रयत्न करतील, अशा लोकांच्या प्रयत्नांना यश येणार नाही, अशी काळजी घेतली पाहिजे. देशातील सर्व राज्य सरकारांना पंतप्रधान मोदी यांचे आग्रहाचे सांगणे आहे की अशा काळात काळाबाजार करणारे आणि साठेबाजी करणारे सक्रिय होतात, त्यामुळे यावर कठोर नजर ठेवणे आवश्यक आहे. ■

## पश्चिम आशियातील संकटाला एकजुटीने सामोरी जाणार

# ‘टीम इंडिया’

*पश्चिम आशियामधील युद्धाच्या परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या जागतिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर देश ‘टीम इंडिया’ म्हणून एकजुटीने कार्यरत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विश्वास व्यक्त केला की ‘टीम इंडिया’ या परिस्थितीतून यशस्वीरित्या मार्ग काढेल. आतापर्यंत या परिस्थितीला तोंड देण्यासाठी केंद्र सरकारने उचललेल्या पावलांचे राज्यांचे मुख्यमंत्री आणि उपराज्यपालांच्या बैठकीत कौतुक झाले आणि केंद्र सरकारबरोबर मिळून काम करण्याप्रती राज्यांनी आपापली बांधिलकी पुन्हा व्यक्त केली.*



पश्चिम आशियातील सध्याच्या घडामोडी आणि भारतावर होणाऱ्या संभाव्य परिणामांच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी 27 मार्च रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली राज्यांच्या मुख्यमंत्र्यांबरोबर आणि उपराज्यपालांबरोबर एक महत्त्वाची बैठक घेण्यात आली. पश्चिम आशियातील सद्यस्थितीचा उल्लेख करत पंतप्रधानांनी सांगितले की भारताकडे अशा प्रकारच्या जागतिक समस्येला सामोरे जाण्याचा पूर्वानुभव आहे. त्यांनी कोविड-19 साथीदरम्यान केंद्र आणि राज्यांनी ‘टीम इंडिया’ म्हणून एकत्र येऊन पुरवठा साखळी, व्यापार आणि दैनंदिन जीवनावर होणारा परिणाम कमी करण्यासाठी केलेल्या सामूहिक प्रयत्नांची आठवण करून दिली. पंतप्रधान मोदी यांनी सांगितले की हा सहकार्य आणि समन्वयाचा भाव सद्यस्थितीत भारताची सर्वात मोठी ताकद आहे.

पंतप्रधान मोदी यांनी सांगितले की 3 मार्चपासून एक आंतर-मंत्रालयीन गट सक्रिय आहे. हा गट दररोज परिस्थितीचा आढावा घेत आहे आणि योग्य वेळी निर्णय घेत आहे. आर्थिक आणि व्यापारी स्थैर्य राखणे, ऊर्जा सुरक्षा निश्चित करणे, नागरिकांच्या हितांचे संरक्षण करणे आणि उद्योग व पुरवठा साखळी मजबूत करण्याला सरकारचे प्राधान्य आहे. प्रभावी अंमलबजावणी राज्य स्तरावरच होते, त्यामुळे त्वरित आणि सुव्यवस्थित प्रतिसादासाठी केंद्र आणि राज्यांदरम्यान सतत संवाद आणि समन्वय, वेळेवर माहितीची देवाणघेवाण आणि संयुक्त निर्णय घेण्यावर बैठकीत भर देण्यात आला.

### साठेबाजी आणि नफेखोरीविरोधात कठोर उपाययोजना...

पंतप्रधान मोदी यांनी राज्यांना पुरवठा साखळी सुरळीत सुरू ठेवण्यास आणि साठेबाजी व नफेखोरीविरोधात कठोर कारवाई करण्यास सांगितले. या संकटामुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या अडचणी टाळण्यासाठी राज्य आणि जिल्हा स्तरावर नियंत्रण कक्ष चालू ठेवण्यास आणि प्रशासकीय सावधानता



## उत्पादन शुल्क कमी केले...

या संकटाचा सामना करण्यासाठी सरकार सक्रियपणे काम करत आहे, असे बैठकीदरम्यान संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी सांगितले. एलपीजीची वेळेवर उपलब्धता सुनिश्चित करणे तसेच पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्क कमी करणे यांसारखी सकारात्मक पावले उचलण्यात आली आहेत. सध्याच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी सर्व राज्ये, केंद्रशासित प्रदेश आणि केंद्र सरकारने एकत्रितपणे कृती करण्याची गरज असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.




## परिस्थिती स्थिर असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले...

पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा पुरेसा साठा असून परिस्थिती स्थिर असल्याचा विश्वास सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा अखंडित राहावा यासाठी देखरेख यंत्रणा सतत कार्यरत आहे. इंधनावरील उत्पादन शुल्क कमी करण्याच्या निर्णयाचे मुख्यमंत्र्यांनी स्वागत केले आणि सांगितले की यामुळे जागतिक अनिश्चिततेच्या काळात नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. त्यांनी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी व्यावसायिक एलपीजीचे वाटप संकटपूर्व पातळीच्या 50 टक्क्यांवरून 70 टक्क्यांपर्यंत वाढवण्याच्या निर्णयाचेही स्वागत केले.

वाढवण्यास सांगितले. शेतकऱ्यांना आगामी खरीप हंगामात कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये म्हणून त्यांनी कृषी क्षेत्रात आगाऊ नियोजनाच्या गरजेवर, विशेषतः खतांच्या साठवणूक आणि वितरणावर देखरेख ठेवण्यावर भर दिला.

## अफवांवर विश्वास ठेऊ नका...

चुकीची माहिती आणि अफवांचा प्रसार, यापासून सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करताना पंतप्रधान म्हणाले की भीतीपोटी कृती टाळण्यासाठी अचूक आणि विश्वासार्ह माहितीचा वेळेवर प्रसार करणे आवश्यक आहे. त्यांनी ऑनलाईन फसवणूक आणि बनावट दलाल यांच्याबाबत दक्ष राहण्याची सूचना केली. अत्यावश्यक वस्तूंच्या उपलब्धतेबाबत हमी दिली, तर नागरिकांमध्ये अनावश्यक घबराट रोखण्यात मदत होईल. पश्चिम आशियामध्ये ज्या राज्यांचे नागरिक वास्तव्याला आहेत, त्या राज्यांनी बाधित कुटुंबांना सहाय्य करण्यासाठी आणि त्यांच्यापर्यंत वेळेवर माहिती पोहोचेल हे सुनिश्चित करण्यासाठी हेल्पलाइन कार्यान्वित कराव्यात, नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी आणि जिल्हा-स्तरीय मदत यंत्रणा उभाराव्यात.

## अलिकडच्या वर्षांत उचललेली पावले मदत करत आहेत...

भारताची आर्थिक आणि पुरवठा व्यवस्था बळकट करण्यासाठी गेल्या काही वर्षांत करण्यात आलेले प्रयत्न, सध्याच्या परिस्थितीत फायदेशीर ठरत आहेत. उद्योग क्षेत्र आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या (एमएसएमई) समस्यांचे निराकरण करण्यासाठी, तसेच उत्पादन आणि रोजगारात स्थिरता सुनिश्चित करण्यासाठी, त्यांच्याशी सातत्याने संवाद आणि संपर्क ठेवणे आवश्यक आहे. सर्व स्तरांवर सक्षम समन्वय यंत्रणा असण्याच्या गरजेवर भर देण्यात आला. यंत्रणेला बदलत्या परिस्थितीला त्वरित प्रतिसाद देता यावा, यादृष्टीने मुख्य सचिव स्तरावर नियमित आढावे आणि जिल्हास्तरावर सतत निरीक्षण यांचा समावेश असण्याची गरज आहे.

## पर्यायी ऊर्जा स्रोतांना प्रोत्साहन...

जैवइंधन, सौरऊर्जा, गोबरधन उपक्रम, विद्युत गतिशीलता यांसारख्या पर्यायी ऊर्जा स्रोतांना प्रोत्साहन देण्यासाठीच्या प्रयत्नांचा वेग वाढवण्याचे तसेच पाइपद्वारे नैसर्गिक वायू जोडण्या विस्तारण्याचे आवाहन राज्यांना करण्यात आले आहे. तेल आणि नैसर्गिक वायूचे देशांतर्गत स्रोत शोधण्याच्या मोहिमांना चालना देणे महत्त्वाचे असून त्यासाठी राज्यांनी सक्रिय सहकार्य करणे आवश्यक आहे. टीम इंडिया म्हणून एकत्र काम करून भारत यशस्वीपणे या परिस्थितीवर मात करेल असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला. ▪



KHELO INDIA

## खेलो इंडियाचे एक दशक

# क्रीडा क्रांतीचा मजबूत आराखडा

*एकेकाळी भारतात खेळ हा मुलांसाठी गृहपाठ आणि शाळेच्या मधल्या वेळेतील एक आनंददायी छंद होता. खेळ हे एक व्यवहार्य करिअर मानले जात नाही, असा एक सामान्य गैरसमज होता. मर्यादित क्रीडा पायाभूत सुविधा आणि समाजाने खेळांपेक्षा शिक्षणाला दिलेले प्राधान्य हे याचे कारण होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने ही मानसिकता बदलली आणि तरुणांमध्ये क्रीडा क्षेत्रात करिअर करण्याची आकांक्षा निर्माण केली... आज लडाखचा सायकलपटू त्सेवांग नोरबू असो, नागालँडचा पॅरा-अॅथलीट होटोजे सेमा होकाटो असो, किंवा खेलो इंडियाचे 2,900 पेक्षा जास्त खेळाडू असोत... खेलो इंडिया अशा खेळाडूंना नव्या उंचीवर घेऊन जात आहे...*

खेलो इंडिया योजना – **राष्ट्रीय क्रीडा विकास कार्यक्रम** सुरू करून भारत सरकार क्रीडा क्षेत्रात व्यापक सार्वजनिक सहभाग आणि उत्कृष्टतेला प्रोत्साहन देत आहे. या उद्देशाने, 22 एप्रिल 2016 रोजी संबंधित संस्थांना ही योजना वितरित करण्यात आली. 27 सप्टेंबर 2016 रोजी या कार्यक्रमात काही बदल करण्यात आले. यामध्ये क्रीडा पायाभूत सुविधांची निर्मिती आणि श्रेणीसुधार, क्रीडा स्पर्धा आणि प्रतिभा विकास, 'फिट इंडिया अभियान' आणि क्रीडा क्षेत्राद्वारे सर्वसमावेशकतेला प्रोत्साहन यांचा समावेश आहे. गेल्या दशकात, देशाने या क्षेत्रांमध्ये अनेक महत्त्वाचे टप्पे गाठले आहेतच, त्याचबरोबर या योजनेमुळे क्रीडा प्रतिभाही मोठ्या प्रमाणात समोर आली आहे. युवकांना उत्कृष्ट पायाभूत सुविधा, प्रशिक्षण आणि आर्थिक सहाय्य मिळाल्यामुळे, आता अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदक विजेत्यांच्या व्यासपीठावर राष्ट्रगीताचे सूर निनादताना ऐकू येत आहे.



## प्रतिभेला घडविणारी नवी सहाय्य प्रणाली...

# खेलो इंडिया मिशन

क्रीडा क्षेत्र रोजगार, कौशल्य आणि नोकरीच्या असंख्य संधी उपलब्ध करुन देते, म्हणूनच केंद्र सरकारने 2026-27 च्या अर्थसंकल्पात 'खेलो इंडिया मिशन' सुरू करण्याची घोषणा केली. या महत्त्वाच्या उपक्रमात प्रतिभा हेरुन विकसित करणे, उत्कृष्टता केंद्रांच्या स्वरूपात पायाभूत सुविधांची निर्मिती करणे आणि रोजगार निर्मिती यावर लक्ष केंद्रित केले आहे. खेलो इंडिया मिशन प्रतिभावान खेळाडूंना सुरुवातीपासून ते व्यावसायिक स्तरापर्यंत सहाय्य करणारी एक परिसंस्था निर्माण करेल. राज्यस्तरीय उपक्रमांद्वारे प्रत्येक जिल्ह्यात खेलो इंडिया प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे, क्रीडा विज्ञान, क्रीडा मानसशास्त्र, पोषण यांसह सुव्यवस्थित उपाययोजना राबवणे, सद्यस्थितीतील निरीक्षणासाठी डेटा प्लॅटफॉर्म तयार करणे आणि 2036 सालापर्यंत भारताला क्रीडा क्षेत्रातील अग्रगण्य राष्ट्रांमध्ये स्थान मिळवून देणे असे या मिशनचे उद्दिष्ट आहे.

### आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके मिळवण्याची क्षमता असलेल्या 14 क्रीडाप्रकारांवर विशेष भर

'खेलो इंडिया' अंतर्गत केंद्र सरकारने राज्यांसोबत मिळून 'एक राज्य – एक खेळ' या संकल्पनेवर भर दिला आहे. तसेच, आगामी ऑलिंपिक स्पर्धांमध्ये अधिक चांगल्या कामगिरीसाठी सर्वाधिक पदके जिंकण्याची जास्त शक्यता असलेल्या 14 क्रीडाप्रकारांची निवड करण्यात आली आहे. खेलो इंडिया अंतर्गत तयार केल्या जाणाऱ्या कोणत्याही प्रस्तावांमध्ये किंवा कार्यक्रमांमध्ये या 14 खेळांना प्राधान्य द्यावे, ज्यामुळे अधिकाधिक खेळाडू सहभागी होऊ शकतील आणि आपली क्षमता विकसित करू शकतील, असे आवाहन केंद्र सरकारने राज्य सरकारांना केले आहे.

### मोहिमेचे पाच आधारस्तंभ

- प्रतिभावान खेळाडू शोधून त्यांना व्यावसायिक स्तरापर्यंत विकसित करण्यासाठी विविध स्तरांची प्रशिक्षण केंद्रे स्थापन केली जातील.
- प्रशिक्षक आणि सहाय्यक कर्मचारी वर्ग विकसित केला जाईल.
- क्रीडा क्षेत्रात क्रीडा विज्ञान आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढवला जाईल.
- क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी स्पर्धा आणि लीग आयोजित केल्या जातील.
- प्रशिक्षण आणि स्पर्धेसाठी क्रीडा पायाभूत सुविधा विकसित केल्या जातील.

**तिरंदाजी, मुष्टीयुद्ध, नेमबाजी, बॅडमिंटन, कुस्ती, हॉकी, भारोत्तोलन, सायकलिंग, ॲथलेटिक्स, टेबल टेनिस, ज्युडो, जलतरण, तलवारबाजी, नौकानयन**




खेलो इंडिया योजना, टार्गेट ऑलिम्पिक पोडियम योजना (टॉप्स) आणि कीर्ती (खेलो इंडिया रायझिंग टॅलेंट आयडेंटिफिकेशन) यांनी खेळाडूंच्या प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांना पाठिंबा देण्यासाठी एक व्यापक आराखडा तयार केला आहे. शालेय, विद्यापीठ, महिला, पॅरा-ॲथलीट आणि आदिवासी खेळाडू या स्तरांवर प्रतिभा शोधून त्यांना घडवण्याचे काम अधिक वेगाने करण्यात आले आहे. परिणामी, गेल्या दशकातील क्रीडा क्षेत्रातील भारताच्या कामगिरीकडे सुवर्णकाळ म्हणून पाहिले जाऊ शकते. ऑलिम्पिक, पॅरालिम्पिक आणि आशियाई

# खेलो इंडियामध्ये तयार पायाभूत सुविधा

**1067**
खेलो इंडिया केंद्रे 750 पेक्षा जास्त जिल्ह्यांमध्ये.

**322**
अकादमींना खेलो इंडिया अंतर्गत खेळाडूंना प्रशिक्षण देण्यासाठी मान्यता.

**27,500**
पेक्षा जास्त खेळाडू खेलो इंडिया केंद्रांमध्ये प्रशिक्षण घेत आहेत.

## 8 पटीने वाढली खेलो इंडियासाठीची आर्थिक तरतूद






**344**
नवीन क्रीडा पायाभूत सुविधा प्रकल्पांना 32 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये मंजुरी.

**3,158** कोटी रुपये
या प्रकल्पांसाठी खर्च येईल.

- 17,000 पेक्षा जास्त क्रीडा पायाभूत सुविधा, 2,500 पेक्षा जास्त ऑलिम्पिक-स्तरीय खेळ.
- 47,012 खेळाडूंनी खेलो इंडिया गेम्समध्ये सहभाग घेतला आहे.
- 1,327 प्रशिक्षक आणि सहाय्यक कर्मचारी आहेत.
- 23,000 पेक्षा जास्त खेळाडूंना पाठिंबा मिळाला आहे.
- 23.68 कोटी लोकांनी फिट इंडिया कार्यक्रमात भाग घेतला आहे.
- 4,50,445 शाळांना फिट इंडिया ध्वज मिळाला आहे.

**2,905 खेलो इंडियाच्या खेळाडूंना, त्यांच्या पार्श्वभूमीचा विचार न करता, 22 खेळांमध्ये प्रशिक्षण तसेच उपकरणे, वैद्यकीय सेवा आणि मासिक खर्चासाठी वार्षिक 6,28,400 रुपये दिले जात आहेत.**

**मल्लखांब, कलारीपयट्टू, गटका, थांग-ता, योगासन आणि सिलंबम हे खेलो इंडिया मधील देशी आणि पारंपारिक खेळ आहेत.**



> *आज खेलो इंडिया, युनिव्हर्सिटी गेम्स, खेलो इंडिया युथ गेम्स, खेलो इंडिया विंटर गेम्स आणि खेलो इंडिया पॅरा गेम्स होत आहेत. यामुळे आमच्या खेळाडूंचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यांची प्रतिभा अधिक उजळून समोर येते.*
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

खेळांसारख्या आंतरराष्ट्रीय मंचांवर खेळाडूंनी विक्रमी कामगिरी केली आहे. कल्याणकारी योजना आणि उपक्रमांच्या माध्यमातून, सरकार केवळ तळागाळातील प्रतिभेची ओळख करून त्यांना घडवत नाही, तर खेळाडूंना त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत आणि त्यानंतरही आवश्यक ते सहाय्य मिळेल याचीही खात्री करत आहे. पायाभूत सुविधा, प्रशिक्षण आणि खेळाडूंच्या कल्याणामध्ये केलेल्या भरीव गुंतवणुकीमुळे, भारत क्रीडा क्षेत्रात जागतिक स्तरावर अग्रगण्य बनण्याच्या दिशेने आशादायी वाटचाल करत आहे.

## खेलो इंडिया बनले क्रीडा विकासासाठीचे व्यासपीठ

देशातील क्रीडा प्रतिभांचा शोध घेणे, त्यांना घडवणे आणि क्रीडा कौशल्य सादर करण्यासाठी तसेच प्रतिभावान मुलांना उत्कृष्टतेकडे नेणारा विकासाचा मंच म्हणून खेलो इंडियाने आपली ओळख निर्माण केली आहे. खेलो इंडिया ट्रायबल गेम्स 2026 सह खेलो इंडिया गेम्सच्या 23 आवृत्त्या आयोजित करण्यात आल्या आहेत. यामध्ये खेलो इंडिया युथ गेम्सच्या 7 आवृत्त्या, खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्सच्या 5 आवृत्त्या, खेलो इंडिया विंटर गेम्सच्या 5 आवृत्त्या, खेलो इंडिया पॅरा गेम्सच्या 2 आवृत्त्या, खेलो इंडिया बीच गेम्सच्या 2 आवृत्त्या आणि खेलो इंडिया

खेळासंदर्भात आणखी काही योजना

# टॉप्स घडवत आहे ऑलिम्पिक पदक विजेते खेळाडू

टार्गेट ऑलिम्पिक पोडियम स्कीम (**TOPS**) 2014 पासून लागू करण्यात आली आहे. ऑलिम्पिक आणि पॅरालिम्पिक खेळांमध्ये भारताची पदक मिळवण्याची शक्यता वाढवणे, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. ही योजना उत्कृष्ट क्षमता असलेल्या खेळाडूंना ओळखून त्यांना त्यांच्या गरजेनुसार संपूर्ण सहाय्य पुरवते. या योजनेअंतर्गत, **TOPS** कोअर खेळाडूंना दरमहा 50 हजार रुपये आणि **TOPS** डेव्हलपमेंट खेळाडूंना स्वखर्चासाठी 25 हजार रुपये भत्ता दिला जातो. यासोबतच प्रशिक्षण, क्रीडा विज्ञान आणि सहाय्यक सेवा यांसारख्या विविध सहाय्य सेवाही पुरवल्या जातात.

### टॉप्स अंतर्गत दिली जाणारी मदत

**51** कोअर खेळाडू | **52** पॅरा कोअर खेळाडू

**130** डेव्हलपमेंट खेळाडू





## देशात प्रथमच खेलो इंडिया आदिवासी क्रीडा स्पर्धा

खेलो इंडिया अंतर्गत आतापर्यंत खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धा, खेलो इंडिया विद्यापीठ क्रीडा स्पर्धा, खेलो इंडिया हिवाळी क्रीडा स्पर्धा, खेलो इंडिया पॅरा गेम्स, खेलो इंडिया बीच गेम्स आणि खेलो इंडिया जलक्रीडा महोत्सवाचे आयोजन केले आहे. यावर्षी प्रथमच, 25 मार्च ते 6 एप्रिल दरम्यान रायपूर, जगदलपूर आणि सुरगुजा या छत्तीसगडमधील तीन शहरांमध्ये खेलो इंडिया आदिवासी क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आली. ॲथलेटिक्स, फुटबॉल, हॉकी, भारोत्तोलन, तिरंदाजी, जलतरण आणि कुस्ती या खेळांमध्ये सात पदकांसाठी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.



*आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळांमध्ये भारताचा दबदबा वाढवण्यासाठी क्रीडा प्रतिभा असणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय वयातच ओळखून त्यांना प्रशिक्षित केले जाते आहे. यासाठी खेलो इंडिया पासून TOPS पर्यंत एक परिसंस्था विकसित करण्यात आली आहे.*

*-नरेंद्र मोदी, पंतप्रधान*

वॉटर स्पोर्ट्स फेस्टिव्हलच्या 1 आवृत्तीचा समावेश आहे. या खेळांमध्ये 60 हजारांपेक्षा जास्त खेळाडूंनी सहभाग नोंदवला.

### 34 क्रीडा प्रकारांमध्ये 'खेलो इंडिया महिला लीग'

खेळांमध्ये महिलांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी 'खेलो इंडिया महिला लीग' आयोजित केल्या जात आहेत. फेब्रुवारी 2026 पर्यंत, 34 क्रीडा प्रकारांमध्ये महिला लीग आयोजित करण्यात आल्या होत्या. महिला खेळाडूंसाठी 2,407 स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. यामध्ये 2 लाखांपेक्षा जास्त महिला सहभागी झाल्या.

### जम्मू आणि काश्मीरमध्ये प्रत्येक जिल्ह्यात 5 खेलो इंडिया केंद्रे

खेलो इंडिया योजनेअंतर्गत, सर्वसाधारण नियमांनुसार जम्मू आणि काश्मीर या केंद्रशासित प्रदेशातील प्रत्येक जिल्ह्यात 5 खेलो इंडिया केंद्रे स्थापन करण्याची तरतूद अधिसूचित करण्यात आली आहे. जम्मू आणि काश्मीरसाठी हा एक विशेष उपक्रम आहे. आतापर्यंत या केंद्रशासित प्रदेशात 100 खेलो इंडिया केंद्रे अधिसूचित करण्यात आली आहेत.

### विद्यार्थ्यांमधील प्रतिभा शोधण्याच्या उद्देशाने, खेलो इंडिया उदयोन्मुख प्रतिभा शोध (कीर्ती) उपक्रम

देशातील 9 ते 18 वयोगटातील शालेय विद्यार्थ्यांमधील प्रतिभा शोधण्याच्या उद्देशाने आणि त्यांना आणखी पैलू पाडण्याच्या उद्देशाने कीर्ती (खेलो इंडिया उदयोन्मुख प्रतिभा शोध) हा एक राष्ट्रव्यापी उपक्रम सुरु करण्यात आला आहे. देशभरातील 174 पेक्षा जास्त प्रतिभा मूल्यांकन केंद्रांमार्फत प्रतिभा ओळखण्याचे काम केले जात आहे. या उपक्रमामुळे भारताला जागतिक क्रीडा क्षेत्रात अधिक उंचीवर नेऊ शकतील, अशा तरुण खेळाडूंची एक मजबूत फळी तयार होत आहे. 2036 सालापर्यंत भारताला जगातील अव्वल 10 क्रीडा राष्ट्रांमध्ये आणि 2047 पर्यंत अव्वल 5 राष्ट्रांमध्ये स्थान मिळवून देण्यासाठी खेळाडूंचा एक आश्वासक आणि सातत्यपूर्ण गट तयार करणे, हे कीर्तीचे ध्येय आहे. ■

जागतिक वारसा दिनः 18 एप्रिल 2026

# जागतिक वारशात सामावले देशाचे सार

*आपला वारसा केवळ दगड, शिलालेख किंवा भग्नावशेषांपुरता मर्यादित नाही. तो मंदिरांच्या भिंतींवरील प्रत्येक कुजबुजीत, प्राचीन किल्ल्यांवरील प्रत्येक नक्षीकामात आणि पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या प्रत्येक लोकगीतामध्ये सामावलेला आहे. दरवर्षी 18 एप्रिल रोजी साजरा केला जाणारा जागतिक वारसा दिन आपल्याला आठवण करून देतो की या कालातीत खजिन्यांची केवळ प्रशंसाच नव्हे, तर त्यांचे जतनही केले पाहिजे...*



सांस्कृतिक वारसा म्हणजे केवळ इतिहास नव्हे, तर ती मानवतेची सामायिक जाणीव आहे. जेव्हा आपण ऐतिहासिक स्थळांना भेट देतो, तेव्हा आपले विचार सद्य भू-राजकीय बाबींच्या पलीकडे जातात. **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

## 18 एप्रिल रोजी दरवर्षी जागतिक वारसा दिन साजरा केला जातो

हा दिवस 'आंतरराष्ट्रीय स्मारके आणि स्थळे दिन' म्हणूनही ओळखला जातो. हा दिवस मानवी वारशाचा आदर आणि संरक्षण करण्यासाठी समर्पित आहे. या दिवसाची सुरुवात 1982 मध्ये स्मारक आणि स्थळांवरील आंतरराष्ट्रीय परिषद (**ICOMOS**) यांनी केली होती. नंतर 1983 मध्ये युनेस्कोने त्याला अधिकृत मान्यता दिली.

## देशात 44 जागतिक वारसा स्थळे आहेत

सांस्कृतिक जागतिक वारसा स्थळे **36**

नैसर्गिक जागतिक वारसा स्थळे **07**

मिश्र जागतिक वारसा स्थळ **01**





# 2014 नंतर युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट झालेली वारसा स्थळे



2021
काकतीय रुद्रेश्वर (रामप्पा) मंदिर, तेलंगणा



2014
रानी की वाव (राणीची विहीर), पाटण, गुजरात




2014
ग्रेट हिमालयन नॅशनल पार्क, हिमाचल प्रदेश



2016
नालंदा महाविहाराचे पुरातत्व स्थळ, बिहार



2016
ले कॉर्बुझियरची वास्तुकला, चंदीगड




2025
भारतातील मराठा लष्करी गड-किल्ले, महाराष्ट्र



2016
कांचनजंगा राष्ट्रीय उद्यान, सिक्कीम



2017
अहमदाबाद, गुजरातमधील एक ऐतिहासिक शहर



2018
व्हिक्टोरियन आणि आर्ट डेको संकुल, मुंबई, महाराष्ट्र



2019
जयपूर शहर, राजस्थान



2021
धोलावीरा: हडप्पाकालीन शहर, गुजरात



2023
होयसळ पवित्र संकुल, कर्नाटक



2023
शांतिनिकेतन, विश्व-भारती



2024
मोईदाम - अहोम राजवंशाची पर्वतीय दफनभूमी पद्धत, आसाम

## 2014 नंतर युनेस्कोच्या प्रातिनिधिक यादीत समाविष्ट अमूर्त सांस्कृतिक वारसा

| | |
|---|---|
| जंदियाला गुरु, भारतीय सुतारांची पितळ आणि तांब्याची भांडी बनवण्याची पारंपरिक कला, पंजाब | 2014 |
| योग, सर्व राज्ये | 2016 |
| नवरोज, सर्व राज्ये | 2016 |
| कुंभमेळा, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, महाराष्ट्र, मध्य प्रदेश | 2017 |
| दुर्गा पूजा, कोलकाता, पश्चिम बंगाल | 2021 |
| गरबा, गुजरात | 2023 |

## जागतिक वारसा यादीत समावेशासाठी जागतिक वारसा केंद्राकडे पाठवलेला प्रस्ताव



प्राचीन बौद्ध स्थळ, सारनाथ (2025-26)



जिंगकियांगजरी/ ल्यू चराई सांस्कृतिक क्रीडा स्पर्धा भूदृश्य(2026-27)




# संपूर्ण मानवतेला मिळेल

## भारताच्या कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सेमीकंडक्टर उपक्रमाचा लाभ

*आज ज्यावेळी जगभरात भारताचा विकास आणि प्रगतीची चर्चा होते त्यावेळी गुजरात मॉडेलचीही प्रशंसा केली जाते, कारण गुजरातने दाखवून दिले आहे की, विकासासाठी कल्याणकारी योजनाही तितक्याच महत्त्वाच्या आहेत, जितके पायाभूत सुविधांचे प्रकल्प. याच मालिकेअंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 31 मार्च रोजी गुजरातमध्ये 20 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त विकास प्रकल्पांची भेट दिली. यासोबतच, ते तिथे वारशाशी संबंधित कार्यक्रमांतही सहभागी झाले आणि सांगितले की, 21 व्या शतकातील भारत केवळ बदलांचा साक्षीदार नाही, तर बदलाचे नेतृत्व करण्याच्या संकल्पासह पुढे वाटचाल करतो आहे.....*

भारताच्या नेतृत्वाचा दृष्टिकोन अगदी स्पष्ट आहे. जेव्हा गावे बाजारांशी, शेतकरी संधींशी आणि युवा वर्ग रोजगाराशी जोडला जातो, तोच खरा विकास असतो. हा तोच दृष्टिकोन आहे ज्यामुळे देशात पायाभूत सुविधांसाठी सातत्याने केवळ मोठी रक्कम खर्च केली जात नाही तर, ते वेळेत पूर्ण करून नागरिकांना त्याचा लाभही दिला जात आहे. याच मालिकेअंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी 31 मार्च रोजी गुजरात दौऱ्यावर पोहोचले, तिथे त्यांनी तीन जाहीर सभांना संबोधित केले. वाव-थरादमध्ये गावांना बाजाराशी जोडणारे रस्ते आणि रेल्वे जोडणीच्या अनेक प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन केले, त्याचवेळी रोजगाराला चालना देणाऱ्या सेमीकंडक्टर प्रकल्पाचेही

> “
> *भारताचा सेमीकंडक्टर उद्योग विविध राज्यांमध्ये वेगाने प्रगती करतो आहे, यामुळे असंख्य तरुणांसाठी नवीन संधी निर्माण होत आहेत. आता आपण या प्रयत्नांची व्याप्ती अधिक विस्तारण्यासाठी सेमीकंडक्टर मिशन 2.0 वर काम करत आहोत.*
>
> **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

पंतप्रधानांचा पूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.



पंतप्रधानांचा पूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा अधोरेखीत केले नऊ संकल्प
## 10 व्या संकल्पाचीही जोड दिली

पंतप्रधान मोदी म्हणाले की, जर आपण वैयक्तिक महत्त्वाकांक्षेच्या पलीकडे जाऊन समाज आणि राष्ट्राच्या उद्दिष्टांसाठी काम केले, तर देशाच्या विकासाला अधिक गती मिळते. याच भावनेच्या विस्तारांतर्गत पंतप्रधान मोदी यांनी यापूर्वी राष्ट्रासमोर मांडलेल्या नऊ संकल्पांना आपल्या 10 व्या संकल्पाचीही जोड दिली...

1. **पहिला संकल्प** - पाणी वाचवण्याचा.
2. **दुसरा संकल्प** - एक पेड मां के नाम.
3. **तिसरा संकल्प** - स्वच्छतेची मोहीम.
4. **चौथा संकल्प** - व्होकल फॉर लोकल.
5. **पाचवा संकल्प** - देशाटन.
6. **सहावा संकल्प** - नैसर्गिक शेतीचा अवलंब.
7. **सातवा संकल्प** - आरोग्यदायी जीवनशैलीचा अंगिकार.
8. **आठवा संकल्प** - जगण्यात योग आणि खेळांचा अंतर्भाव करणे.
9. **नववा संकल्प** - गरिबांना मदत करणे.
10. **दहावा संकल्प** - भारताच्या वारशाचे संरक्षण.

## साणंद केन्स सेमीकॉन प्रकल्पाचे उद्घाटन

- केन्स सेमीकॉन प्रकल्पामध्ये प्रगत बुद्धिमत्ताधारीत ऊर्जा विभागाच्या (इंटेलिजेंट पॉवर मॉड्यूल) उभारणीने व्यावसायिक उत्पादन घेण्याला सुरुवात झाली.
- हा प्रकल्प इंडिया सेमीकंडक्टर मिशन अंतर्गत मंजूर प्रकल्पांपैकी मायक्रॉन टेक्नॉलॉजीनंतरचा व्यावसायिक उत्पादनाला सुरूवात करणारा दुसरी सेमीकंडक्टर प्रकल्प आहे.
- प्रकल्पाचे सर्व टप्पे पूर्णत्वाला गेल्यावर, या प्रकल्पाची उत्पादन क्षमता दररोज 6.33 दशलक्ष नग (युनिट) इतकी असेल.
- हा प्रकल्प विशेष महत्त्वाचा आहे, कारण या प्रकल्पाअंतर्गत भारताचे दुसरे आऊटसोर्स्ड सेमीकंडक्टर जोडणी आणि चाचणी / जोडणी, चाचणी, चिन्हांकन आणि बांधणी (पॅकिंग) केंद्र उत्पादनाच्या टप्प्यापर्यंत पोहोचले आहे.
- ही सुविधा स्वदेशी सेमीकंडक्टर बांधणी क्षमता विकसित करण्याच्या प्रक्रियेत योगदान देईल, चिप विषयक भारताच्या परिसंस्थेमधील एक महत्त्वाची उणीव दूर करेल.



## 20 हजार कोटी रुपयांच्या भेटी

पंतप्रधान मोदी यांनी वाव-थरादमध्ये 20 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या अनेक विकास प्रकल्पांची पायाभरणी केली तसेच उद्घाटनानंतर ते राष्ट्राला समर्पित केले.

अहमदाबाद इथल्या साणंदमध्ये उद्घाटन केले. इतकेच नाही तर इथे पाणी, नवीकरणीय ऊर्जा, पर्यटनाशी संबंधित प्रकल्प राष्ट्राला अर्पण केले. यासोबतच, गांधीनगरमध्ये महावीर जयंतीनिमित्त सम्राट संप्रति संग्रहालयाचेही पंतप्रधान मोदी यांनी उद्घाटन केले.

गुजरातमधील साणंद इथे केन्स सेमीकंडक्टर ओसॅट सुविधेचेही पंतप्रधान मोदी यांनी उद्घाटन केले, ही सुविधा भविष्यात तंत्रज्ञान आणि नवोन्मेषाच्या बाबतीत आघाडीचा देश म्हणून उदयाला येण्याच्या भारताच्या प्रयत्नांना अधिक गती देईल. पंतप्रधान मोदी यांनी सांगितले की, 28 फेब्रुवारी रोजी मायक्रॉनच्या प्रकल्पात उत्पादन घेण्याला सुरुवात झाली होती आणि 31 मार्च रोजी केन्स टेक्नॉलॉजीच्या सेमीकंडक्टर प्रकल्पामध्ये उत्पादन घेण्याला सुरुवात होत आहे. भारताच्या या यशाबद्दल सांगाताना ते म्हणाले की, हे भारताचे टेकेड (तंत्रज्ञानाचे दशक) आहे! तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सेमीकंडक्टर क्षेत्रातील आपल्या उपक्रमांचा लाभ संपूर्ण मानवतेला आणि संपूर्ण जगाला मिळणार आहे. नवीन प्रकल्पामुळे मेक इन इंडिया आणि मेक फॉर द वर्ल्ड ला अधिक बळ मिळणार आहे.

भारताची अशी धारणा आहे की, 21 व्या शतकातील हा कालखंड केवळ आर्थिक प्रतिस्पर्धेचा काळ नाही. हा काळ भविष्यातील तंत्रज्ञान विषयक परिदृश्याला आकार देण्याचा काळ आहे. या

## उद्‌घाटन...

### रस्ते आणि रेल्वे जोडणीची व्याप्ती विस्तारली

**5,100** कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चातून बांधलेल्या अहमदाबाद-धोलेरा द्रुतगती मार्गाचे उद्‌घाटन.

या द्रुतगती मार्गामुळे प्रादेशिक दळणवळणात सुधारणा घडून येईल, धोलेरा विशेष गुंतवणूक क्षेत्रात औद्योगिक विकासालाही चालना मिळेल.

- गांधीनगर-कोबा-आरोदराम मार्गावरील पीडीपीयू जंक्शनवरही उड्डाणपुलाचे उद्‌घाटन.
- कनलस-जामनगर दुहेरीकरण प्रकल्प (28 किमी),
- राजकोट-कनलस दुहेरीकरण प्रकल्पाचा एक भाग (111.20 किमी) आणि गांधीधाम-आदीपुर विभागाचे (10.69 किमी) चौपदरीकरण राष्ट्राला अर्पण.
- हिंमतनगर-खेडब्रह्मा गेज रूपांतरण प्रकल्पाचे (54.83 किमी) देखील उद्‌घाटन केले, यामुळे या क्षेत्रातील रेल्वे जोडणी आणि प्रवाशांच्या दळणवळणात सुधारणा घडून येईल.
- खेडब्रह्मा-हिंमतनगर असरवा रेल्वे सेवेला हिरवा झेंडा दाखवला.

## या सुविधांची व्याप्तीही विस्तारली



**3,650** कोटी रुपये

खर्चातून उभारले खावडा पुलिंग स्टेशन-2 आणि त्याच्याशी संलग्न 4.5 गिगावॅट नवीकरणीय ऊर्जा पारेषण वाहिनी (ट्रान्समिशन लाईन) प्रकल्पाचे उद्‌घाटन.

- अहमदाबादमधील असरवा इथल्या जिल्हा रुग्णालयात 858 खाटांच्या निवारा केंद्राचे आणि गांधीनगरच्या जिल्हा रुग्णालय आणि जीएमईआरएस वैद्यकीय महाविद्यालयात अशाच प्रकारच्या सुविधांचे उद्‌घाटन.
- सुमारे 1,780 कोटी रुपये खर्चाचे दोन मोठे पाणीपुरवठा वाहिनी प्रकल्प राष्ट्राला अर्पण.
- अहमदाबादमधील वेजलपूर इथल्या विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाचे उद्‌घाटन.

पंतप्रधानांचा पूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

## या प्रकल्पांची पायाभरणी करण्यात आली

- पक्की पक्क्या शोल्डरच्या चार पदरी इदर बडोली बायपास रस्त्याचे बांधकाम.
- एनएच-754 के च्या धोलावीरा-मौवाना-वाउवा-संतालपुर विभागाचे (पॅकेज-II) दोन पदरी पक्क्या शोल्डरयुक्त मार्गाच्या जोडणीने अद्ययावतीकरण.
- गांधीनगर-कोबा-विमानतळ रस्त्यावरील भाईजीपुरा जंक्शनवर बांधल्या जाणाऱ्या उड्डाणपुलासह अनेक महत्त्वाचे रस्ते पायाभूत सुविधा प्रकल्प. उड्डाणपुलाखाली सुव्यवस्थित वाहनतळ सुविधा उपलब्ध होणार.
- बनासकांठामध्ये बलराम महादेव आणि विश्वेश्वर महादेव इथे पर्यटन विषयक पायाभूत सोयीसुविधा कामांची पायाभरणी.
- अंबाजी आणि आसपासच्या ग्रामीण भागासाठी पाणीपुरवठा योजना. यामुळे सुमारे 1.5 लाख लोकांना लाभ मिळणार.

सुमारे **1,000** कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून गांधीनगर जिल्ह्यात राबवलेले तीन साबरमती नदीकाठ विस्तार प्रकल्प.

दशकात भारत तंत्रज्ञानाशी संबंधित जे उपक्रम राबवत आहे, ते आगामी दशकात भारताच्या नेतृत्वाला भक्कम करणार आहेत. जर कृत्रिम बुद्धिमत्तेचा अवलंब करण्याच्या बाबतीत पाहिले, तर भारत जगात सर्वात आघाडीवर आहे. डिजिटल इंडियाचे यश, वित्तीय तंत्रज्ञानाअंतर्गत होत असलेली दमदार कामगिरी, यातून तंत्रज्ञानावर भारतीयांचा असलेला विश्वास दिसून येतो.

महावीर जयंतीच्या निमित्ताने पंतप्रधान मोदी यांनी गांधीनगरच्या कोबा तीर्थ इथे सम्राट संप्रति संग्रहालयाचे उद्‌घाटन केले. अशोकाचा नातू आणि जैन धर्माच्या प्रचार प्रसारासाठी प्रसिद्ध असलेल्या सम्राट संप्रतिच्या नावाने उभारलेल्या या संग्रहालयातून जैन धर्माचा समृद्ध ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारशाची प्रचिती येते. या निमित्ताने झालेल्या कार्यक्रमात पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज जेव्हा संपूर्ण जग अस्थिरता आणि अशांततेच्या आगीत होरपळत आहे, अशा वेळी सम्राट संप्रति संग्रहालयाचा संदेश केवळ भारतासाठीच नाही, तर समग्र मानवतेसाठी खूप महत्त्वाचा आहे. ताडपत्र आणि भोजपत्रावर कोरलेल्या शेकडो वर्षे जुने दुर्मिळ ज्ञानाचे कोबा तीर्थ इथे जतन आणि संकलन केले गेले आहे. हा केवळ आपल्या भूतकाळाला आणि वर्तमानाला परस्परांशी जोडणारा प्रयत्न नाही, तर तो आपल्या भविष्यासाठी देखील खूप उपयुक्त आहे. ▪



PMO India
@PMOIndia

आपल्या अर्थव्यवस्थाचे मूलभूत घटक भक्कम आहेत. आणि सरकार क्षणक्षणाला बदलत असलेल्या परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे.

सरकार या परिस्थितीच्या अल्पकालीन, मध्यमकालीन आणि दीर्घकालीन अशा प्रत्येक परिणामांसाठी एका व्यूहरचनेसह काम करत आहे : पंतप्रधान @narendramodi



रक्षा मंत्री कार्यालय/ RMO India
@DefenceMinIndia

सुमारे पाच वर्षांपूर्वी, जेव्हा पंतप्रधानांनी सैनिक शाळांमध्ये मुलींना प्रवेश देण्याची सुरुवात करण्याचा निर्णय घेतला, तो एक ऐतिहासिक निर्णय होता. तो निर्णय आपल्या महिला शक्तीच्या सक्षमीकरणाच्या दिशेने टाकलेले एक क्रांतिकारी पाऊल होते. मला हे पाहून खूप आनंद होतो की, या शाळेतील हुशार मुलींनी आंतरशालेय बास्केटबॉल, फुटबॉल, ॲथलेटिक्स तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून हे सिद्ध केले आहे की, आपल्या मुली कोणत्याही क्षेत्रात आपल्या मुलांपेक्षा कमी नाहीत : संरक्षण मंत्री श्री @rajnathsingh



Office of Amit Shah
@AmitShahOffice

कृत्रिम बुद्धिमत्ता शिखर परिषदेत देशभरातील युवा वर्गासाठी ज्या संधी निर्माण करण्याचे काम मोदीजी करत होते, त्यात काँग्रेसने अडथळा आणण्याचे काम केले. हे संपूर्ण देशाने पाहिले आहे आणि याविरोधात निश्चितपणे कठोर कारवाई व्हायला हवी : केंद्रीय गृहमंत्री श्री @AmitShah जी #AmitShahOnTimesNow



Nitin Gadkari
@nitin_gadkari

पंतप्रधान श्री @narendramodi जी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने आर्थिक वर्ष 2026-27 ते आर्थिक वर्ष 2030-31 साठी लघु जलविद्युत (SHP) विकास योजनेला मंजुरी दिली आहे. या उपक्रमामुळे 1-25 मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पांना प्रोत्साहन मिळेल, विशेषतः डोंगराळ आणि ईशान्य भारतातील प्रदेशांना जिथली मोठ्या प्रमाणावर क्षमता अद्याप उपयोगात आणली गेलेली नाही.



Giriraj Singh
@girirajsinghbjp

माननीय पंतप्रधानांच्या नेतृत्वात भारत स्मार्टफोन उत्पादन क्षेत्रातील एक प्रमुख जागतिक केंद्र म्हणून उदयाला येत आहे. स्मार्टफोन आता देशाची सर्वात मोठी व्यापारी निर्यात बनले आहे आणि अमेरिकेला पुरवठा करण्याच्या बाबतीत भारताने चीनला मागे टाकले आहे. मेक इन इंडिया आणि PLI योजनेच्या माध्यमातून उत्पादन, गुंतवणूक, रोजगार आणि निर्यातीत उल्लेखनीय वाढ नोंदवली गेली आहे.



Dharmendra Pradhan
@dpradhanbjp

2014 पर्यंत भारतातील केवळ 54 संस्था QS रँकिंगमध्ये झळकल्या होत्या. आज ती संख्या वाढून 290 वर पोहोचली आहे.

गेल्या 11-12 वर्षांत झालेली ही उल्लेखनीय वाढ शिक्षण क्षेत्राला बळकटी देण्याच्या आणि त्यात परिवर्तन घडवून आणण्याच्या आपल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची जागतिक साक्ष आहे.



आत्मनिर्भरता पर जोर | गुजरात के साणंद में सेमीकंडक्टर प्लांट का किया उद्घाटन...

## मोदी ने 'मेड इन इंडिया-मेक फॉर द वर्ल्ड' का मंत्र दिया

पंजाब केसरी/साणंद

## विमान मरम्मत केंद्र से आत्मनिर्भरता बढ़ेगी

प्रयास

ग्रेटर नोएडा, वरिष्ठ संवाददाता। नोएडा एयरपोर्ट परिसर में प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने पहले एमआरओ की नींव रखी। उन्होंने कहा कि विमानों का 85 प्रतिशत रखरखाव अभी विदेश पर निर्भर है। एमआरओ हब का निर्माण अकासा एयर करेगी। इसके बनने के बाद विमानों की मरम्मत के लिए आत्मनिर्भरता बढ़ेगी।

संभावनाओं वाला बाजार

नोएडा एयरपोर्ट परिसर में शनिवार को एमआरओ हब की नींव रखी गई। • हिन्दुस्तान

## नोएडा एयरपोर्ट 'विकसित भारत-विकसित उत्तर प्रदेश' अभियान का नया अध्याय : पीएम मोदी

जेवर, 28 मार्च( दिनेश शर्मा/ वीरेन्द्र शर्मा): गौतम बुद्ध नगर के जेवर में निर्मित नोएडा इंटरनेशनल एयरपोर्ट के फेज-1 का लोकार्पण प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी ने शनिवार को किया। इस अवसर पर उन्होंने एयरपोर्ट के अत्याधुनिक कार्गो टर्मिनल

## प्रधानमंत्री की अपील- वैश्विक संकट का मिलकर करें सामना

पीएम मोदी ने कहा कि पश्चिमी एशिया में युद्ध चल

## टीम इंडिया की भावना के साथ मिलकर करना होगा काम : मोदी

पश्चिम एशिया संकट पर मुख्यमंत्रियों के साथ बैठक में पीएम ने कहा-जमाखोरी के खिलाफ सख्त कदम उठाएं, हालात नियंत्रण में

गलत सूचना फैलाने वालों को चेतावनी

राजनाथ अंतर-मंत्रालयी समूह के अध्यक्ष

जनता का विश्वास बनाए रखने पर जोर

## पीएम ने की सराहना
## जल संरक्षण का कोरिया मॉडल बना राष्ट्रीय उदाहरण

पत्रिका ब्यूरो
patrika.com

रायपुर. प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी ने रविवार को रेडियो कार्यक्रम मन की बात की 132वीं कड़ी में जल संरक्षण के लिए छत्तीसगढ़ के कोरिया जिले में किए जा रहे कामों का जिक्र किया। उन्होंने कोरिया मॉडल की सराहना की और इसे जनभागीदारी आधारित जल संरक्षण का प्रेरक उदाहरण बताया। दरअसल, कैच द रेन तथा राज्य शासन के मोर गांव मोर पानी संचालित किया गया। इस पहल ने जल संरक्षण को केवल एक सरकारी योजना से आगे बढ़ाकर व्यापक जनभागीदारी पर आधारित आंदोलन बना दिया है। इससे कोरिया के भूजल स्तर में 5.41 मीटर की उल्लेखनीय वृद्धि दर्ज हुई है। **यह है कोरिया मॉडल:** जल संचय जन भागीदारी अभियान के अंतर्गत लागू 5 फीसदी मॉडल के तहत किसानों ने अपनी भूमि का 5 फीसदी भाग छोटी सीढ़ीदार जल संरचनाओं के लिए समर्पित किया

## 'युवा भारत' कर रहा राष्ट्र निर्माण : मोदी

चुनौतियों का मिलकर सामना करें देशवासी

पीएम मोदी ने कहा- निरंतर अभ्यास से ही बढ़ती है बुद्धिमत्ता

मधुआरे आत्मनिर्भर भारत की नींव

जागतिक पृथ्वी दिन 22 एप्रिल

# पृथ्वी ला वाचवणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी

"माता भूमिः पुत्रोऽहं पृथिव्याः" अर्थात भूमी माझी माता आहे आणि मी पृथ्वीचा पुत्र आहे. यातून हे दिसून येते की, मनुष्य आणि निसर्ग यांच्यातील नाते अतूट आहे. इतकेच नाही तर पृथ्वी जीवनाला पोषण देते आणि आपल्या विकासासाठी आवश्यक परिसंस्थेचेही जोपासना करते. यामुळेच तर दरवर्षी 22 एप्रिल हा दिवस जागतिक पृथ्वी दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्याचा उद्देश पर्यावरणाच्या रक्षणाकडे लक्ष वेधणे हा आहे. याचबरोबरीने पृथ्वीच्या आरोग्याचे रक्षण आणि संवर्धन करण्यासाठी अत्यंत जबाबदारीने परोपकार करणे हे आपले कर्तव्य आहे ...





"पृथ्वी दिनानिमित्त, मी त्या सर्वांचे कौतुक करतो जे आपल्या पृथ्वीला अधिक चांगले बनवण्यासाठी काम करत आहेत. भारत निसर्गासोबत सौहार्दाने राहण्याच्या आपल्या संस्कृतीला अनुसरून शाश्वत विकासाची वाटचाल पुढे नेण्यासाठी वचनबद्ध आहे. **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

न्यू इंडिया समाचार पाक्षिक

आर.एन.आय, DELHIN/2020/78812, 16-30 अप्रैल, 2026

आर.एन.आय DELHIN/2020/78812 ( प्रकाशनाची तारीख - 3 एप्रिल 2026, एकूण पृष्ठे-54 )

प्रधान संपादक
धीरेंद्र ओझा, मुख्य महासंचालक
पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

प्रकाशक
कंचन प्रसाद , महासंचालक,
केंद्रीय संचार ब्युरो

खोली क्रमांक - 278, केंद्रीय संचार ब्युरो,
सूचना भवन, दुसरा मजला,
नवी दिल्ली-110003 इथून प्रकाशित